शनिवार
१० जानेवारी १९८१

# माणूस

किंमत
एक रुपया



या सावित्रीने
वयाची २० वर्षे
पूर्ण होण्यापूर्वीच
भारतातील पहिली
मुलींची शाळा चालवली.

पृष्ठ....६



## भा. ज. प. अधिवेशनात जे न्या. छगलांनी सांगितले ते अटलजींनी सांगण्यास काय हरकत होती ?

पृष्ठ....३

पुणे वार्ता

# 'केसरी' जन्मशताब्दी

रविवार, तारीख चार जानेवारी. पुण्याच्या नारायणपेठेतला केळकररस्ता वाहनांनी गजबजला होता. गेली पंचाहत्तर वर्षं अनेक घाव सोसलेल्या इथल्या एका भव्य वाड्यावर उत्कृष्ट विद्युत्‌रोषणाई केलेली होती. लोकमान्य टिळकांचा गायकवाडवाडा. लोकमान्यांनी सुरू केलेल्या 'केसरी'ला आज शंभर वर्षं पूर्ण झाली होती. त्यानिमित्त गायकवाडवाड्यात मोठा समारंभ आयोजित करण्यात आला होता.

गायकवाडवाड्याचं पटांगण माणसानी फुलून गेलं होतं. समोरच भव्य व्यासपीठ उभारलं होतं. त्यावर सात ज्येष्ठ संपादक-स्वत: जयंतराव टिळक, आजच्या समारंभाचे अध्यक्ष वयोवृद्ध टिळकभक्त बॅ. रामराव देशमुख, मुंबईचे महापौर बाबुराव शेटये, कोणत्याही कारणासाठी भरपूर निधी उभारण्यात हातखंडा असलेले बॅ. रजनी पटेल, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इत्यादी मंडळी स्थानापन्न झाली होती.

कार्यक्रमाला सुरुवात झाली. उपस्थितांचं स्वागत करून स्वत:चं मनोगत व्यक्त करताना श्री. जयंतराव म्हणाले, 'आमच्या दृष्टीनं आजचा समारंभ हा आनंदाचा ऐतिहासिक व अभिमानास्पद समारंभ आहे. 'केसरी'ने ही शंभर वर्षांची वाटचाल अनेक संकटं येऊनही अखंडितपणे पार पाडली. या यशाचं गमक काय असं कोणी विचारलं तर मी सांगेन की लोकमान्यांनी 'केसरी' जनतेला अर्पण केला हे 'केसरी'च्या यशाचं सर्वांत मोठं गमक आहे!'

'लोकमान्याच्या काळातील 'केसरी'ची पुढील कोणत्याही काळातील 'केसरी'शी तुलना होऊच शकणार नाही! कारण टिळक हे टिळक होते, आम्ही तसे नाही. टिळकानी पेललेलं ओझं पेलण्याइतके आम्ही मोठे नाही, आम्ही फक्त आमचं कर्तव्य पार पाडण्याचा प्रयत्न करत आहोत. एक गोष्ट मात्र मी निश्चितपणे सांगू शकेन की 'केसरी'च्या बाह्यस्वरूपात अनेक स्थित्यंतरं दिसली तरी 'केसरी'ने आपला मूळ गाभा सोडलेला नाही.

'हे करत असताना आमच्या हातून काही चुका घडल्या, काही ठिकाणी आम्ही कमी पडलो; पण या प्रत्येक वेळी लोकांनी आम्हाला सावरून घेतलं. तसेच ते यापुढील काळातही करतील असा मला विश्वास वाटतो!'

यानंतर पुण्यातले सात ज्येष्ठ संपादक श्री. पां. वा. गाडगीळ, त्र्यं. वि. पर्वते, बाबासाहेब घोरपडे, शंकरराव दाते, प्रा. प्रभाकर पाध्ये, शंकरराव आगाशे व हरिभाऊ जोशी या सात वयोवृद्ध संपादकांचा त्यांच्या वृत्तपत्रक्षेत्रातील कामगिरीबद्दल जयंतरावांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. श्री. एस. एम. जोशी यांचाही सत्कार होणार होता; पण काही कारणाने ते समारंभाला उपस्थित राहू शकले नाहीत.

सत्कारसमारंभानंतर 'केसरी'चे अभीष्टचिंतन करताना श्री. पां. वा. गाडगीळ म्हणाले, 'बाबुराव गोखले, तात्यासाहेब केळकर, तात्यासाहेब करंदीकर यांच्या गुडघ्यांशी बसून मी 'केसरी' वाड्यात वृत्तपत्रक्षेत्रातील धडे घेतले. त्यांच्याशी काही वेळा उद्धटपणाने वागलो; पण या माणसांनी मला उदारपणे क्षमा केली. कारण ती जन्मत च शिक्षक होती. 'केसरी'मधल्या माझ्या चार वर्षांच्या काळात मी जे काही शिकलो त्या बियाण्यावर मला माझं सर्व आयुष्य काढता आलं. आजच्या या समारंभाच्या निमित्तानं मी एवढंच सांगेन की, सध्याच्या काळात घोषणाबाज पुढाऱ्यांच्या मागे न लागता आपण आपलं कार्य चालू ठेवलं पाहिजे!'

श्री. त्र्यं. वि. पर्वते यानी आपल्या भाषणात कै. ग. वि. केतकर, बापूसाहेब काळे, ग. त्र्यं. माडखोलकर, शिखरे इत्यादी दिवंगत सहकाऱ्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला श्री. बाबासाहेब घोरपडे यांनी आपल्या भाषणात, महाराष्ट्रात काय चाललं आहे हे बाहेर कळायला हवं म्हणून लोकमान्यानी इंग्रजीमध्ये 'मराठा' हे वृत्तपत्र सुरू केलं, ते 'केसरी' संस्थेनं पुन्हा सुरू करावं, अशी सूचना केली. श्री. गणपतराव नलावडे यानी जगाच्या अंतापर्यंत 'केसरी' चालू रहावा, अशी सदिच्छा व्यक्त केली.

समारंभाचं वातावरण अजिबात लक्षात न घेता केलेल्या भाषणात मुंबईच्या 'लोकसत्ता'चे संपादक विद्याधर गोखले यांनी लोकमान्य टिळकांच्या मूळ तत्त्वाशी 'केसरी'मधील कोणीही बेइमानी केली नाही म्हणून आज दिसणारी ही अखंडितपणाची परंपरा 'केसरी'ला राखता आली, असं सांगितलं. बॅ. रजनी पटेल यांनी 'केसरी'च्या डोक्यावर आज असलेलं


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : बत्तिसावा

१० जानेवारी १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

पंचवीस लाखांचं कर्ज आपण या वर्षअखेर-पर्यंत पूर्णपणे फेडण्यासाठी प्रयत्न करू असं सांगितलं.

'केसरी 'चे विद्यमान संपादक चंद्रकांत घोरपडे आपल्या भाषणात म्हणाले, 'केसरी 'ने आपली निष्ठा कोणत्याही व्यक्ती किंवा पक्षाच्या पायाशी वाहिलेली नाही. 'केसरी 'ची निष्ठा विचाराशी जोडलेली आहे. 'केसरी 'च्या प्रकाशनपूर्व प्रसिद्धिपत्रकातील 'प्रत्येक विषयाचे विवेचन जे करावयाचे, ते केवळ निःपक्षपाती बुद्धीने व आम्हास खरे वाटेल त्याला अनुसरून करावयाचे, असा आमचा कृतसंकल्प आहे,' या शब्दाशी आपण आपल्या कारकीर्दीत इमान राखू, असं आश्वासनही श्री घोरपडे यानी दिलं.

यानंतर वयाची नव्वदी गाठलेले समारंभाचे अध्यक्ष बॅ. रामराव देशमुख आपल्या भाषणात म्हणाले, 'लोकमान्य टिळकानी सांगितलेलं स्वराज्य आज आलं आहे; पण त्यांच्या कल्पनेतलं सुराज्य अजून आलेलं नाही. तेव्हा यापुढे या रस्त्यावर लोकांचं लक्ष कसं खेचलं जाईल याबाबत 'केसरी 'ने प्रयत्नशील राहावं. याचप्रमाणे देशाच्या वातावरणात आज निर्माण झालेली कृत्रिमता व इतर अनेक दोष नष्ट करून इथे शुद्धता यावी, निर्मळता यावी यासाठी 'केसरी 'ने स्वतःची बुद्धी व सामर्थ्य खर्ची घालावं !'

याच समारंभात 'केसरी 'च्या काही ज्येष्ठ सेवकाना व एजंटाना भेटवस्तूही देण्यात आल्या. श्री. शरच्चंद्र गोखले यानी आभार मानल्यानंतर सुमारे अडीच तास चाललेला हा भव्य आणि शानदार सोहळा संपला. ¤

# आर्थिक फेररचनेशिवाय राष्ट्रीय एकात्मता नाही

## —यशवंतराव

शुक्रवार, तारीख दोन जानेवारी. पुण्यातल्या इंडियन लॉ सोसायटीच्या लॉ कॉलेजचं सभागृह. व्यासपीठावर काँग्रेस अरसचे ज्येष्ठ नेते खासदार यशवंतराव चव्हाण, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राम ताकवले, लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. सत्यरंजन साठे इत्यादी मंडळी स्थानापन्न झालेली.

आजपासून या ठिकाणी दोन दिवस चालणाऱ्या 'आपली राज्यघटना व राष्ट्रीय एकात्मता' या विषयावरील चर्चासत्राचा हा उद्घाटनाचा कार्यक्रम होता. पुण्या–मुबईचे सुमारे पंचवीस-तीस कायदेविषयक तज्ज्ञ यामध्ये भाग घेत होते सुरुवातीला डॉ. साठे यांनी उपस्थितांच स्वागत केल्यानंतर यशवंतराव बोलायला उभे राहिले.

परिणामकारक सामाजिक–आर्थिक बदल घडवून राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी राज्यघटना हे प्रभावी साधन आहे, हे सुरुवातीलाच स्पष्ट करून यशवंतराव म्हणाले,

'राज्यघटनेच्या सुरुवातीच्या भागातच या घटनेद्वारे सर्व नागरिकाना न्याय,स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाची हमी देण्यात आली आहे. तसेच देशामध्ये ऐक्य प्रस्थापित करण्याचीही बाधिलकी स्वीकारलेली आहे.

'राष्ट्रीय एकात्मतेला अनेक पैलू आहेत. तसंच ही एकात्मता निर्माण करण्यासाठी काही सास्कृतिक, आर्थिक व राजकीय साधनाचीही आवश्यकता आहे. भारताच्या नागरिकाना धर्माबाबत योग्य व समान हक्क मिळावेत म्हणून घटनेद्वारा या देशात धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करण्यात आला आहे. सर्व धर्माबाबत समान आदर किंवा मान, असा या धर्मनिरपेक्षतेचा अर्थ आहे इथे कोणत्याही धर्माचं राज्य नाही. धार्मिक विषयाबाबत शासन तटस्थतेच धोरण स्वीकारणार असल्याची ग्वाही यामध्ये आहे

'*धार्मिक स्वातंत्र्याबरोबरच आपल्या* घटनेने कायद्यासमोर सर्व नागरिक समान, हे तत्त्वही मान्य केलं आहे. राष्ट्रीय एकात्मता व धार्मिक समानता अबाधित राखण्यासाठी घटनेने प्रत्येक नागरिकाला स्वतःला आवडेल तो धर्म स्वीकारण्याचं आणि त्याचा प्रचार करण्याचं स्वातत्र्य दिल आहे अर्थात यामुळे सार्वजनिक व्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य बिघडू नये यासाठी मात्र काही बधने घटनेमध्ये आहेत. म्हणजेच धर्माच्या नावाखाली कोणीही सार्वजनिक नीतिमत्तेला धक्का पोचवणारी कृत्ये किंवा सतीसारख्या रानटी प्रथेचा अवलंब करू शकणार नाही. त्याचप्रमाणे अस्पृश्यांना मदिरात प्रवेश खुला करण्यासारख्या राष्ट्रीय एकात्मतेला हातभार लावणाऱ्या सामाजिक सुधारणानाही कोणी धर्माच्या नावाखाली विरोध करू शकणार नाही. कारण असं काही करणं म्हणजे धर्माचं मूळ उद्दिष्ट, घटनेतील मथितार्थ आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या व्यापक हेतूविरुद्धच जाण्यासारखं होईल.' ... ..

आपल्या घटनेतली १४, १५ व १६ ही तीन कलमं म्हणजे राष्ट्रीय एकात्मता वाढीला लावण्याच्या आपल्या तीव्र इच्छेची स्वच्छ निदर्शक आहेत, असं सांगून श्री. चव्हाण पुढे म्हणाले,

'या तीन कलमाद्वारे अनुक्रमे कायद्यासमोर समानता, धर्म, जात किंवा लिंगभेदावर आधारित भेदभाव करण्यास मनाई व सार्वजनिक नोकऱ्याबाबत सर्वांना समान सधी बहाल करण्यात आली आहे. मागासवर्गीयाना व जाती–जमातीना पुरेसे प्रतिनिधित्व मिळण्याची तरतूदही आपल्या घटनेमध्ये केलेली आहे, पण केवळ कायदे करून भागणार नाही. या घटकांना समाजातील त्याचं न्याय्य स्थान परत मिळण्यासाठी प्रभावी जनमत तयार करणं आवश्यक आहे तसेच घटनेतल्या १७ व्या कलमानुसार अस्पृश्यता कायद्याने नष्ट करण्यात आली, पण ती प्रत्यक्षात नष्ट होण्यासाठीही जागृत समाज निर्माण करण्याची आवश्यकता आहे. कारण सास्कृतिक व धार्मिक एकात्मता,जातीय सलोखा, लोकशाहीवादी राज्यव्यवस्था व समाजवादी अर्थकारण या चार बाबीचा अंगीकार केल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता साधता येणार नाही.

*आपल्या घटनेने स्वीकारलेला बहुभाषा*-वाद हे घटनाकाराच्या व्यापक दूरदृष्टीचे द्योतक आहे असे स्पष्ट करून श्री चव्हाण म्हणाले, 'घटनेतल्या मार्गदर्शक तत्त्वाचीही संपूर्ण अंमलबजावणी झाल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता व समाजवाद प्रस्थापित करता येणार नाही. मार्गदर्शक तत्त्वं आणि मूलभूत हक्क याच्या कक्षाबद्दल वादग माजण्याची शक्यता पंडित जवाहरलाल नेहरू यानी १९५५ सालीच ओळखली होती. तसेच संपत्तीच्या हक्काला घटनेतल्या मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट केल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्येचाही अंदाज त्याना आला होता. म्हणून या विषयावर आपलं मत

व्यक्त करताना पं. नेहरूंनी असे स्पष्टपणे म्हटले होते की, 'अठराव्या-एकोणिसाव्या शतकातल्या मूलभूत हक्कांविषयीच्या तत्त्वामुळे विसाव्या शतकातल्या समाजवादाच्या आदर्शाकडे आपले दुर्लक्ष होता कामा नये.'

'संपत्तिविषयक हक्काचा जोपर्यंत घटनेतल्या मूलभूत हक्कामध्ये समावेश होता तोपर्यंत देशातल्या आर्थिक-सामाजिक परिवर्तनामध्ये तो मोठा अडथळा होता. कारण गरीब व श्रीमंतांमध्ये देश विभागला गेल्यास राष्ट्रीय एकात्मता साधताच येणार नाही. गरिबी व बेकारीमुळे समाजातला फार मोठा वर्ग मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून अलग पडतो. म्हणून या दोन गोष्टीचे उच्चाटन करून देशातल्या जनतेचे राहणीमान सुधारणे हे प्रत्येक आधुनिक राष्ट्राचे प्राथमिक कर्तव्य आहे. कारण जे गरीब किंवा बेकार आहेत त्यांच्या लेखी लोकशाही-समाजवाद असल्या शब्दाना काहीही किंमत असू शकत नाही. त्यामुळे हे दोन अडथळे वेगाने दूर केले नाहीत तर राष्ट्रीय एकात्मता हे एक कठीण उद्दिष्ट होऊन राहील.'

जवळजवळ अराजकीय स्वरूपाचे यशवंतरावांचे भाषण ऐकण्याचा योग अनेक दिवसानी आला होता आणि आपल्या या भाषणाने त्यानी श्रोत्यांना तृप्तही केले. यशवंतरावाच्या चालण्या-बोलण्यातही एक प्रकारचा नवा उत्साह जाणवत होता. हे शेतकरी दिंडीचे तर यश नव्हे ना?

एक प्रश्न मात्र मला नेहमी भेडसावतो— ही माणसे इतका तर्कसंगत विचार आणि विश्लेषण जर करू शकतात तर मग तीसतीस वर्षं सत्ता हातात असूनही त्या दृष्टीने कृती काहीच का करू शकत नाहीत? यावरही एक विद्वानाचे चर्चासत्र घ्यायला काय हरकत आहे? —प्रतिनिधी

# कम्युनिझम व स्वातंत्र्य

## पोलंड आंदोलनाचे परिणाम

वा. दा. रानडे

"फक्त सरकारच्या समर्थकांना स्वातंत्र्य, फक्त एका पक्षाच्या सभासदाना स्वातंत्र्य—मग त्या पक्षाची सभासदसंख्या कितीही मोठी असो ते खरे स्वातंत्र्य नाही! जो माणूस निराळे विचार मांडतो त्याला स्वातंत्र्य हवे! अमूर्त न्यायाबद्दलच्या आग्रहातून ही कल्पना उद्भवलेली नाही, तर तिला सत्याचा आधार आहे राजकीय स्वातंत्र्यात प्रबोधन करणारे, निकोप आणि शुद्ध करणारे जे जे काही असते ते स्वतंत्रपणामुळेच जन्मलेले असते. स्वातंत्र्य हा काही लोकांचाच खास हक्क बनतो तेव्हा स्वातंत्र्य आपले सारे गुण गमावून बसते!"
—रोझा लक्झेंबर्ग

पोलंडमध्ये जन्मलेली पण नंतर जर्मनीत क्रांतिकार्य केलेली महिला क्रांतिकारक रोझा लक्झेंबर्ग हिचे हे विचार. रोझा लक्झेंबर्ग कम्युनिस्ट होती. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत लेनिनची सहकारी होती; पण स्वातंत्र्याच्याच प्रश्नावर पुढे लेनिनशी तिचे मतभेद झाले, त्यामुळे मॉस्कोप्रणीत कम्युनिस्ट विचारप्रणालीत तिच्या विचाराना महत्त्व राहिले नाही. लेनिनने केलेल्या टीकेच्याच दृष्टिकोनातून तिच्या मताचा विचार जगभरचे कम्युनिस्ट करू लागले व तीच टीका प्रमाण मानू लागले; पण लेनिनशी ज्याचे मतभेद झाले त्याच्या विचाराचा स्वतंत्रपणे अभ्यास होणे आवश्यक असून काही बाबतीत लेनिनची मते चुकीची असल्याचे अशा अभ्यासात दिसून आले, तर ते मोकळेपणाने मान्य करण्याची तयारी मार्क्सवाद्याच्या वस्तुनिष्ठ अभ्यासकानी दर्शवायला हवी. टीका आणि आत्मटीका ही मार्क्सवादी पद्धत, मार्क्स आणि लेनिन याच्या विचारानासुद्धा लावायला हवी. या दोन नेत्यानी मांडलेल्या मूलभूत व शाश्वत स्वरूपाच्या सिद्धातांना त्यामुळेच कोणताही बाध येत नाही; पण त्याच्या विचारप्रणालीत जे तात्कालिक स्वरूपाचे आहे त्याचा नव्या परिस्थितीच्या आणि नव्या प्रश्नांच्या संदर्भात नव्याने विचार करायला हवा; पण असा काही विचार नुसता बोलून दाखविला तरी पढिक कम्युनिस्ट त्यावर 'दुरुस्तीवादी' असा शिक्का मारतात. मार्क्सवादी विचारप्रणालीबाबतही खुले विचारमंथन चालू राहिले पाहिजे. विरोधी किंवा भिन्न विचाराला मनाची कवाडे बंद करायची, तो विचार आपल्या लोकांपुढे येऊच द्यावयाचा नाही किंवा मांडला तरी त्याच्यावर प्रतिगामित्वाचा शिक्का मारून विकृत किंवा विपर्यस्त स्वरूपात तो मांडावयाचा अशी कम्युनिस्ट देशातील प्रचारपद्धती असते, कम्युनिस्ट सत्ताधाऱ्याना निराळ्या किंवा विरोधी विचारांची एवढी भीती का वाटते? वैचारिक पातळीवर त्यांनी या विचारांचा फोलपणा किंवा त्यातले दोष दाखवावेत; पण असे विचार दडपून टाकण्याची आवश्यकता रशियन कम्युनिस्ट क्रांतीला ६३ वर्षे झाल्यानंतरही तेथील राज्यकर्त्यांना का वाटावी? विरोधी विचारप्रकटनाला वाव दिला तर त्यातून कम्युनिस्ट पद्धतीलाच धोका निर्माण होईल ही भीती त्यांच्या मनातून अजूनही गेलेली नाही असाच त्याचा अर्थ होतो.

पण स्वतंत्र विचाराचे हे वारे आता कम्युनिस्ट राज्यकर्ते फार काळ थोपवू शकणार नाहीत हे पोलंडमधील आंदोलनाने दाखवून दिले आहे, कम्युनिस्ट पक्षाच्या आणि सरकारच्या नियंत्रणाखाली नसलेली स्वतंत्र कामगार संघटना प्रस्थापित करण्याचा हक्क तेथील कामगारानी मिळविला आहे ही लाट पूर्व युरोपातील इतर देशात येईल का? व रशियालाही त्याची झळ लागेल का ही चिंता कम्युनिस्ट राज्यकर्त्यांना सध्या त्रस्त करीत आहे.

रशियाचे एक अभ्यासक Isaac Deatscher यानी सेव्हिएट ट्रेडयुनियन्स्संबंधी एक पुस्तक लिहिले आहे. हे लेखक कम्युनिझमविरोधी असल्याने त्याच दृष्टिकोनातून त्यांच्या पुस्तकांकडे कम्युनिस्ट समीक्षक पाहतात; पण पुस्तकातील एकांगी भूमिका बाजूला ठेवून त्यात वस्तुनिष्ठ काही

मलपृष्ठ २ वर

## भा. ज. प. अधिवेशन

# ' आज तुम्ही आसामबद्दल जो चर्चा करता आहात तशीच चर्चा उद्या गुजराथबद्दल करण्याची वेळ येऊ नये म्हणून तुम्ही काय करणार आहात ? '

### माझा हा प्रश्न अनुत्तरितच राहिला. . . प्रतिभा रानडे

वांद्र्याच्या रेक्लमेशन ग्राउंडस्वर एक मैल वाय अर्ध्या मैलाच्या जागेवर ' समतानगर ' हे टुमदार शहर वसलेलं होतं. प्रशस्त रस्ते, ऐसपैस राहण्याची ठिकाणं. स्वच्छता, टापटीप सगळीकडेच. इथले सगळेच कार्यक्रम कसे नीटनेटके, सुबक, वेळच्या वेळी पार पडत होते. कुठेही गडबड गोंधळ नाही. इथे वस्तीला अठरा ते वीस हजार लोक येतील अशी अपेक्षा असताना, चौपन्न हजार लोक इथे आले तरीही इथला नेटकेपणा बिघडला नव्हता. आपापल्या छोट्या वळकट्या आणि ट्रंका घेऊन अठरापगड जातीचे, बहुभाषिक लोक हजारोंच्या संख्येने सतत येत होते आणि ' समतानगर ' त्यांना अदबीनं आपल्यात सामावून घेत होते. त्यांच्या राहण्याची, जेवणाखाण्याची व्यवस्था करीत होते. लोकसंग्रहाचे उद्धट आणि बाष्कळ प्रदर्शन कुठेही नव्हते.

प्रेसगॅलरीमध्ये गर्दी खूप होती. दोन-चार ओळखीचे चेहरे सोडून दिल्यास मला सगळेच लोक अनोळखी. म्हणून मग भा. ज. प. च्या प्रसिद्धिखात्यात जाऊन चौकशी केली. बहुतेक सगळे वार्ताहर मुबई-पुण्याचेच, सर्व मुख्य वृत्तसंस्थेचे प्रतिनिधी महत्त्वाच्या वृत्तपत्राचे प्रतिनिधी आले होते; पण परदेशी वृत्तसंस्थेकडून कोणीच आले नव्हते ! खरे म्हणजे इंदिरा गांधींना हरवण्यात यश आलेल्या, जनता पक्षात फाटाफूट पडून नवीन जन्म घेतलेल्या या पक्षाचे हे पहिले राष्ट्रीय अधिवेशन होते. या नवीन पक्षाचे लागेबांधेही जगजाहीर आहेत. म्हणून या अधिवेशनाला महत्त्व होते; पण परदेशी वृत्तसंस्थाना त्यामध्ये उत्कंठा नव्हती. B. B. C. च्या मार्क तुलीने येईन असे कळवून तो स्वत. आला नव्हताच; पण त्याने आपल्यातर्फे कुणाला पाठवलेही नव्हते. श्री. वाजपेयींशी बोलताना मी त्याना विचारले, ' सगळे आपलेच वार्ताहर आलेत इथे. परदेशी वार्ताहर यात कोणीही नाही. असं का झाल असावं ? या अधिवेशनाचं महत्त्व त्याना वाटत नसेल की...'

माझ्या प्रश्नाचा रोख पाहून श्री. वाजपेयी मिनिटभर माझ्याकडे बघत राहिले. ते काही उत्तर द्यायच्या आतच शेजारचा कोणी म्हणाला, ' वा वा, महत्त्व कसं वाटत नाही त्याना ? महत्त्व वाटतं म्हणून तर त्यांनी आज टी. व्ही. वरचा जुना सिनेमा बदलून नवा सिनेमा दाखवणार आहेत ते...'

वाजपेयींनी उत्तर देण्याचा क्षण हुकला होता, तो नंतर हुकलेलाच राहिला.

¤

प्रत्यक्ष अधिवेशन सुरू होण्यापूर्वी आठवडाभर, मुंबईभर भारतीय जनता पक्षाच्या आगामी अधिवेशनाच्या पताका लागल्या होत्या. फोर्ट वगैरेसारख्या गर्दीच्या ठिकाणी भा. ज. पक्षाच्या गाड्या हिंडत होत्या, कर्ण्यांमधून अधिवेशनाच्या ललकाऱ्या दिल्या जात होत्या; पण त्या वेळी भाजीवाल्याचा संप, पाण्याचा दुष्काळ, दूधबाटलीवाल्याचा होऊ घातलेला संप यामुळे सर्वसाधारण मुबईकर एवढा त्रासलेला होता की, त्या पताकाकडे, त्या ललकाऱ्याकडे एखादा दृष्टिक्षेप टाकण्यापलीकडे तिकडे कुणाचेच लक्ष गेले नव्हते; पण २८ दिनाकाची नेत्रदीपक शोभायात्रा निघाली आणि सर्वांचे लक्ष समतानगरकडे खेचले गेले. या समतानगराच्या दीनदयाळ सभागृहात तीन दिवस भा. ज. प. च्या अधिवेशनाचा सोहळा मोठ्या शानदार रीतीने पार पडला. (दि. २८, २९, ३० डिसेंबर १९८०) अटलबिहारी बाजपेयी, लालकृष्ण अडवानी, सिकदर बख्त, जेठमलानी. छगला याच्यासारख्या खंद्या वक्त्याची जोरदार भाषणे झाली. आपसातील कुरबुरी मोठ्या कौशल्याने हाताळल्या गेल्या आणि भा. ज प च्या नवीन सामर्थ्याचे दर्शन घडले.

आणि या गोष्टीचा ठसका ज्याना लागायचा त्याना लागलाच ! इकडे भा. ज. प. च्या अधिवेशनाचे सूप वाजत होते त्याच वेळी आपल्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी जालंदर येथे म्हणाल्या, ' ज्यानी आतापर्यंत गांधींचा फक्त द्वेषच केला, ज्याच्या द्वेषामुळेच गांधींची हत्या झाली, तेच लोक आज गांधीवादाचा पुरस्कार करत आहेत. गांधीवाद म्हणजे काय ते या लोकाना कधीच कळणार नाही ! वगैरे....'

अर्थातच गांधीवादाची मालकी काही कुणा एकाकडेच असू शकत नाही. एकदा त्याना राष्ट्रपिता म्हणून मान्य केल्यानतर कुणीही त्यांच्यावर हक्क सांगावा, अधिकार गाजवावा; पण ही गोष्ट इतकी सरळ, साधी, सोपी नाही भा. ज. प. ने गांधीवादी समाजवादाचा अंगिकार केल्याचा जसा इंदिराजींना राग आला, त्याप्रमाणेच राजमाता शिंदे याही नाराज झाल्या भा. ज. प. चे इतरही अनेक

कार्यकर्ते नाराज झाले तो एक आपापसातील भांडणाचा विषय झाला.

भा. ज. प. ने गाधीवादी समाजवादाचा पुरस्कार करणे ही वस्तुस्थिती सर्वसाधारणपणे सर्वांनाच खरोखरच एक अत्यंत आश्चर्यजनक गोष्ट वाटते. जनता पक्षाची स्थापना ज्या परिस्थितीत झाली, ज्या परिस्थितीत जनता पक्ष मोडला, त्यानंतरची भा ज प. ची स्थापना हा सगळा इतिहास लक्षात घेऊन आणि अटलजींची त्याबाबतीतली वक्तव्ये नीट तपासून पाहिली तरी सुद्धा भा. ज. प. ने गांधीवादी समाजवादाचा अंगिकार केल्यानतर त्यावर कुणाचाही विश्वास बसणे कठीणच. अटलबिहारी बाजपेयी, जेठमलानी, सिकंदर बख्त वगैरे नेतेमंडळी सभागृहात प्रचंड जनसमुदायासमोर कठरवाने सागत होती की, आता आमचा व राष्ट्रीय स्वयसेवक संघाचा, पूर्वीच्या जनसंघाचा काहीही संबंध नाही. भारतीय जनता पक्ष हा एक स्वतंत्र अस्मितेचा, स्वयंपूर्ण पक्ष आहे आणि त्याच दिवशी दुपारचे जेवण आटोपून हजारोच्या संख्येने पुन्हा सभागृहात जाताना त्या गर्दीतलेच एक संभाषण माझ्या कानावर पडले—

कुठून तरी आलेला एक प्रतिनिधी दुसऱ्याला म्हणत होता, 'इन लोगोने संमेलनका इंतजाम बहुतही बढिया किया है ना ? किस चीजकी कमी नही छोडी है, भरपूर व्यवस्था की है.'

त्यावर दुसरा उत्तरला, 'आर. एस्. एस्. के परंपराके अनुसारही सारी व्यवस्था की हुआी है उसमे तो कोई गलतिया रह नही सकती.'

केवढा विरोधाभास हा !

मग हा गाधीवादाचा अट्टाहास कशासाठी ? पहिले कारण असे असू शकते की, वाजपेयी वगैरे नेत्यांचा खरोखरच सघाबद्दल, जनसंघाबद्दल भ्रमनिरास झाला असावा आणि त्याच वेळी गाधीवादाबद्दल भ्रामक कल्पना तयार झाल्या असाव्यात. पहिला मुद्दा स्वागतार्हच म्हणावा लागेल, दुसरा मुद्दा मात्र चिंताजनक आहे. एकीकडे भारतामध्ये वेगवान औद्योगीकरण चालू झाले असताना, विसाव्या शतकाच्या अखेरीला आपण येऊन पोचलो असताना, गाधीवादी समाजवाद आणू म्हणणे म्हणजे ही गोष्ट फारच बाळबोध वाटते, चमत्कारिकही वाटते, कालबाह्य वाटते.

पण आणखी विचार करता दुसरीही एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे गाधीवादाबद्दलच्या या चर्चेच्या मुळाशी कोणताही 'वाद' नाहीच आहे. त्याच्या मुळाशी आहेत 'गाधीजी.' अजूनही 'गाधीजी' या शब्दाभोवती जे वलय आहे, ते वलय हजारो लोकाना आपल्याकडे आकर्षित करू शकते. त्याचा फायदा घेण्यासाठी तर भा. ज. प. ने अंतर्गत विरोध असूनही 'गाधीवादी समाजवाद' आणण्यासाठी कटिबद्ध होण्याचे ठरवले नसेल ? तसे असेल तर त्याचा तो हेतू बऱ्याच प्रमाणात सफल झालेला दिसत होता. कदाचित 'गाधीवाद' आणि 'समाजवाद' या दोन्ही शब्दामुळेही असेल; पण त्या प्रचंड जनसमुदायामध्ये पाढऱ्या टोपीवाल्याची सख्या जशी भरपूर होती, त्याचप्रमाणे क्रिकेटियर्स घालतात त्या डिझाइनच्या केशरी रगाच्या टोप्या घातलेली तरुण मुलेही मोठ्या संख्येने उपस्थित होती आणि खादीचा कुडता—पायजमा घालून, खाद्यावर शबनम पिशव्या लटकावलेली मंडळीही बरीच होती. आपल्यामोवती भरपूर भगतगणांचा मेळावा भरावा म्हणून जुन्याच मूर्तीवर नवा शेंदूर थापायचा, हा खटाटोप करण्याऐवजी नवीन दैवतंच का निर्माण करू नवेत ! भारतीय जनता पार्टीने हे आव्हान का स्वीकारू नये ? एकुलता एव प्रबळ विरोधी पक्ष असे ज्याचे वर्णन करता येईल, त्या भारतीय जनता पार्टीने हे धारिष्ट दाखवायला नको का ?

## ठेच लागते ती तिथे

समाजवादाची, गाधीवादाची, राष्ट्रीय स्वयसेवक संघ, जनसंघ याबद्दलची ही सगळी चर्चा ठेचकाळते ती एकाच ठिकाणी. पोलिटिकल मायनॉरिटीवर हक्क सागणाऱ्या आपल्या मुस्लिम बांधवाबद्दलच्या धोरणाबद्दल भारतातल्या सगळ्या पक्षाच्या मुसलमानसंबंधीच्या धोरणाचा विचार केला की 'अवघड जागी दुखणे आणि जावई वैद्य' या म्हणीची आठवण येते. मुस्लिमांबद्दल रोखठोकपणाने बोलणे हे कुणालाच परवडत नाही. तस बोलल तर जातीयवादाचा, प्रतिगामीपणाचा डाग तर लागतोच; पण En-Block मिळणारी त्याची मतेही गमावून बसण्याची खात्रीच असते. हा धोका कुणालाही पत्करायचा नसतो, म्हणून मग या नाही त्या मार्गाने, 'आम्ही मुसलमानाचे खरे दोस्त, हितकर्ते असून विरुद्ध पक्षाचे लोकच मुस्लिमाचे शत्रू आहेत, नुकसानकर्ते आहेत,' असं म्हणायची सर्वांची चढाओढ लागते

अशा वेळी मला आमच्या लहानपणी वाचलेल्य एका गोष्टीची आठवण येते. एका जंगलात एक नागराज रहात होता. त्याच जगलात गुराख्यांची पोरं आपली गुरंढोरं चरायला घेऊन येत. नागाला पाहूनच घाबरून ती पोरं त्याला लाबून दगड मारायची नाग लगेच उलटून त्या पोराना, गुराढोराना दंश करायचा. तेव्हा ती पोरं जंगलातल्या साधूकडे, त्या नागाबद्दल तक्रार घेऊन गेली. साधूला त्या बिचाऱ्या असहाय गुराख्याच्या पोराची दया येऊन त्याने नागाला आज्ञा केली की, यापुढे त्याने त्या पोरांना किंवा गुराढोराना मुळीच त्रास देता उपयोगाचा नाही ! नागाने साधूची आज्ञा शिरसा वंद्य मानली. आता नाग काहीच करीत नाही हे पाहून गुराख्यांच्या पोरानी त्याला त्रास द्यायला सुरुवात केली गुराच्या पायदळी नाग चिरडला जाऊ लागला गुराख्यांनी मारलेले दगड, काठ्या सहन करू लागला. रक्तबंबाळ झाला बिचारा ! शेवटी हे सगळं असह्य होऊन नाग साधूकडे गेला. त्याला सगळी हकीगत सागितली. लोळागोळा होऊन गेलेल्या त्या नागाची हकीगत ऐकून साधू त्याला म्हणाला, 'अरे, मी तुला सांगितलं की, गुराख्याच्या पोरांना, गुराढोराना तू दंश करू नकोस म्हणून; पण जर तीच तुला मारू लागली तर ते तू सहन कशाला करतोस ? उलटून तू त्याना दंश करू नकोस; पण फुस्सकरायचा अधिकार निश्चितच तुलाआहे !' त्यानंतर मग नागराज साधूच्या म्हणण्याप्रमाणे त्याला मारणाऱ्या पोरावर फुस्सकरून जाऊ लागताच, ती पोरं नागाच्या वाटेला जाईनाशी झाली आणि मग त्या जगलात तो नागराज आणि ती गुराख्यांची पोरं, गुरढोरं सुखानं राहू लागली. अशी ही गोष्ट आहे. या गोष्टीची आठवण झाली की मनात येतं आम्ही आमचा फुस्सकरण्याचा अधिकार वापरणार आहोत की नाही ?

याच संदर्भात ज्येष्ठ-श्रेष्ठ कायदेपंडित श्री. छगला याचे भाषण अत्यत उद्बोधक झाले. खरे म्हणज न्यायमूर्ती छगलानी जे सांगितले

ते, अटलबिहारी वाजपेयी यांनीच एका समर्थ विरोधीपक्षाचे अध्यक्ष या नात्याने सांगायला काय हरकत होती? छगला आपल्या भाषणात म्हणाले होते, 'जे देशविभाजन टाळता येण्यासारखे होते ते न टाळता एकदा पत्करल्यानंतर, लोकशाहीमध्ये कुणालाही पोलिटिकल मायनॉरिटीज्चे हक्क मिळता उपयोगाचे नाहीत. धर्म ही प्रत्येकाची आपापली वैय्यक्तिक बाब आहे; पण लोकशाहीमध्ये समान भाषा, समान संस्कृती आणि समान कायदा असायलाच हवा!'

या बाबतीत एवढ्या विस्ताराने लिहिण्याचे कारण भा ज. प. च्या अधिवेशनामध्ये कायदा आणि सुव्यवस्था याबद्दल सरकारवर टीका करताना प्रत्येक वक्ता पुन्हा पुन्हा मुरादाबाद, अलिगढ, आसामचे संदर्भ देत होता. श्री. सिकंदर बख्त आपला प्रस्ताव मांडताना म्हणाले, 'जामामशिदीचा परिसर, मुजफ्फरनगर इथे झालेल्या गोळीबारात ज्या इंदिरा गांधींचे हात मुस्लिमांच्या रक्ताने माखलेले आहेत, त्यांना आज अचानक आसामच्या मुस्लिमांचे एवढे प्रेम का? पश्चिम बंगाल सरकारने एके काळी पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांना प. बंगालमधून हाकलून दिले होते, दंडकारण्यात ढकलून दिले होते त्याच प. बंगालला आज आसाममधल्या मुस्लिमांचा एवढा कळवळा का?'

दिल्ली कार्पोरेशनचे मौलाना फकिरुद्दीन म्हणाले की, 'इंदिरा गांधींच्या सरकारने आम्हा मुस्लिमांना दिलेली सगळी आश्वासनं मोडली आहेत. धार्मिक शांती राखणं हे सरकारचं काम आहे, ते काय भा. ज. प. चे काम आहे? भा. ज. पक्षच आम्हाला समजून घेईल अशी ग्वाहीही मौलानासाहेबांनी दिली.

परंतु सिकंदर बख्त, मौलाना फकिरुद्दीन यांच्यासारखे बोटावर मोजण्याइतकेच मुसलमान भा. ज प चे सदस्य झाले आणि भा ज. प. ने गांधीवादाचा अंगीकार केला म्हणजे मुस्लिमांचा प्रश्न सुटणार आहे का? तसे असते तर मौलाना आझाद, फक्रुद्दिन अली अहमद, डॉ. झाकीर हुसेन, डॉ. हुमायूं कबीर यांच्यासारख्या मुस्लिम कॉंग्रेसी सदस्यांमुळे आणि गांधी-नेहरूंसारख्या त्यांच्या पाठिराख्यामुळे तीस वर्षांपूर्वीच हा प्रश्न सुटायला हवा होता; पण हा प्रश्न न सुटता जास्त चिघळत मात्र चालला आहे. कारण त्याकडे पहाण्याचा आपला दृष्टिकोनच गल्लत करणारा आहे.

अफगाणिस्थानात असताना एका इंडोनेशियन जोडप्याची ओळख झाली होती. ते धर्मानं मुसलमान होते. त्या लोकांचं रामायणाचं ज्ञान आणि लक्ष्मण, सीता, मारुती यांच्याबद्दल त्यांना वाटणाऱ्या प्रेमाबद्दल मी काही नव्यानं लिहायलाच नको. 'तुम्ही मुसलमान असताना, तुम्हाला आमच्या हिंदू देवदेवतांबद्दल एवढं प्रेम कसं काय?' या माझ्या प्रश्नाला उत्तर देऊन त्यांनी माझा प्रश्न अगदीच बाळबोध ठरवला होता ते लोक म्हणाले होते, 'धर्म ही आमची खासगी, वैयक्तिक बाब आहे. आमचा देव अल्ला हाच आहे राम, सीता ही काही आमची दैवतं नव्हेत; पण ते आमच्या राष्ट्रीय संस्कृतीचे मूळ आधारस्तंभ आहेत. रामसीतेचं गुणगान करून आम्ही जीवनातल्या महान मूल्यांचं गुणगान करतो. त्यात धर्माचा संबंधच आला कुठे?'

वैयक्तिक धर्म आणि राष्ट्रीय संस्कृतीचा वारसा या दोन गोष्टी वेगळ्या आहेत या लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी आहेत, पण मतदानाच्या पेटीमध्येच ज्यांचे प्राण अडकून पडलेले असतात त्यांना या गोष्टी कळतील का?

पहिल्याच दिवशी जेवणाच्या वेळी श्री. अडवाणींशी बोलण्याची संधी मिळाली. गेल्याच महिन्यात मी सोमनाथ, द्वारका पाहून आले होते. तिथून पाकिस्तानची हद्द अगदी जवळ कुठे कुठे तर फक्त १५ मैलावर समुद्रमार्गे पाकिस्तानची हद्द लागते. छोटया बोटीतून, मच्छीमारलोकांची आणि त्यापाठोपाठ इतरही लोकांची जा–ये सतत सुरू असते. आपले लोक तिथे जाऊन चिंच, शेंगदाणे वगैरे विकतात आणि परत येताना परदेशी वस्तू घेऊन येतात. त्याचप्रमाणे पाकिस्तानी नागरिकही इथे येताना परकीय वस्तू विकायला आणतात; पण ते नंतर परत मात्र जात नाहीत. अशा तऱ्हेने त्या भागात परकीय नागरिकांची आवक खूपच वाढत आहे जशी आसाममध्ये आज स्थिती आहे तशीच स्थिती आणखी दहा वर्षांनी गुजरातमध्ये होणार आहे, याची स्पष्ट चिन्हें आज तिथे दिसत आहेत.

ही सगळी परिस्थिती अडवाणींना सांगून मी म्हटलं, 'आज तुम्ही आसामबद्दल जी चर्चा करता आहात, तशीच चर्चा उद्या गुजराथबद्दल करण्याची वेळ येऊ नये म्हणून तुम्ही काय करणार? त्या परिस्थितीची कल्पना आहे ना तुम्हाला?'

श्री. अडवाणी म्हणाले, 'गुजराथच काय पण आणखीही राज्यातून अशा गोष्टी घडत आहेत, त्याची पूर्ण जाणीवही आहे आम्हाला, पण काय करणार? आपलं सगळं राजकारण मतदाराची खुशामत करून चालतं...'

'पण तुम्ही त्या बाबतीत...की तुम्हीही...'

माझा प्रश्न अनुत्तरितच राहिला. कारण अडवाणींनी मोठ्या चवीनं पापड खायला सुरुवात केली होती ..

## महिला संमेलन

राष्ट्रीय पातळीवर विचार करताना महिलांच्या प्रश्नाकडे नेहमीच दुर्लक्ष होतं. तसंच दुर्लक्ष भा. ज. प च्या महिला अधिवेशनाकडेही झाले. अपुरी जागा, सतत त्रास देणारे माइक्स, बराचसा गबाळा कारभार होता तिथे. पतियाळाच्या राजमाता आणि ग्वाल्हेरच्या राजमाता सिंदिया, (शिंदे हे आडनाव न लावता सिंदिया असं नाव लावणाऱ्या या राजमातेनं 'मम्मी डॅडी– कल्चरची निर्भर्त्सना केली.) या दोघी राजघराण्यातल्या बायकांना प्रत्यक्ष बघण्याचं आणि त्यांचं भाषण ऐकायला मिळाल्याचं कौतुक अधिवेशनाला आलेल्या बायकांच्या चेहऱ्यावरून नियळत होतं या दोन्ही राजमातांमध्ये वावरलेल्या दुर्गाबाई भागवत बसल्या होत्या.

'फूल नहीं चिंगारी हैं, हम भारतकी नारी है' अशा दमदार घोषणा देणाऱ्या बायकांपुढे या दोघी राजमाता थोर भारतीय संस्कृती, परंपरा, भारतीय स्त्रीत्व, पवित्र मातृत्व यांचे गोडवे गात होत्या. जिजाबाई, झांशीची राणी, अहल्याबाई, चांदबिबी, पन्नादाई या स्त्रियांचे महत्त्व त्यांनी विशद करून सांगितले. व्यासपीठावरून सतत भारतीय स्त्रीत्वाचेच गुणवर्णन चाललेले होते. जेव्हा एका स्त्रीनेच सगळ्यांना दातो तृण धरायला लावलं होतं आणि आहे, अशा वेळी स्त्रीत्वाचेच गोडवे कसले गायचे, ते काही मला कळलं नाही

पृष्ठ २३ वर

# सावित्री महाराष्ट्र जागवून गेली

प्रा. गोपाळ दत्त कुलकर्णी

'जिजा, अहिल्या, लक्ष्मी, सावित्री आणि ती रमा।
पंचकन्या स्मरा नित्य, धैर्य येण्यास उत्कट ॥'

–(दत्तकुमार)

मराठी माणसाचे भाग्य असे की, सह्याद्रीच्या कुशीत हिमालयाच्या कर्तृकीची माणसे निपजली; पण त्याचा गौरव करण्यास खुद्द मराठी माणूसच का कचरतो कळत नाही! वरील श्लोकातील पंचकन्या ह्या महाराष्ट्राच्या स्त्रीत्वाचा मानबिंदू आहेत. त्यापैकी सावित्रीबाई (नव्हे देवी) फुले एवढ्या पतिपरायण होत्या की, विसाव्या शतकातील शिक्षित व अर्धवट-आधुनिक स्त्रीला भारतातील स्त्री-मुक्तीची पहिली उद्गाती सावित्रीबाई होत्या हे सांगून पटणार नाही. स्त्री-प्रेषित असतात की नाही मला माहिती नाही; परंतु सावित्रीबाई ह्या प्रेषित (किंवा प्रेषिता) होत्या. ज्योतिबांना क्रांतिबा म्हणतात; पण ज्योतिबाचा पहिला क्रांतिकारक प्रयोग विवाहानंतर सावित्रीबाईंना साक्षर करणे हा होता. एवढे भाग्यवत तेवढेच समाजसन्मुख व 'समाजसुख'दक्ष जोडपे परमेश्वराने दलिताच्या-पीडितांच्या अन्याय-निवारणार्थ पाठवावे हे भारताचे भाग्य! पुराणातील सावित्रीने मृत सत्यवानाचे प्राण परत आणले. या ज्योतिबांच्या अर्धांगी सत्यवती-सावित्रीने जीवन्मृत दलिताच्यात ज्ञान-मंत्र उच्चारून प्राण फुकले. प्रत्येक पुरुष यशस्वी व्हायचा असेल तर त्याला एक 'फुल-टाइम' पत्नी हवी. (म्हणजे त्याची पत्नी, प्रेयसी, सखी, माता, रंभा, सचीव म्हणून) डॉ. मार्गारेट मीडनी हे तत्त्व सावित्रीबाई गेल्यानतर जवळजवळ शभर वर्षांनी माडले त्याआधी महाराष्ट्रात पुणे मुक्कामी सावित्रीबाई तो वसा वागवून ममाजासाठी झिजत होत्या. तुकाराममहाराजाच्या अभगातील 'ऐसी कळवळ्याची जाती' म्हणजे सावित्रीबाई फुले! दुर्दैव या देशाचे आणि इतिहासाचे की, भारतातील समाजसुधारकांच्या यादीत राजा राममोहन राय, विद्यासागर ही बंगाली नावे प्रथम येतात; पण महात्मा फुले, हे नाव जेवढ्या प्रकर्षाने तळपायला हवे तेवढे तळपत नाही. सावित्रीबाईंचे नावच काढत नाही कुणी! सत्यशोधक समाजाच्या नावाने मतलबी आक्रोश करणाऱ्या राजकारण्यांना ह्या असल्या कामासाठी वेळ नाही.

मातोश्री सावित्रीबाई ज्योतीराव फुले याची १५० वी जयंती नुकतीच पार पडली. (सावित्रीबाईंचे निधन १८९७ साली झाले. त्या जाऊनही ८५ वर्षे होत आली.) श्री. म. माटयाच्या एका कथेचे शीर्षक आहे 'सावित्री मुक्याने मेली!' पण ही सावित्री महाराष्ट्र देश, दलित आणि स्त्रियांना जागवून गेली. २ जानेवारी १८३१ हा त्याचा जन्मदिवस. कवठे गावच्या या चापयाचा ज्योतिबाशी विवाह झाला. हा विवाह म्हणजे 'फुलाने' सुगंधाशी संलग्न होणे! पुण्यातील बामणहरीच्या, विशेषेकरून उच्चजातीय स्त्रियांच्या शेणसड्याला न जुमानता ह्या सावित्रीने वयाला वीस वर्षे होण्यापूर्वी (१८४८ साली) भारतातील पहिली शाळा चालविली; बिनपगारी आणि अंगभर खातेरे मिरवत. सत्यं शिवं सुदरम् विरुद्ध घोषणा देणाऱ्या महिला-मंडळीना, मोदक-बटाटेवड्याच्या स्पर्धा लावणाऱ्या शहरी मंडळ-ग्रस्त महिलाना, १३० वर्षांपूर्वी कर्मठपणाचे बुरसट पीठ असणाऱ्या पुण्यात एका ब्राह्मणेतर स्त्रीने शाळा चालविणे म्हणजे काय दिव्य होते, याची कल्पना करणेही कठीण आहे. (बदल म्हणून मडळानी ही 'कल्पना करण्याची' स्पर्धा लावावी!) प्रत्यक्ष सासरे गोविंदराव फुल्यांनीही त्याना विरोध केला होता. हरी नारायणांच्या कादंबरीतील यमू रात्री चोरून नवऱ्याकडून शिकते; पण बहाद्दर जोतिबांनी सावित्रीला राजरोस शिकविले, एवढेच नव्हे तर इतर मुलीना शिकण्यास लावले. दलितासाठी केवळ पाण्याचा हौदच नव्हे तर ज्ञानाचा हौदही या जोडप्याने खुला केला. इतराना मुक्त करण्यासाठी माणूस स्वत: मुक्त असावा लागतो! सावित्री उपजतच मुक्त होती! ज्या काळी 'मालाकार' चिपळूणकर रांगत होते, न्या. रानडे अल्लड होते, प्रि. आगरकर, लो. टिळक, महर्षि कर्वे, पं. रमाबाई व गांधीजी जन्माला यायचे होते, त्या वेळी फुल्याच्या घरातील सून शाळा चालवत होती. पेशव्यांना पूजेसाठी फुले देणारे, आता दरिद्री-नारायणाची अक्षर-सुमनाची पूजा बाधत होते. शिकले की नवरा मरतो, अक्षरे काढली तर त्याच्या आळ्या होऊन अन्नात पडतात असे प्रचंड हितसंबंधी थोतांड रचण्याचे ते दिवस होते.

महात्मा फुले आधुनिक काळातले पहिले महात्मा होते. रे मार्केटचे फुलेमार्केट असे नामकरण महात्मा गाधीच्या हस्ते झाले, त्या वेळी गाधीजीनी ओशाळून म्हटले होते, 'खरा महात्मा जोतीबा, मी कसला महात्मा?' पण इतिहासाच्या दृष्टांताने सांगायचे तर जोतीराव सुधारकांचे शहाजीराजे होते, तर सावित्रीदेवी जिजाबाई! भारतातील पहिल्या मुलीच्या शाळेच्या संस्थापक शिक्षिकेच्या नावे, खरं तर राष्ट्रपती किंवा राज्यपुरस्कार, उत्तम स्त्रीशिक्षिकेस दरवर्षी दिला जावा; पण इथे सावित्रीबाई म्हणजे कोण हे विचारणारे अधिक! हे जोडपे साक्षर समकालिनाकडून घनघोर उपेक्षित राहिले. जोतीबाच्या मृत्यूची वार्ता 'केसरी'त आली नाहीच नाही, पण आगरकरांच्या 'सुधारका'तही आली नाही! सावित्रीबाईंना अजूनही मान्यता मिळालेली नाही; हे कदाचित मराठी बुद्धिवादीपणाचे (?) आणखी एक उदाहरण! ही बाई एवढी धम्माल की ब्राह्मण स्त्रियाना केशवपनासारख्या बीभत्स व विद्रूप रूढीला बळी पडू लागू नये म्हणून जोतिबांकरवी त्यांनी पुण्या–मुबईच्या न्हाव्याचा सप घडवून आणला! वर वृत्ती एवढी पतिनिष्ठ की 'नेकी कर और पानीमे

डाल' अशी अलिप्त वागणूक अंगवळणी पडलेली. उच्चवर्णियांचे कर्मकांड (त्यात स्त्री-शिक्षणाला विरोध आलाच), सती जाणे, केशवपन, विधवांची बाळंतपणे व लज्जास्पद गर्भपात, बाला–जरठ विवाह या सर्वाविरुद्ध मोहिमा यशस्वी करून, वरती 'माझ्या-हातून जे घडले ते देवाचे कार्य' म्हणून मोकळ्या! तिकडे जोतीराव म्हणत, 'माझ्या करवी झालेल्या कार्याचे कारण सावलीप्रमाणे साथ देणारी पत्नी सावित्री!' – मदर टेरेसाना गेल्या वर्षी नोबेल पारितोषिक मिळाले; परंतु बालहत्याप्रतिबंधकगृह सावित्रीबाईंनी २८ जानेवारी १८५३ साली चालविले होते. कोणत्याही जाती–वर्णाच्या अडलेल्या विधवांची बाळंतपणे स्वत:चे 'मूल' नसलेल्या सावित्रीबाईंनी मायेने केली. शंभर विधवांची गुपचुप बाळंतपणे केली. काशी (कुलकर्णी) नावाच्या जीव देण्यास निघालेल्या तरुण विधवेचे 'पाप' तर त्यानी 'पुण्य' समजून पदरात घेतले. वरती त्या मुलाला 'यशवंत' मानून फुले–दांपत्याने दत्तक घेतले! गेल्या दीडशे वर्षात, मला वाटत नाही, महाराष्ट्रात एवढे धाडस कोणी केले असेल! त्यानी पहिला विधवा–विवाह १८७३ मध्ये घडवून आणला. 'लिज्जत पापड' निर्मिती यासारखे महिला सहकारी लघु-उद्योग आता भरभराटले; पण सावित्रीबाईंनी पदरमोड करून १२० वर्षांपूर्वी असे उद्योग गरीब दलित स्त्रियाना पुरवून लष्कराच्या भाकरी भाजल्या. शेणसडा सोसला, रोज शाळेत-वर्गात जाण्यापूर्वी आंघोळ करून, लुगडे बदलून शिकविले! तुकारामाना देहूला एक मंबाजी निंदक शेजारी होता; परंतु कबीराच्या अलिप्ततेने सावित्रीबाईंनी पुणेरी 'निंदक नियरे' राखले. गीतेत 'स्त्रियो वैश्या. तथा शूद्राः' याचा उल्लेख आहे. सावित्रीबाईंनी यापैकी स्त्रिया व शूद्र याना 'उद्धरेदात्मनात्मानम्' चे तत्त्व आचरायला शिकविले. सावित्रीबाईंच्या मृत्यूनंतर एक हाती स्त्री–मुक्ति व विमोचनाची चळवळ कोणीच चालविली नाही. उलट स्त्री–मुक्ती-चळवळी पुरुषावलंबी झाल्या 'सफ्राजेट' चळवळ इंग्लंडात बायकानी बायकासाठी चालविली. भारतात तिची पहिली आणि अखेरची धुरा सावित्रीदेवींनी वाहिली. महर्षि कर्वे याच्या पहिल्या विद्यापीठाचे ध्येयवाक्य 'संस्कृता स्त्री पराशक्ति!' असे आहे; पण त्या सुभाषिताचे चित्र काढायचे झाले तर सावित्रीबाईंचे रूप आठवायला हवे. अंगीकृत कार्य आणि कुटुंब दोन्हीही कसे सव्यसाचीपणे सांभाळता येते याची मूर्ति म्हणजे सावित्रीदेवी फुले! 'जे जे भेटेल भूत। ते ते जाणिजे भगवंत' हे आचरणारी प्रेमळ, सोशिक तेवढीच पराक्रमी स्त्री आधुनिक भारताच्या इतिहासात सापडणार नाही! (कस्तुरबाही थोर होत्या; मात्र त्याना सावित्रीबाईप्रमाणे एवढे समाजाकडून चटके सोसावे लागले नाहीत!)

मानवी संस्कृतीने बाईंची भूमिका 'माता' म्हणून अधोरेखित केली आहे. सावित्रीबाई आपल्या दलित–पीडित विद्यार्थिनींच्या, अडलेल्या विधवा मातांच्या व त्यांच्या अपत्याच्याही माता बनून जगल्या. एवढे औदार्य फक्त 'महिलेलाच' साधू शकते. कारण 'मही' (पृथ्वी) ची सर्व सात्त्विकता फक्त स्त्रियाच प्रयत्नपूर्वक अंगी बाणवू शकतात! जोतीबानी महाराष्ट्रात प्रकाश पसरवला, त्याचबरोबर घरातही. हे अनेक पुरुषानाच काय महापुरुषानादेखील साधत नाही.

अरुंधती, गार्गी, मैत्रेयी, विदुला, सीता, द्रौपदी यासारख्या पौराणिक महिलांना कोणी पाहिले नाही; परंतु ह्या सर्वांची थोडी थोडी गुणसंपत्ती घेऊन एक स्त्रीरत्न या महाराष्ट्रात दीडशे वर्षांपूर्वी जन्मून गेले, याचा आम्हाला ऊर भरून अभिमान वाटला पाहिजे! बुद्धिप्रामाण्यवाद आणि प्रेम–भावनेचा जिवंत साक्षात्कार याचा संगम जोतिबाचा अर्धांगीत झाला होता. जोतिबा केवढे भाग्यवान! त्याहून हा देश किती भाग्यवान की जिथे १५० वर्षांपूर्वी एक परिपूर्ण स्त्री-रत्न जन्माला आले!

पुण्यशील साध्वी सावित्रीबाईंच्या स्मृतीला सहस्र दंडवते! □


## नवीन दाखल झालेली पुस्तके

1. **The Key To Rebecca** (Bestseller novel) – Ken Follett
2. **To Catch A King** (Thriller) – Harry Patterson — Rs. 00–95
3. **Bahama Crisis** (novel) – Desmond Bagley — „ 12–00
4. **You Can Say That Again** – James Hadley Chase — „ 12–50
5. **Pandora Man** (Political Thriller) – Kerry Newcomb & Frank Schaefer — £ 1·25

### मराठी

१. हाय मोगलाई! – सिनिक — रु. १०–००
२. यावं! बसावं!! (कादंबरी) – चिंतामणी लागू — „ ३०–००
३. ।। परि हरि हा ब्रह्मचारी ।। (ललित निबंधसंग्रह) – आनंद साधले — „ १५–००
४. ल्वर आले जुळुनी (कादंबरी) – अरविंद गजेंद्रगडकर — „ ३२–००
५. नो सेंटिमेंटस् प्लीज (कादंबरी) – ह. मो. मराठे — „ १२–००

□ Phoenix–the Library which constantly adds new dimensions to reading!

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

# योद्धा शेतकरी

**लेखांक सहावा**

लेखन आणि संकलन

**विजय परुळकर**

---

१६ नोव्हेंबर १९८०. रविवार. वेळ सकाळची. कोर्टाच्या आवारात सर्वत्र सामसूम. विशेष वर्दळ अशी नाही. एका बंद ऑफिससमोरच्या ओटयावर शरद जोशी, माधवराव बोरस्ते, माधवराव खंडेराव मोरे एकमेकांशी बातचीत करत आरामात बसलेले त्यांच्याभोवती सात आठ वार्ताहरांचा घोळका. चार–पाच तरुण वकीलही त्यांच्यात सामील. वातावरण काहीसं कुंद आणि अशुभसूचक. सौ. लीला जोशी, माझी बायको, मी आणि शंकर वाघ एका झाडाच्या बुध्याशी विसावलेलो. आमच्या बाजूला, शरद जोशींचा सतत पाठपुरावा करणारी पोलीस वायरलेस जीप. त्या जीपमधील माणसं आतापर्यंत सर्वांच्याच परिचयाची झालेली.

साधारण अकरा–साडेअकराच्या सुमाराम ॲडव्होकेट दौलतराव घुमरे कोर्टाच्या आवारात प्रवेश करते झाले. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीचंच प्रसन्न आणि काहीसं मिष्किल हास्य. एका तरुण पत्रकाराच्या पाठीवर थाप मारून दौलतराव घुमरे म्हणाले–' अतिसूक्ष्म अशा अणूचा जेव्हा स्फोट होतो तेव्हा त्यातून प्रचंड शक्ती बाहेर पडते ! शरद जोशींनी ह्या देशातील जो अगदी तळागाळातील मनुष्य–शेतकरी–त्याच्यात असाच वैचारिक स्फोट घडवून आणलाय–त्याची चेन–रिॲक्शन सुरू होणं स्वाभाविकच आहे–'

श्री. घुमरे आणि माधवराव बोरस्ते ह्यांच्यात नंतर बराच वेळ हास्य–विनोदाची देवाण–घेवाण झाली. त्यांच्या बाजूला घोळका करून असलेल्या मंडळींमधून वारंवार हास्याचे फवारे उसळू लागले. माधवराव खंडेराव मोरे एका बाजूला शांत बसून होते. शरद जोशी एका पत्रकाराला कसली तरी आकडेवारी गंभीरपणे समजावून सांगत होते. शंकर वाघ उठून जोशींच्या शेजारी जाऊन बसले. झाडाखाली सौ. जोशी, माझी बायको सरोजा आणि मी. सौ. जोशी सरोजाला त्यांच्या आंबेठाण येथील पोल्ट्रीबद्दल काही माहिती सांगत होत्या. मी सिगरेट फुंकत गप्प बसून होतो.

बाराच्या सुमाराला पोलिसांची एक गाडी कोर्टाच्या आवारात आली. अधिकाऱ्यांनी दौलतराव घुमऱ्यांशी काही तरी चर्चा केली. दौलतराव जोशींना उद्देशून मोठ्यानं म्हणाले, ' मॅजिस्ट्रेटसाहेब दुपारी तीन वाजता येणार आहेत. तोपर्यंत तुम्ही हवं असल्यास जेवण आटोपून या ! '

प्रकाश रेस्टॉरंटमध्ये लंच घ्यायचं सर्वानुमते ठरलं. माधवराव बोरस्ते आणि रमण सिसोदिया यांच्या गाडीत आम्ही सगळे दाटीवाटीनं बसलो. आमच्या मागे पोलिसांच्या दोन वायरलेस गाड्या. आमची वरात प्रकाश रेस्टॉरंटपाशी पोहचली तेव्हा आणखी दोन पोलीस जीप्स येऊन थडकल्या.

प्रकाश रेस्टॉरंटच्या वेटरला प्रत्येकजण आपल्याला काय हवं–नको ते सांगत होता. माझी भूक मेली होती. मी लिंबू–सोडा मागवला. माझ्याकडे पाहून हसत शरद जोशी म्हणाले–' चांगली कल्पना आहे. मीपण लिंबू-सोडाच घेतो. इट इज गुड फॉर रिहायड्रेशन ! ' सर्वांनी जेवणाची ऑर्डर दिली. एव्हढ्यात अधिकाऱ्यांची एक ॲबॅसॅडर हॉटेलच्या प्रवेशद्वारापाशी येऊन थांबली. अधिकारी मंडळींना शेतकरी संघटनेच्या नेत्याबरोबर काही चर्चा करायची होती. जोशी,

मोरे, बोरस्ते उठन बाहेर गेले. मला तो सर्वच प्रकार काहीसा अपमानास्पद वाटला. ह्या मडळीच जेवण आटोपेपर्यंत अधिकाऱ्याना थांबता आलं नसत का ? कसल एव्हढ अर्जंट काम होतं ?

मी बायकोला खूण केली. आम्ही गळयात कॅमेरे अडकवून बाहेर पडलो. प्रकाश रेस्टॉरंटच्या पार्श्वभूमीवर शेतकरी सघटनेचे नेते सरकारी अधिकाऱ्याशी बातचीत करीत असल्याचे काही फोटो आम्ही काढले बहुतेक सरकारी अधिकारी कॅमेराची लेन्स पहाताच तोड फिरवतात, हेच पुन्हा एकदा अनुभवास आल फोटोग्राफरकडे त्यानी चुकून बघितलच तर त्याच्या नजरेत एक विशिष्ट भाव असतो–धमकीवजा इशारा असतो

अधिकाऱ्यावरोबरचं बोलणं सपलं आणि तिथे पुन्हा रेस्टॉरंटमधे येऊन आपआपल्या खुर्च्यांत बसले शरद जोशी लिंबू–सोडा पिताना एकाग्रचित्त झाले होते. चेहरा मात्र सपूर्ण भावनारहित. माधवराव खंडेराव अस्वस्थ आणि बोरस्ते काहीसे वैतागलेले. मला सर्वच गोष्टीचा एकाएकी प्रचंड उबग आला. वाटलं, सरळ उठावं, मिळेल ते वाहन पकडावं आणि ह्या जीव घुसमटवून टाकणाऱ्या वातावरणापासून कुठ तरी दूर निघून जावं.

लच आटोपून आम्ही बाहेर पडलो. आता एक वायरलेस जीप आमच्यासमोर होती दोन जीप्स मागे होत्या. गृहमंत्रालयाचा कुणी एक सचिव मुबईहून आला होता. पोलीस क्लबवर शरद जोशीशी मुलाखत होणार होती.

शरद जोशी क्लबच्या इमारतीमध्ये गेले. आम्ही गाडीत बाहेर थांबलो अर्धा तास उलटून गेला तरी चर्चा संपायची लक्षणं दिसेनात. इतक्यात क्लबच्या खानसामानं आम्हाला आत बोलावल एका डायनिंग टेबलाभोवती आग्रहानं बसवलं आणि अतिशय अदबीनं गरम गरम चहा 'सर्व्ह' केला. मरगळलेलं मन ताजतवानं झालं–पण क्षणभरच. आजुबाजूचा पोलीस पहारा नजरेला बोचत होता. एखाद्या व्यक्तीचं संपूर्ण स्वातंत्र्य हिरावून घेण्याची जबरदस्त आणि अमानुष ताकद खाकी वर्दी पहेनणाऱ्या ह्या माणसाच्या हातात आहे, ह्याची नुसती जाणीवदेखील मनाला असह्य वेदना देणारी होती.

शरद जोशी किंवा शेतकरी संघटनेच्या इतर नेत्याना हे अधिकारी सौजन्यान वागवत होते, पण त्याचबरोबर ह्या अधिकाऱ्याच्या हुकुमाची ताबेदारी शेतकरीनेत्याना करणं भाग पडत होतं, हे चित्रच दुःखदायक होतं. शरद जोशी काय किंवा वर्दी घालणारा पोलीस अधिकारी काय, दोघंही माणसंच; पण एकाला दुसऱ्यावर निर्बंध घालण्याचा अधिकार !

मुबईहून आलेल्या सचिवाबरोबर शरद जोशीची चर्चा सपली आणि आम्ही सगळे पुन्हा कोर्टाच्या आवारात दाखल झालो. वेळ अडीच–पावणे तीनची. वातावरण सकाळसारखंच. मॅजिस्ट्रेटसाहेब अजून आले नव्हते तीननंतर येणार असं कळलं शरद जोशी ओटयावर बसून काही तरी लिहित होते. लिहिणं सपल्यावर त्यानी तो कागद एका लिफाफ्यात बद केला आणि लिफाफा रमण सिसोदियाच्या हवाली केला. हळूहळू पत्रकारमडळी जमू लागली होती. अॅडव्होकेट दौलतराव घुमरे आणि त्यांचे सहकारी श्री. शिंदे कोर्टाच्या आवारात येरझाऱ्या घालत होते. दौलतरावाचा नेहमी प्रसन्न आणि हसरा असणारा चेहरा काहीसा गभीर होता वातावरणात कसला तरी विलक्षण ताण होता. मी अतिशय बेचैन झालो होतो. ह्या वातावरणापासून दूर कुठ तरी जाऊन खुल्या मनान श्वास घ्यावा, अशी जबर इच्छा वारवार उफाळून येत होती. शरद जोशीच्या मनात काय चालल असेल ? त्याच्या पत्नीच्या मनात ? दोघाचेही चेहरे निर्विकार कसलाच थागपत्ता लागण शक्य नाही–इतके निर्विकार !

बरोबर तीन वाजता न्यायदंडाधिकारी श्री. व्ही. पी पाटील कोर्टात आले त्याच्या पाठोपाठ सत्याग्रहीनी भरलेली एक पोलीस व्हॅन आली आणि एका वेगळयाच नाटयाला सुरुवात झाली.

सत्याग्रही 'शरद जोशी झिंदाबाद'–बरोबरच 'भाताला भाव मिळालाच पाहिजे' ही नवी घोषणा देत होते जोशीना मॅजिस्ट्रेटसमोर उभं करण्याच्या काही क्षण अगोदर ह्या सत्याग्रहीना अटक करून आणणारी पोलीस व्हॅन कोर्टाच्या आवारात दाखल व्हावी हा योगायोग विलक्षण होता. व्हॅनचा दरवाजा उघडताच सत्याग्रही खाली उतरले. त्याच्यावर दृष्टिक्षेप टाकताच मी चमकून उठलो. सर्व सत्याग्रही मंडळी शेतकरी आदोलनात शोभण्याऐवजी एखाद्या कुस्तीच्या दगलीत उठून दिसतील अशी ! अनेकाचे डोळे तारवटलेले. काहीना तर तोलदेखील सावरता येत नव्हता. ज्या सबइन्स्पेक्टरनं त्यांना अटक केली होती त्याच्याबरोबर मोठमोठयानं गप्पा-विनोद करत मंडळी कोर्टाच्या आवारात थोडाफार गोधळ माजवू लागली. त्याचा नेता सबइन्स्पेक्टरला वारंवार आग्रह करत होता, 'आमचा नेता शरद जोशी–आम्हाला त्याच्याबरोबरच तुरुंगात पाठवा!'–ह्या नेत्यान मग शरद जोशीना समारंभपूर्वक मिठी मारली आणि बरोबर आणलेल्या फोटोग्राफरला सूचना देऊन शरद जोशीच्या हातात हात घालून स्वत चे अनेक फोटो काढून घेतले. पुन्हा मोठमोठयानं घोषणा दिल्या

त्यानतर ह्या सत्याग्रही मडळीनी आग्रह धरला की, आमची केस पण शरद जोशीबरोबरच चालवा. आम्ही पण आदोलक आहोत. मॅजिस्ट्रेट श्री. व्ही. पी. पाटील ह्यानी सबइन्स्पेक्टरला बोलावून घेतलं, समोर उभं केलं आणि एका कागदावर काही तरी लिहिण्यास सुरुवात केली. ऑर्डर लिहून होताच त्यानी वाचून दाखवली आणि सगळया प्रसंगाला एक नवीनच नाटयमय कलाटणी मिळाली. मॅजिस्ट्रेटसाहेबाची ऑर्डर ऐकताच सबइन्स्पेक्टरच्या तोडचं पाणी तर पळालंच; पण घोषणा देणाऱ्या 'आदोलकाचे' चेहरेदेखील खरंकन् उतरले. मंडळी बावचळल्यासारखी, पडेल चेहऱ्यानं वार्ताहराच्या नजरा चुकवू लागली. वास्तविक, ह्या सव्वीस सत्याग्रहीना जेथे अटक झाली तेथेच वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडणे शक्य असताना 'जामीन देऊ नये' असे सागून कोर्टाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला म्हणून न्यायदडाधिकाऱ्यानी सबइन्स्पेक्टरवर 'कारणे दाखवा' नोटीस बजावली होती मी सुन्न मनानं हा सर्व खेळ पहात होतो

तीन वाजून पधरा मिनिटानी शरद जोशी, माधवराव खडेराव मोरे आणि माधवराव बोरस्ते न्यायदडाधिकाऱ्यासमोर उभे राहिले. तिघांना २४ नोव्हेंबरपर्यंत रिमाड देऊन नासिकरोड मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात यावे असा हुकूम मॅजिस्ट्रेट व्ही पी पाटील यानी काढला. भारतीय दडविधानधारा १५१ (३) प्रमाणे तिन्ही

नेत्याना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश काढण्यात आला होता.

तिघेजण पोलीस व्हॅनमध्ये जाऊन बसले. व्हॅन कोर्टाच्या आवाराबाहेर पडली. वळून दिसेनाशी झाली. माझ्या दोन्ही डोळ्यातून घळघळा पाणी वाहू लागलं मी अश्रू पुसण्याचा प्रयत्न केला नाही.

¤

शरद जोशी नासिकरोड मध्यवर्ती कारागृहात दाखल झाले आणि रमण सिसोदियानी पत्रकाराच्या उपस्थितीत लिफाफ्याचे सील फोडले. शरद जोशीनी लिहिलं होतं–

'ऊस व कादा भावासाठी खेरवाडी व सौदाणे येथे शांततेने चालू असलेल्या आंदोलनाकडे शासनाने दूषित दृष्टीने पाहून ते दडपण्याचा प्रयत्न केला. या आंदोलनाचे काम लक्षावधी शेतकरी अहोरात्र कष्ट सोसून करीत आहेत. हजारो सत्याग्रही जखमी झाले आहेत. त्या सर्वांच्या परिश्रमात आणि वेदनात सहभागी होण्यासाठी मी उपोषण सुरू करीत आहे. या काळात मी फक्त लिंबूपाणी व मीठ सेवन करणार आहे.

'आम्ही गजाआड असलो तरी सर्व शेतकऱ्यानी आदोलन असेच नेटाने पुढं चालवावे. मात्र यातून रेल्वेमार्ग पूर्णपणे वगळण्यात आला आहे. तेथे शेतकरी सघटनेतर्फे काहीही घडू नये. इतक्या उप्परही तसे काही घडल्यास त्याचा व शेतकरी संघटनेचा काही संबंध असणार नाही हे आम्ही जाहीर करतो !'

१६ नोव्हेंबरपासून शरद जोशीचे उपोषण सुरू झाले त्याच दिवशी नासिकमध्ये शिक्षणमंत्री डॉ. बळीराम हिरे यानी स्वपक्षीय खासदार-आमदाराची एक बैठक घेतली. त्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार हिरेंच्या नेतृत्वाखाली इंदिरा कॉंग्रेसच्या नासिक जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचं एक शिष्टमंडळ १८ नोव्हेंबर रोजी शासनाला 'कळकळीची विनती 'करण्यासाठी मुख्यमंत्र्याची भेट घेणार असे सागण्यात आले.

श्री. देवराज अर्स आणि श्री हेमवतीनंदन बहुगुणा हे लवकरच नासिक जिल्ह्याला भेट देणार अशी कुणकुण वार्ताहरामध्ये पसरली. अर्स कॉंग्रेसचे संयुक्त चिटणीस श्री. भीमसिंग नाशकात दाखल झाले होते. त्याचेबरोबर बहुगुणा गटाचे श्री. राकेश आणि आश्रफ् हुसेनदेखील जिल्ह्याचा दौरा करीत होते. 'या आदोलनात शेतकरी संघटनेचे नुसतेच साथीदार असण्याऐवजी आदोलनात आघाडीवर रहाता यावे म्हणून केंद्रीय नेतृत्वाचे मन वळविण्यात येत आहे,' असे अर्स कॉंग्रेसच्या एका प्रवक्त्याने सागितले. अर्स कॉंग्रेसचे आमदार श्री. सूर्यभान गडाख आणि जनताचे श्री. निहाल अहमद यानी १८ नोव्हेंबर रोजी 'पुढील कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी' नाशकात एक सभा आयोजित केल्याचे कळले.

तामीळनाडूचे शेतकरी नेते श्री. नारायणस्वामी नायडू यानी लवकरच आंदोलन सुरू करण्यात येईल असा शासनाला इशारा दिला. महाराष्ट्राप्रमाणे उत्तर प्रदेशातदेखील असं आदोलन छेडण्यात येईल अशी लक्षणे दिसू लागली. दरम्यानं श्री. वसंतदादा पाटील यांनी दिल्लीमध्ये चालविलेल्या प्रयत्नामळेच उसाला किमान २५० रुपये भाव मिळेल, असे त्याच्या निकटवर्तियातर्फे सागण्यात आले.

अहमदनगर जिल्ह्यात शेतकरी आदोलनाचे साद–पडसाद उमटू लागले असे पहाताच शासनाने तेथे ३७ (३) कलम जारी करून सभा आणि मिरवणुकांवर बंदी घातली. त्याच सुमारास 'फर्नांडिसत्या वेळी तुमचे शेतकरीप्रेम कुठे गेले होते ?' असा सवाल करून महसूलमंत्री सौ. शालिनीताई पाटील म्हणाल्या– "त्याच्या काळात उसाला शंभर रुपयांपेक्षा कमी आणि काद्याला दहा रुपये दर मिळाला ! वसंतदादाना मोरारजी म्हणाले– 'ऊसवाला शेतकरी माजला आहे ' चरणसिंग म्हणाले, 'ऊस जाळून टाका !' त्या वेळी फर्नांडिस गप्प !"

भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष श्री. उत्तमराव पाटील म्हणाले, 'नासिक जिल्ह्यात अर्स कॉंग्रेस आणि जनता जेपी यांनी जी कृतिसमिती स्थापन केली आहे, त्यात भाजप सहभागी होणार नाही. शेतकरी संघटनेच्या आदोलनास राजकीय पक्षानी जरूर पाठिंबा द्यावा, पण त्याचे नेतृत्व करण्याचा मात्र प्रयत्न करू नये ! शरद जोशीनी ४८ तासांच्या विश्रातीसाठी आदोलन स्थगित केले असले तरी नंतर ते चालू रहाणार. इतकेच नव्हे तर विदर्भात आणि संपूर्ण महाराष्ट्रात पसरणार ! गेल्या तेहतीस वर्षांचे शेतकऱ्याचे दुखणे 'रस्ता रोको 'च्या निमित्ताने प्रथमच उघडयावर आले आहे !'

इंदिरा कॉंग्रेसचे आमदार श्री. शंकरराव कोल्हे यानी कोपरगाव येथील पत्रकार परिषदेत जाहीर केले– 'संजीवनी सहकारी साखर कारखाना चालू गळित हंगामात उसाला तीनशे रुपये टन भाव देणार !'

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. अब्दुल रहेमान अंतुले ह्यानी 'शेतकऱ्यांच्या प्रश्नात कुणाची दलाली नको !' असे सागून, 'शेतकऱ्याना भडकवाल तर गय करणार नाही !' असा गंभीर इशाराही दिला.

एका वृत्तपत्राच्या संपादकाला वाटलं की शरद जोशी आता आसामच्या धर्तीवर लढा चालविणार. सपादकमहाशयांनी तातडीनं अग्रलेख लिहून आसामचे प्रश्न कसे वेगळे आहेत आणि त्या धर्तीवर शेतकरी आदोलन चालविण्यामध्ये संभाव्य धोके काय आहेत ह्याबद्दल शरद जोशीना उपदेश करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला !

पिंपळगाव बसवंत येथे माधवराव खडेराव मोरेच्या घरात विचित्र शातता होती. टेलिफोन देखील शात होता. १६ नोव्हेंबरची मध्यरात्र उलटली तरी माझा डोळ्याला डोळा लागत नव्हता.

¤

मार्च १९८० मध्ये शरद जोशीनी चाकण येथे कादा-आदोलनाच्या वेळी उपोषण केल तेव्हा त्याच्या किडनिजना इजा झाली होती. त्याच्यावर औषधोपचार करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरमंडळीनी शरद जोशीना सल्ला दिला होता की, कमीत कमी पुढील तीन वर्षे उपोषण वगैरेचा प्रयत्न करू नका आणि तरी देखील हा शेतकरीनेता केवळ आठ-नऊ महिन्यातच 'आदोलनासाठी कष्ट सोसणाऱ्या आणि जखमी झालेल्याच्या वेदनात सहभागी होण्यासाठी' उपोषण सुरू करून स्वत:च्या प्राणाची बाजी लावण्यास सिद्ध झाला होता.

महिना पंचेचाळीस हजार रुपयांची नोकरी सोडून हा शरद जोशी शेतकऱ्याची संघटना बाधण्याचा 'उपद्व्याप' का करतो असा प्रश्न अनेकाना पडला आहे. सर्व गोष्टीच मूल्यमापन केवळ पैशातच

करणाऱ्यांना असा प्रश्न पडणं साहजिकच आहे आणि आता हा शरद जोशी जेव्हा उपोषण सुरू करून स्वत:चे प्राण धोक्यात घालतो तेव्हा तो त्याग अनेकाना सर्वस्वी अनाकलनीय झाल्यास नवल वाटायचही कारण नाही अशी माणसं नसती तर 'मुसुंबीचा रस' ह्या विषयावरचे, लिहिणाऱ्याच्या मनाची पातळी दर्शविणारे अग्रलेख आपणास वाचावयास मिळालेच नसते !

—सकाळी लवकरच पिंपळगाव बसवंत सोडल आणि नासिकरोडचं मध्यवर्ती कारागृह गाठलं तेथील अधिकाऱ्यांनी सागितल की, गृहमंत्रालयाच्या परवानगीशिवाय शरद जोशींची भेट घेता येणार नाही. आमचा नाईलाज झाला. तिथून आम्ही अॅडव्होकेट घुमरेंचं ऑफीस गाठलं. शरद जोशींना कारागृहातून सरकारी इस्पितळात हलवावं अशा अर्थाचा एक अर्ज करण्याचं शंकर वाघानी ठरवलं होत. घुमरेंच्या ऑफिसात जाण्यासाठी म्हणून आम्ही कोर्टाच्या आवारात गाडी घेतली तेव्हा काही तरुण वकीलमंडळींनी आणि वार्ताहरानी मला आणि शकर वाघाना गराडा घातला. कुणी तरी म्हणालं—

'मिसेस जोशी सटाण्याला जाऊन स्त्रियाच आदोलन सुरू करणार आहेत अशी पोलिसाना खबर मिळाली आहे. ते खरं असेल तर मिसेस जोशींना देखील अटक करण्याचा त्याचा विचार आहे ... आम्ही एका सुरक्षित ठिकाणी मिसेस जोशींची राहण्याची व्यवस्था केली आहे....त्याचा काय विचार असेल तो आम्हाला कळवा.'

मी म्हणालो,

'मिसेस जोशी सकाळी पुण्याला परत जायचं म्हणत होत्या. मी त्याचा कार्यक्रम काय आहे त्याची चौकशी करून तुम्हाला तसा निरोप देतो.'

काही वार्ताहरानी देखील मिसेस जोशींना अटक होण्याची शक्यता बोलून दाखवली आणि जरूर पडल्यास 'सुरक्षित स्थळी' त्यांची राहण्याची सोय करण्याचं आश्वासन दिल.

शकर वाघ, मी आणि सरोजा गाडीतून उतरून घुमरेंच्या ऑफिसच्या दिशेनं चालू लागलो तेव्हा बरीचशी मडळी आमच्याकडं कुतूहलानं पाहात होती मला जरा आश्चर्य वाटलं; पण अर्थबोध झाला नाही.

शंकर वाघानी घुमरेंच्या सल्ल्यानुसार अर्ज तयार केला आणि आम्ही जायला निघालो. त्याच वेळी एक वार्ताहर घुमरेंच्या ऑफिसात आला काही प्रश्न विचारू लागला. बाहेर 'इडियन एक्स्प्रेस'चे फोटोग्राफर विनायक गोखले होते. त्यानी विचारलं, 'आज तुम्ही कुठल्या भागात जाणार?' मी म्हटलं, 'मंगरूळफाटा, सोग्रस आणि सटाणा.' गोखले म्हणाले, 'मी येऊ का?' म्हटलं, 'चला!'

गाडीपाशी आलो तर पुन्हा तरुण वकिलाची आणि काही वार्ताहराची गर्दी. पुन्हा तेच प्रश्न 'मिसेस जोशींचा प्रोग्रॅम कळला का?' मी म्हणालो, 'आता आम्ही सटाण्याला चाललोय, तेथून परतल्यावर चौकशी करून सागतो.' त्यावर एक वकील. हतबुद्ध होत म्हणाला—'अहो, पण सटाण्याला गेल्यास त्याना अटक होईल!' तो काय बोलतोय ह्याचा मला काहीच अंदाज येईना. तेव्हा मी नुसताच हसलो आणि आमची गाडी स्टार्ट झाली.

वकील आणि वार्ताहरमडळी आमच्याकडे विस्फारलेल्या डोळ्यानी पाहात होती! हे लोक आमच्याकडे असे का बघताहेत तेच मला कळेना आणि मग एकदम डोक्यात प्रकाश पडला. माझी बायको सरोजा म्हणजेच 'मिसेस जोशी' असा त्याचा नक्की गैरसमज झाला असावा. त्याना वस्तुस्थितीची कल्पना द्यावी म्हणून मी खिडकीतून डोकं बाहेर काढलं आणि मागून येणारी वायरलेस जीप बघून पुन्हा डोकं आत घेतलं—म्हणजे पोलिसाचा देखील तसाच गैरसमज झाला होता की काय? एरवी आमच्यामाग वायरलेस असण्याचं काहीच कारण नव्हतं! मी सरोजाला म्हटल, 'तू सटाण्यात पाय ठेवलास की, पोलीस तुला अटक करणार' तिनं माझ्याकडं पाहून नुसतेच खादे उडवले.

गाडीनं ओझरचा पूल ओलाडला तेव्हा समोरच्या आरशातून पाठीमागं बघत अशोक गायकवाड म्हणाला, 'पोलिसांची अँबॅसॅडर येतेय जोरात मागून.' मी म्हटलं, 'चालले असतील कुठं तरी ड्युटीवर—आपल्याला त्याच्याशी काय करायचं?' अशोकनं गमत म्हणून गाडीचा वेग वाढवला, पण पाहता पाहता अॅम्बॅसॅडरनं आम्हाला गाठलं ओव्हरटेक केल आणि सुसाट वेगान ती पुढ निघून गेली. वायरलेस जीप मात्र ठराविक अंतर राखून मागून येतच होती.

पिंपळगाव बसवतच्या अलीकड अशोकन गाडीचा वेग एकदम कमी केला. रस्त्यात मधोमध अँबॅसॅडर उभी होती. आमची गाडी तिच्या मागं थाबताच एक अधिकारी खाली उतरला. क्षणभरच त्यानं आम्हा सर्वांकड निरखून पाहिलं. अँबॅसॅडरला पुढं जाण्याचा इशारा केला आणि स्वत: माग उभ्या असलेल्या वायरलेस जीपमध्ये बसत जीप वळवून नासिकच्या दिशेनं निघून गेला. सर्व काही अर्ध्या मिनिटात घडल. ह्या अधिकाऱ्याचा चेहरा कुठं तरी पाहिला होता. कुठं?—एकदम आठवलं, पोलीसक्लब! तिथ हा सौ. लीला जोशी आणि सरोजाबरोबर बोलला होता. म्हणूनच त्यानं रस्त्यात गाडी मधोमध थाबवून खात्री करून घेतली. आमच्याबरोबर सौ. जोशी नाहीत हे उमगताच त्यान वायरलेस जीप वळवली आणि आमचा नाद सोडला! 'इंडियन एक्स्प्रेस'चे फोटोग्राफर विनायक गोखले ह्याना अर्थातच काय चाललय ह्याचा पत्ता नव्हता मी, शंकर वाघ आणि अशोक हसत होतो. सरोजाला देखील आम्ही का हसतोय याचा पत्ता नव्हता.

आम्ही मगरूळफाट्यावर पोहोचलो तर तिथं पुन्हा आपला पूर्वीचाच प्रकार. फाट्यावर हेल्मेट आणि लाठीधारी एस. आर. पी., बंदुका धारण केलेले पोलीस आणि सोग्रस रस्त्यावर माळोरान पळणारे सत्याग्रही.

आम्ही गाडी मगरूळफाट्यावरून सोग्रस रस्त्यावर घेतली. इतक्यात पत्रकाराची एक जीप भन्नाट वेगानं आम्हाला ओव्हरटेक करून पुढ निघून गेली.

माळरानात सत्याग्रही जमले होते प्रल्हाद पाटील कराड भाषण

## 'चले जाव, मागे फिरा, आम्ही लाठीहल्ला करू'....

करीत होते. गोखले, मी आणि सगेजा गळयात कॅमेरे अडकवून फोटो काढत होतो. जीपमधील सात-आठ वार्ताहर 'नोटस्' घेत होते. वार्ताहिराचा घोळका पाहून प्रल्हाद पाटलाना आणि सत्याग्रहींना एकाएकी स्फुरण चढलं. सगळयानी निर्णय घेतला– वार्ताहिराच्या समक्ष शांततेन रस्ता अडवायचा, सत्याग्रह करायचा आणि अटक करण्याऐवजी पोलीस बळाचा वापर कसा करतात हे दाखवून द्यायचं. हजार-बाराशे सत्याग्रही मोर्चान मंगरूळफाटयाच्या दिशेन निघाले. आम्ही झटपट गाडीत बसून फाटा गाठला आणि पुढं काय होतंय ते 'टिपण्यासाठी' कॅमेरे सरसावून तयार झालो.

सोग्रस रस्त्यावरून सत्याग्रहीचा मोर्चा येताना पाहून पोलीस गोंधळले. गळचात कॅमेरे अडकवलेल्या आम्हा तिघाकडे आणि वार्ताहिराच्या घोळक्याकडे पाहून काय करावं ते त्याना सुचेना. कमरेला पिस्तुल लावलेला एक धिप्पाड शरीराचा पी. एस. आय सोग्रस रस्ता आग्रारोडला जिथं मिळतो तिथ मध्यावर येऊन उभा राहिला. एस. आर. पी.ना त्यानं भराभर सूचना दिल्या. पोलीस काठ्या आणि बदुका सावरून पवित्रे घेऊन उभे ठाकले. समोरून सत्याग्रही घोषणा देत येत होते. पी एस. आयनं हातामध्ये मॅगॅफोन घेऊन इशारा दिला.

'चले जाव– मागं फिरा– आम्ही लाठीहल्ला करू.'

सत्याग्रही घोषणा देत येतच राहिले विनायक गोखले पी. एस. आय.चा क्लोजअप घेण्यासाठी पुढे गेले तेव्हा तो भडकला. त्यानं गोखलेना 'फोटो काढू नका' असं धमकावलं गोखले म्हणाले, 'मी प्रेस फोटोग्राफर आहे– तुम्ही मला रोखू शकत नाही. मी फोटो काढणार, ते माझं काम आहे' पी. एस. आय. चिडला. त्यानं सत्याग्रहींना मॅगॅफोनवरून दम दिला–

'जागच्या जागी थाबा– एक पाऊल पुढं टाकलंत तर गोळीबार करू!'

सत्याग्रही थाबले प्रल्हाद पाटलांनी सर्वांना हाताची घडी घालून बसायला सांगितलं. ते स्वत आणि काही कार्यकर्ते पी. एस. आय शी बोलण्यासाठी म्हणून पुढं येऊ लागले. त्यानाही इशारा देण्यात आला–

'कुणीही एक पाऊलसुद्धा पुढं येऊ नका– लाठीहल्ला करू– चले जाव– निघून जा– गोळीबार करू!'

ह्या धमकावण्यांनी सत्याग्रही चिडले. काही जण माळरानातून आग्रारोडच्या दिशेने पळू लागले. बदूकधारी पोलिसानी झटपट पवित्रे घेतले. हुकुम मिळताच त्यानी गोळीबार केला असता. वातावरण भलतंच तग झालं. प्रल्हाद पाटील कराड सत्याग्रहीना काबूत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते. पोलीस 'टेन्स' झाले होते. इतक्यात एक जीप भरधाव वेगानं आली. कचकन ब्रेक मारून थाबली आणि हसतमुख चेहऱ्याचे डा. एस. पी ग्यानचद वर्मा खाली उतरले. प्रेसवाल्याचा घोळका, चिडलेले सत्याग्रही, टेन्स पोलीस– वर्मांनी एका दृष्टिक्षेपात परिस्थितीचा अंदाज घेतला पी. एस आयला सूचना देऊन त्यांनी प्रथम रायफलधारी पोलिसांना मागं वळवलं. लाठीधारी एस. आर. पी.नादेखील बाजूला उभ केल आणि सत्याग्रहींना सामोर गेले. वातावरणातील ताण एकदम निवळला. डी. एस. पी. वर्मांनी प्रथम प्रल्हाद पाटलाची विचारपूस केली प्रल्हाद पाटील त्यांना आवेशानं सांगू लागले–

'हम आपके पास क्या मागताय? सोना-चांदी तो नही मागता. हम सीर्फ मागताय की, हमारे गन्ने को जितना खर्च आताय उतना हमको रेट दो– लेकिन आप हमारी ये सीधी बात सुननेको भी तयार नही–'

प्रल्हाद पाटलांची समजूत काढत वर्मा म्हणाले,

'पाटील, तुम्ही असं काय करतो– आम्ही पोलिसवाले– आम्ही तुमच्या गन्नाला कसा काय रेट देणार? ते आमच ऑथारिटी नाही–'

पण प्रल्हाद पाटील काही डी एस. पी. वर्मांचं म्हणणं सहजासहजी ऐकून घ्यायच्या 'मूड'मध्ये दिसत नव्हते त्यानी हिंदीमधून शेतमालाच्या भावाविषयी जोरदार लेक्चर सुरू केल बिचारे वर्मा. आपल्या मोडक्या-तोडक्या मराठीतून त्यानी पाटलाची समजूत काढण्याचा खूप प्रयत्न केला त्यांच्यातील सवाल-जबाबान सर्वांचीच करमणूक होऊ लागली क्षणापूर्वी जिथ गोळीबार होऊन रक्त साडण्याइतपत तणाव निर्माण झाला होता तिथंच आता खेळीमेळीचं वातावरण तयार झालं होत शेवटी डी एस. पी. वर्मांनी सर्व सत्याग्रहींना आग्रारोड अडविण्यास परवानगी दिली गटागटानं सत्याग्रही रस्त्यावर शाततेनं बसले पोलिसानी त्यांना अटक करून गाड्यात बसविले शाततामय सत्याग्रह आणि शातातामय अटक असा प्रकार सुरू झाला. चार-पाच गाडया भरून सत्याग्रही अटक झाले तेव्हा, प्रल्हाद पाटील वर्मांना म्हणाले, 'धन्यवाद, अभी मैं जाता हूँ!' त्याचा हात पकडून मनमोकळं हसत वर्मा म्हणाले, 'तुम्ही जात असले तरी आता आम्ही तुम्हाला सोडणार नाही– अटक करणार!'

'अहो पण...' प्रल्हाद पाटील.

'आता पणबीण काही चालणार नाही– आता तुम्ही आमचे पाव्हणे!'

वर्मांनी प्रल्हाद पाटलाना एका गाडीत चढवलं आणि दार बंद करून घेतलं.

¤

मंगरूळफाटयावरून आम्ही सोग्रसफाटयावरील श्री. भास्करराव गांगुर्डे याच्या घरी गेलो. भास्करराव गागुर्डे हे एके काळी निफाड सहकारी साखरकारखान्याचे एम डी होते त्याच्या घरात लेनिनचं पोट्रेट लावलेलं आहे. राहणी अत्यत साधी. बुद्धिमत्ता प्रखर, बोलणं काहीसं फटकळ आणि तरीदेखील समजूतदारपणाचं. स्वत चं म्हणणं जितक्या आग्रहानं माडण्याची सवय तितक्याच आग्रहानं दुसऱ्याचं म्हणणं ऐकून घेण्याचादेखील प्राजळपणा. आपल्या बागेतील अत्युत्कृष्ट दर्जाचे लखनवी पेरू आमच्यासमोर ठेवत भास्करराव गागुर्डे सागत होते–

'शरद जोशीनी शेतमालाच्या भावाविषयी जे विचार माडले आहेत त्याना शेतकरी समाजात अनन्यसाधारण महत्त्व आलेलं आहे. शरद जोशीचं नाव शेतकऱ्याच्या मनात अढळ झालं आहे ते आता

कुणीच काढू शकणार नाही, पुसू शकणार नाही, हलवू शकणार नाही. गेल्या तेहतीस वर्षात शेतमालाविषयी अनेक लढे झाले; परंतु आजचा जो लढा आहे त्याची इतिहासाला दखल घेतल्याशिवाय गत्यंतर नाही.

'चार दिवस आग्रारोड बंद, ही साधी गोष्ट नाही. हा रोड जन्माला आल्यापासून त्याला एवढी विश्रांती कधीच मिळाली नाही. आम्ही पूर्वी अनेक वेळा हा रोड अडवलेला आहे; पण किती – एक किंवा दोन तास ह्या रोडच्या इतिहासात प्रथमच हा संपूर्ण चार दिवस अडवला गेला. ही घटना साधी नाही.

'लोकांच्या मनात आता प्रचंड चीड निर्माण झाली आहे. आम्ही रस्त्यावर सत्याग्रह करून शांततेनं अटक करवून घेण्यासाठी बसलो. पण ह्यांनी रात्री येऊन लाठ्या मारल्या ह्याबद्दल लोकांच्या मनात सरकारबद्दल घृणा निर्माण झाली आहे. सरकारनं अटक केली असती तर अशी घृणा पैदा झाली नसती. केवळ पिटाळून लावून, लाठीचार्ज करून आंदोलन दाबून टाकण्याचा प्रयत्न करायचा, ही गोष्ट सरकारवर उलटणार आहे. सरकारच्या अशा वर्तनामुळे लोकांच्यात फार असंतोष पसरला आहे. बारा नोव्हेंबरच्या पहाटेपासून, पोलिसांचे अत्याचार सुरू झालेल्या दिवसापासून हा असंतोष नुसता खदखदतोय! त्या असंतोषाला आता मार्ग काढून देणं आवश्यक आहे. धरणात एकदा पाणी तुंबलं की त्याला कॅनॉल काढून मार्ग दिलाच पाहिजे नाही तर धरण फुटून हा हा कार माजेल!

'शरद जोशींनी अठ्ठेचाळीस तासासाठी आंदोलकांना विश्रांती जाहीर केली. सरकारनं 'आंदोलन बारगळलं' वगैरे काहीही जाहीर केलं तरी हा शरद जोशींच्या मार्गदर्शनाचा आणि नेतृत्वाचा मोठा विजय आहे, शेतकरी संघटनेचा विजय आहे, ह्याबद्दल शेतकऱ्यांच्या मनात तिळमात्र शंका नाही!

'–राजकीय पक्षांना संपूर्णपणे तोडून टाकण्याची शेतकरी संघटनेची जी भूमिका आहे किंवा ती तशी असावी असा माझा जो समज आहे, त्याबद्दल मात्र थोडा विचार करणं आवश्यक आहे, असं माझं वैयक्तिक मत आहे आपण लढा उभा करत असताना इतर माणसांना, ते केवळ एखाद्या राजकीय पक्षाचे आहेत, म्हणून तोडून टाकायच का? अशी ही काही माणसं आहेत की ज्यांनी दहा दहा, वीस वीस वर्षे निःस्वार्थीपणे काम केलं आहे–त्यांचा पक्ष कुठला का असेना, केवळ ते राजकारणाशी संबंधित आहेत म्हणून त्यांना आंदोलनात सहभागी करून घ्यायच नाही का?

'जे खुर्चीत बसलेले किंवा खुर्चीच्या मागे लागलेले आहेत, त्यांना बाजूला ठेवलच पाहिजे त्याबद्दल काहीच वाद नाही; पण काही माणसं अशी आहेत की, आमदार असूनसुद्धा त्यांनी 'पैशाची कमाई' केली नाही. सामाजिक जाणीव असलेले हे कार्यकर्ते आहेत. आज शेतकरी चळवळ वाढत आहे, तेव्हा अशा माणसांना वाटतं की; आपल्याला आता खरी दिशा सापडते आहे. अशांच सहकार्य शेतकरी संघटनेनं घेतलं पाहिजे. सामाजिक जाणीव असलेले हे कार्यकर्ते लगेच दुसरी शेतकरी संघटना उभी करण्याच्या भानगडीत कधीच पडणार नाहीत. ह्या कार्यकर्त्यांना खरा मार्ग सापडल्यासारखा वाटतोय, चळवळीत सामील व्हायच आहे–शरद जोशींनी मार्गदर्शन करावं अशी त्यांची अपेक्षा आहे.'

श्री. भास्करराव *गागुर्डेंच्या बागेतील लखनवी* पेरूची *मिठास* वेगळीच होती. इतका गोड, गरेदार आणि स्वादिष्ट पेरू मी ह्यापूर्वी कधीच खाल्ला नव्हता. भास्कररावांच्या बोलण्याला देखील लखनवी मिठास होती. त्यांचे विचार ऐकताना माझं मन म्हणत होतं – भास्करराव म्हणतात ते योग्यच आहे आणि शरद जोशी तरी ह्यापेक्षा वेगळं काय सांगतात? शरद जोशी तर प्रत्येक भाषणात स्पष्टपणे सांगत आलेत, तुम्ही कुठल्याही पक्षाचे असा, शेतकरी संघटनेचा एक कलमी कार्यक्रम मान्य असेल तर पक्षाचे जोडे बाहेर ठेऊन प्रत्येकाने ह्या आंदोलनात सहभागी व्हावे! भास्करराव गागुर्डे म्हणतात तसं सामाजिक जाणीव असलेले निःस्वार्थी कार्यकर्ते असतील तर त्यांना चळवळीत सहभागी होण्यात कसलीच अडचण नव्हती. त्यामुळेच भास्कररावांची नेमकी शंका मला उमगत नव्हती–पण मी प्रश्न विचारला नाही. पेरूचा स्वाद घेत राहिलो. भास्करराव सांगत होते–

'शरद जोशींनी जाहीर केलेला 'लोकप्रतिनिधींचे राजीनामे' हा कार्यक्रम उत्तम आहे. ही मंडळी कुठल्याही पक्षाची असोत, त्यांचे राजीनामे मागितलेच पाहिजेत! पण होतं काय,– सत्ताधारी पक्षातील वरच्या दर्जाचे जे कार्यकर्ते आहेत ते राजीखुषीनं राजीनामा देणार नाहीत. ते म्हणणार, कुठल्या तरी पूर्वपुण्याईनं आम्ही यंदा निवडून आलो आहोत–आज जर खुर्ची सोडली तर पुन्हा निवडून येऊ याचा भरवसा काय? सध्याच्या शासनामध्ये इतकी ताकद आहे की पुन्हा निवडणुकीला उभे राहिल्यास आपल्याला पाडण्याची तरतूद केली जाईल–असं ह्या मंडळींना वाटतं. त्यांना अशी भीती वाटणं साहजिकच आहे. हल्ली निवडणुका बिनपैशाच्या होत नाहीत. तो एक मोठा खेळ आहे!

'वास्तविक शेतकऱ्यांच्या आजच्या भावना लक्षात घेता ह्या मंडळींना अशी भीती वाटून उपयोग नाही. अशी भीती वाटणं साफ चूक आहे. असं असूनदेखील, निवडणुकीच्या मामल्याचा भरवसा देता येत नाही म्हणून निदान 'आपल्याला' तरी ह्या राजीनामा-प्रकरणातून अपवाद म्हणून वगळावं अशी सर्वच लोकप्रतिनिधींची अपेक्षा असणार!

'शरद जोशींनी जाहीर केलय की कुणी जर *स्वयस्फूर्तीनं* राजीनामा दिला तर फेरनिवडणुकीत एक पैशाचाही खर्च येऊ न देता शेतकरी संघटना त्याला पुन्हा निवडून आणील, मग राजीनामा देणारा कुठल्याही पक्षाचा असो! शरद जोशींचं हे आवाहन अतिशय योग्य आहे, पण एकदा निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीला राजीनामा देण्यापूर्वी पक्षाचादेखील सल्ला घ्यावा लागतो ही गोष्टही आपण लक्षात घ्यायला हवी. राजीनामा अवश्य मागायचा–पण त्यासाठी त्यांना कमीत कमी एक महिन्याची आपण मुदत दिली पाहिजे असं मला वाटतं. ही मुदत त्यांना पक्षीय पातळीवर द्यावी,

# लखनवी पेरूंच्या बागेतील राजकीय चर्चा

मग भले तो सत्ताधारी इंदिरा काग्रेस पक्षाचा का असेना !

'आपण आता हा जो लढा उभा केला आहे तो कशासाठी ?– सत्ताधारी पक्षानं ऊस आणि कांद्याच्या भावाबद्दल योग्य निर्णय द्यावा म्हणूनच ना ?– आपला लढा सत्ताधारी पक्षाच्याविरूद्ध नाही. कुठलाही पक्ष सत्तेवर असता तरी आपण हा लढा दिला असता. सत्ताधाऱ्यानी प्रतिकूल निर्णय दिला तर शेतकऱ्याच्यातील असंतोष तीव्र होणार, बदनामी सत्ताधाऱ्याची होणार हृयात अजिबात वाद नाही !

'शेतकऱ्यानी हे आदोलन कसं चालवावं ते आत्ता पक्कं ठरलं आहे. त्यामधे सहभागी होतील त्या सर्वांना बरोबर घेऊन आदोलन चालवलं तर काहीच बिघडणार नाही.

'आता जॉर्ज फर्नांडिस अचानक आला. आपण म्हणतो, तो राजकीय फायदा उठवायला आला. इतर राजकारणीही विचारतात– हे कसे काय नाशिकला जाऊन थडकले ? राव वीरेंद्रसिंगही तेच विचारतात ! माझं म्हणण अस–जॉर्ज जर आला तर आपण त्याला येऊ नको अस म्हणायचं का ? आपण तस म्हणत नाही, ही गोष्ट खरी आहे. ही मडळी केवळ आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी येतात. राजकीय फायद्यासाठी येतात हे उघड आहे, पण म्हणून आपण मुद्दामहून त्याना दूर ठेवण्याचा प्रयत्न करण्याची गरज नाही. त्यांना यायच असेल तर येईनात का ! ते कशासाठी का येईनात, त्याना आता श्रेय मिळणार नाही. आपल्या लढयाचा निर्णय काहीही होवो, त्याचं बरं–वाईट कुठलंच श्रेय हृया मंडळीना मिळणार नाही– मग आपण निष्कारणच हृया राजकारणी मंडळीबद्दल मनामध्ये बाऊ कशाला निर्माण करून घ्यायचा ?

'जॉर्ज फर्नांडिसाच्या लोकदलाचंच उदाहरण घ्या. नासिक जिल्ह्यामध्ये त्याना अस्तित्वच नाही, फार तर दहा-पंधरा कार्यकर्ते असतील, पण समजा, त्याना सिद्ध करायचं असेल की, ह्या शेतकरी आदोलनामध्ये आम्ही देखील हजेरी लावली–तर त्यात वावग काय आहे ? त्याच ते कर्तव्यच आहे ! शेतकरी काय ओळखायच ते बरोबर ओळखणार ! आपण काळजी करण्याच कारणच नाही. अहो, लोकदलाच्या कुठल्याही कार्यक्रमासाठी जॉर्ज ह्यापूर्वी कधीही इथं आले नाहीत. ह्या लढयाच्या निमित्तान का होईना ते आले, स्वतःवर त्यानी खटला ओढवून घेतला. तो लढयातला मनुष्य आहे. त्याची किंमत कमी करण्याच कारण नाही.'

भास्करराव गागुर्डे बोलत असताना मी मनात म्हटलं–'तुमचं म्हणणं बरोबर असेलही, पण इतके दिवस झोपलेले जॉर्ज एकदम जागे होऊन मोका मिळताच इथं आले आणि आपलं अस्तित्व दाखविण्यासाठी त्यानी जी केविलवाणी धडपड केली, शरद जोशीना लिहिलेलं पत्र छापून त्याच्या प्रती वाटण्याची जी हीन दर्जाची 'चळवळ' केली, ती मात्र त्यांच्यासारख्या लढयातील माणसाला अजिबात शोभणारी नव्हती !'–मी माझ्या मनाशी असा विचार करत असताना भास्करराव आपल्याच नादात सागत होते–

'आता मृणाल गोरेचं उदाहरण घ्या. त्या बाई एक चागल्या कार्यकर्त्या आहेत. मला त्याच्याविषयी आदर आहे. त्याचबरोबर कांद्याच्या प्रश्नाबाबतीत माझा स्वतःचा त्या बाईंवर फार राग आहे. १९७५ साली सुरुवातीला कांद्याला निर्यातबंदी झाली–पण मोहन धारिया असताना मुंबईमध्ये मृणालबाईंच्या नेतृत्वाखाली 'लाटणे मोर्चा' निघाला आणि त्यामुळंच कांद्याची निर्यातबंदी जास्त प्रखर झाली ही गोष्ट आम्ही विसरलो नाही. तरी देखील त्या आल्या म्हणून फार काही बिघडल अस मी मानीत नाही. त्या कशासाठी आल्यात हे आम्हाला चागलं माहीत आहे. आता गोदावरी परुळेकरं देखील आल्या येईनात ! हजेरी लावून स्वत चं राजकीय अस्तित्व सिद्ध करणं हेच जर कारण असेल तर त्यात बिघडलं कुठ ? एक गोष्ट लक्षात घ्या, ही सगळी माणसं इथं येताच खेरवाडीला भेट देतात आणि सहानुभूती व्यक्त करून झाल्यावर निधी गोळा करायचा प्रयत्न करतात; पण त्यापैकी कुणी स्वत.च्या खिशातील दहा रुपये तरी काढून दिलेत का ?'

राजकारणी मंडळीच्या हजेरी लावण्याबद्दल चाललेली चर्चा थांबविण्याच्या उद्देशानं मी म्हणालो–'महाराष्ट्रामध्ये ऊसतोडीला विरोध करून साखरकारखाने सुरू होऊ द्यायचे नाहीत अशी भूमिका शेतकरी संघटनेनं सुरुवातीला घेतली होती; पण हळूहळू एकामागून एक कारखान्यानी गळित सुरू केलं. ज्या निफाड साखरकारखान्यानं ह्या आंदोलनाला सुरुवातीपासून पाठिंबा दिला त्यानी तरी कारखाना सुरू करणार नाही ह्या भूमिकेबद्दल ठाम राहायला नको होतं का ? जॉर्ज फर्नांडिसनी शरद जोशीना जे पत्र लिहिल त्यामध्ये ह्या मुद्दयावरच जास्त भर दिला आहे–त्यामुळं अनेक गैरसमज पसरण्याची शक्यता आहे तसे गैरसमज पसरावेत अशी जॉर्ज फर्नांडिसाची इच्छा असावी !'

भास्करराव म्हणाले–'तुमचा प्रश्न महत्त्वाचा आहे; पण निफाड कारखान्यानं आंदोलनाला पाठिंबा दिला म्हणून इतर सर्व कारखान्याचं गळित सुरू झाल्यानंतर देखील हा कारखाना बंद ठेवावा, का चालू करावा, ह्याबद्दल मतभेद होतील. आता जे ऊसकरी शेतकरी नाहीत त्याना साखरकारखाना एका ठराविक मुदतीत सुरू झाला नाही तर काय नुकसान होत ह्याची कल्पना असणं शक्य नाही. मी साखरकारखान्यात काम केलेला मनुष्य आहे. साखरकारखाने दहा नोव्हेंबरपर्यंत चालू न करण हैं शेतकऱ्याच्या आणि कारखान्याच्या बिलकूल हिताचं नाही, हे मला स्वतःला चागलं माहीत आहे. ऊस गाळायचा म्हटल्यानंतर त्या कारखान्यातील मशिनरी पुढ एखादा महिना बंदही राहू शकेल, हे ध्यानात घेऊन अगोदरच दहा-पंधरा दिवस 'रिझर्व' ठेवावे लागतात. ह्या तात्रिक अडचणी प्रत्येकाला–विशेषतः बिगरऊसवाल्या शेतकऱ्याला माहीत असणं शक्य नाही. त्यामुळं निफाडचा कारखाना सुरू झाला तर ही मंडळी टीका करणारच. सुदैवानं शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी ह्यांना ह्या वस्तुस्थितीची पुरेपूर कल्पना आहे. शेतकरी आदोलन म्हणजे हेकेखोरपणानं शेतकऱ्याचं नुकसान झालं तरी बेहेत्तर, पण आपलंच म्हणणं रेटायचं, अशी त्याची वृत्ती नाही. महाराष्ट्रातील इतर कारखाने सुरू झाले असताना एकच कारखाना बंद ठेवायचा आग्रह धरण्यात काहीच अर्थ नव्हता. हा कारखाना चालू झाला म्हणून मला किंवा आदोलनातील इतर कार्यकर्त्यांना काहीही गैर वाटलं नाही. शरद जोशीवर त्यामुळ टीका करावी ह्याला तर मुळीच अर्थ नाही.

'निफाडचा कारखाना बंद आहे अस लोकांना वाटत होतं तो

आभास वेळीच दूर करणं आवश्यक होतं. तसा तो दूर केला गेला नाही ही गोष्ट खरी; पण त्यासाठी जोशींना जबाबदार धरता येणार नाही. माधवराव बोरस्तेंच्यामुळं असा आभास निर्माण करण्यात आला, असा समज पसरविण्याचा सध्या प्रयत्न चालू आहे. जॉर्ज फर्नांडिसनी जे पत्र छापलं त्याचा उद्देश देखील हाच आहे. इंदिरा कॉंग्रेसला विरोध करण्याचाच मूळ हेतू त्या पत्रकामध्ये स्पष्ट दिसतो.

'वास्तविक शरद जोशी सर्वच पक्षावर टीका करतात ही गोष्ट उघड आहे. सत्ताधारी असो-नसो, सर्व राजकीय पक्षावर ते उघडपणे टीका करतात. असं असून देखील इंदिरा कॉंग्रेसचाच एक नेता—माधवराव बोरस्ते त्याच्याबरोबर आहे—तेव्हा त्याच्यात काही तरी डाव असला पाहिजे, असं लोकाच्या डोक्यात घुसविण्याचा सध्या प्रयत्न चालू आहे. जॉर्जचा प्रयत्न देखील ह्याच धर्तीचा !

'काही लोक तर असही म्हणतात की, अंतुलेला शेवटी वाजवायचा म्हणून वसंतदादानीच माधवराव बोरस्तेंना शरद जोशीबरोबर सोडलेलं आहे. हे सर्व राजकारण्याचे खेळ आहेत. शेतकऱ्यांना मात्र आता ह्या खेळात काही गम्य नाही आणि राजकारणी लोकाना हे जितकं लवकर उमजेल तितकं त्यांचं भलं होणार आहे !'

श्री. भास्करराव गागुर्डेंच्याबरोबर मनमुराद गप्पा मारल्या, पोटभर पेरू खाल्ले आणि त्यांचा निरोप घेऊन आम्ही सटाण्याचा रस्ता पकडला

□

बागलाणचा परिसर म्हणजे नासिक जिल्ह्यातील शेतकरी आंदोलनाचा बालेकिल्ला मगरूळपीर फाट्यावरच्या सत्याग्रहात ह्या भागातील शेतकरी फार मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

आम्ही सटाण्यात पोहोचलो आणि सरळ तहसील कचेरीवर गेलो. हजारो शेतकऱ्यानी तहसील कचेरीला घेरावो घातला होता. पोलीस सत्याग्रहींना अटक करून एसटीच्या बसेसमध्ये बसवत होते. तहसील कचेरीच्या आसपास एसआरपीच्या तुकड्या होत्या; पण लाठ्या सरसावून नाही. सटाण्यात सत्याग्रहीवर लाठीहल्ला करण्याअगोदर अधिकारी मडळींना खूपच विचार करावा लागला असता मोठ्या संख्येनं शेतकरी तहसील कचेरीभोवती जमले होते; पण पोलिसानी आपला सयम राखला होता; संयम राखणं त्याना भाग होतं. शाततापूर्ण वातावरणात अटक चालू होती. मी एका सत्याग्रहीला विचारलं, 'रोज उठून रस्ता आडवणं, रोज तहसीलकचेरीवर मोर्चा, अटकसत्र हे असं सगळं किती दिवस चालणार ?—आंदोलनाची तीव्रता अशीच टिकून राहणार का ?' तो सत्याग्रही आत्मविश्वासानं म्हणाला—

'तीव्रता शेवटपर्यंत टिकणार. उपाशीपोटी सतत कर्जबाजारी होऊन मरण्यापेक्षा हा लढा देऊन मेलेलं जास्त चागलं आतापर्यंत आम्हाला आयुष्यात कुठंच समाधान गवसलं नाही. आम्ही कष्ट करतोयच; पण नफा काहीच नाही. आता ह्या लढ्यामुळं आम्हाला नाही तरी आमच्या पोराबाळाना सुखाचे दिवस मिळणार अशी आमची खात्री झाली आहे !

'आम्हाला शेती कधीच परवडत नव्हती; पण ती का परवडत नाही हेच कळत नव्हतं. आता मात्र स्पष्ट खुलासा झाला आहे. आम्हाला आता योग्य मार्गदर्शक मिळाला आहे. आमचं दुखणं त्यानं अचूक हेरल आणि त्यावर उपाय देखील अचूक सुचवला. एकदम रामबाण उपाय !

'आतापर्यंत आम्ही पुष्कळ नेते बघितले; पण हा नेता त्या सर्वांहून वेगळा आहे. आपलं ऐषआरामी जीवन सोडून हा आमच्याबरोबर, आमच्यासाठी वणवण फिरतोय ! ह्यापूर्वी असा त्याग कुणी केल्याचं आम्हाला आठवत नाही. त्यामुळंच आता जातपात, पक्ष ह्या गोष्टींना कुणी महत्त्व द्यायला तयार नाही. अगदी आमच्या आमच्यातील पातळीवरचं पक्षाचं राजकारण देखील आंदोलन सुरू झाल्यापासून पार खलास झालंय! पूर्वी असं कधी घडल्याचं आम्हाला आठवतच नाही. जो शेती करतो, शेतीवर राबतो तोच आमचा पक्ष. आमची जात एकच— शेतकरी ! ब्राह्मण, वाणी, हरिजन, मराठा ह्या जातींचा प्रश्नच नाही. शेतकरी हीच आमची जात. राजकारणी लोक जातींच्या प्रश्नावरून आमच्यात फूट पाडायचा प्रयत्न करतील—करत आहेतच; पण इथून पुढं त्याना फारसं यश येणार नाही. जातीयवाद मानणारेच अशा राजकारण्यांच्या मागं जातील— खरे शेतकरी जाणार नाहीत !

'कांदा—ऊस आणि इतर शेतमालाला योग्य भाव जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत हा लढा चालूच राहणार ! आम्हाला आता दिशा सापडली आहे मार्ग दिसायला लागलाय. आमच्या भागात ह्या अगोदरही शेतकरी सघटना उभारण्याचे अनेक प्रयत्न झाले— पण त्या प्रयत्नाना नेहमी राजकीय नेतृत्व मिळालं सर्वांचा पक्षीय स्वार्थ ! सघटना टिकलीच नाही.

'आता माग-याच आठवड्यात इथं शरद जोशींची सभा झाली. अगोदर कसलाही प्रचार नव्हता. हँडबिल नाहीत, जाहिरात नाही, सभेची वेळ ठरलेली नाही. शरद जोशी त्या दिवशी केव्हा तरी येणार एव्हढच फक्त माहीत होत ते आले आणि काही मिनिटांतच वीसपचवीस हजार माणसं सभेला जमली. वास्तविक रहदारी बंद होती. एस् टी. बद होती. तशात सभाबंदीचा आदेश— तरी देखील एव्हढ्या मोठ्या संख्येनं शेतकरी शरद जोशींचे विचार ऐकायला जमले. ह्यापूर्वी कुठल्याही सभेला सटाण्यात अशा प्रकारची गर्दी जमली नव्हती. हीच सभा जर अगोदर व्यवस्थित जाहिरात वगैरे करून घ्यायचं ठरवल असतं तर एक लाख शेतकरी आले असते !

'शरद जोशींना सरकारनं आता पुन्हा तुरुंगात टाकलं आहे, त्यानी उपोषण सुरू केलंय— आंदोलनाची तीव्रता इथून पुढं फार वाढणार ! आतापर्यंत आमच्या परिसरातील नामांकित कार्यकर्ते, मधल्या फळीचे कार्यकर्ते, हेच पुढाकार घ्यायचे आणि आम्ही त्यांच्या मागं असायचो. आता ह्या बहुतेक सगळ्या कार्यकर्त्यांना देखील अटक झाली आहे—पण आता आमच्यासारखे साधे शेतकरीसुद्धा आंदोलन चालू ठेवणारच ! आम्ही अटक व्हायला तयार आहोत. पोलिसांच्या लाठ्या खायला तयार आहोत. त्यांच्या बंदुकीच्या गोळ्यांची आम्हाला भीती वाटत नाही आता काय व्हायचं ते एकदाच होऊन जाऊ दे ! दग्वर्षी कर्ज

**शेतकरी हीच आमची सगळ्यांची एक जात....**

बाजारी होण्यापेक्षा– एक वर्ष संपूर्ण नुकसान झाल्यामुळं अखेरीस शेतमालाला भाव मिळणार असेल तर त्याला देखील आमची तयारी आहे. हे नुकसान सोसायला सगळे तयार आहेत !

'आमच्या सर्व स्थानिक पुढाऱ्याना जरी सरकारनं अटक केली तरी सटाण्यातला अगदी शेवटचा शेतकरी देखील शरद जोशीच्या आदेशाप्रमाणे आदोलन चालू ठेवणार ! सध्याच्या स्थितीत स्थानिक पुढाऱ्याच्या नेतृत्वाची देखील आम्हाला गरज नाही. आम्हाला आदेश पक्का समजला आहे. आता फक्त 'रस्ता बद' आदोलनच चालू आहे पण भविष्यकालात जरूर पडल्यास संपूर्ण राज्यकारभार बंद पाडण्यास देखील शेतकरी सत्याग्रह करील ! शरद जोशीनी सागितल्याप्रमाणे अंतिम विजय आमचा आहे ह्याबद्दल आमची खात्री आहे. राजकारणी मंडळी स्वतःच्या स्वार्थासाठी काय वाटेल ते म्हणोत – त्याच्या भूलथापाना आता शेतकरी फसणार नाही !'

¤

१८ नोव्हेंबर १९८०. नासिकच्या स्थानिक वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर 'आदेश आदेश आदेश' अशी भली मोठी जाहिरात छापून आली. जाहिरातीखाली सहा प्रतिष्ठित मडळीची नावे होती. शरद जोशी, माधवराव खंडेराव मोरे, माधवराव बोरस्ते किंवा प्रल्हाद पाटील कराड ह्याच्या नावाचा उल्लेखदेखील मजकुरात नव्हता. त्याचप्रमाणे 'केव्हाही–कुठेही रस्ता बंदी' आणि 'लोकप्रतिनिधीचे राजीनामे–घेराओ' ह्याचाही उल्लेख नव्हता. त्याऐवजी नासिक शहरात मूक मोर्चा, गावोगाव मूक मोर्चे आणि साखळीउपोषण असले काही तरी भलतेच कार्यक्रम सुचविले होते

ही जाहिरात वाचून शेतकऱ्याची फार मोठी दिशाभूल होणार आणि आदोलनाच्या कार्यक्रमात गोधळ माजणार, अशी माझी खात्री झाली. ह्या जाहिरातीची काय प्रतिक्रिया उमटते हे गावोगाव फिरून पहाण्याचे मी ठरविले. ता १८, १९, २० नासिक जिल्ह्यातील तालुक्यात भ्रमंती सुरू केली

सर्व ठिकाणी (निफाडमधील एक–दोन गावे सोडून) स्थानिक कार्यकर्त्यांच्यात एक प्रतिक्रिया हमखास आढळली. ती म्हणजे– 'अहो, खाली ज्या मडळीची नावं छापलीत त्याना आम्ही चागलं ओळखतो. त्यानी कितीही मोठी जाहिरात दिली तरी उपयोग नाही. जाहिरातीमधील भाषा शरद जोशीची नव्हे, हे आदेश त्याचे नव्हेत, हे आम्हाला लगेचच समजलं.' शरद जोशीचे विचार शेतकऱ्यांच्या मनात किती पक्के रुजले आहेत त्याचा हा पुरावा होता· ह्या जाहिरातीमुळं जिल्ह्यातील शेतकऱ्यात राजकारणी मंडळीविषयी जास्तच अविश्वास निर्माण झाला होता.

जिल्हा अर्स कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. सूर्यभान गडाख ह्यानी ११ जणांची अस्थायी समिती स्थापन केल्याबद्दल सर्वत्र तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येत होती. पत्रकाराशी बोलताना श्री. सूर्यभान गडाख म्हणाले– 'श्री. निहाल अहमद ह्यांच्या सूचनेवरूनच ही समिती स्थापण्यात आली.' पण श्री. निहाल अहमद यानी ह्या गोष्टीचा साफ इन्कार केला. त्यामुळं नासिक जिल्ह्यातील अर्स कॉंग्रेसतर्फे, शरद जोशी जेलमध्ये जाताच, आदोलनात फूट पाडण्याचे कुटिल कारस्थान सुरू झालं, असच सर्व शेतकरी म्हणू लागले श्री सूर्यभान गडाख याच्या नेतृत्वाखाली स्थापण्यात आलेल्या ११ जणाच्या समितीत सामील होण्यास श्री निहाल अहमद, श्री दौलतराव देवरे, श्री. टी. आर. पवार ह्यानी स्पष्ट नकार दिला आणि तसे जाहीरदेखील केले.

'आदोलन चालू असताना नेतृत्वाचे वाद निर्माण करू नयेत' असे विरोधी पक्षनेते श्री ग. प्र. प्रधान ह्यानी नासिक येथील शिल्पा हॉटेलमध्ये पत्रकाराशी बोलताना सांगितले. 'डाव्या आघाडीतर्फे या आदोलनाच्या दृष्टीने काहीही प्रयत्न चालू नाहीत', असही श्री. प्रधान यानी स्पष्ट शब्दात सागितले.

त्याच दिवशी, म्हणजे १८ नोव्हेंबरला श्री सूर्यभान गडाख ह्यानी स्थापन केलेल्या समितीची पहिली सभा आयोजित केली होती; पण सभा झालीच नाही !

भारताची राजधानी दिल्ली येथे शेतकरी आदोलनाविषयी विविध गटात चर्चा सुरू झाल्या. ह्या सदर्भात राज्यसभेत माडण्यात आलेल्या एका लक्षवेधी सूचनेस उत्तर देताना केंद्रीय कृषिमंत्री राव वीरेंद्रसिंग म्हणाले– 'महाराष्ट्र आणि इतरत्र चालू असलेल्या आदोलनामागे राजकीय हेतू असल्याने शेतकऱ्यानी ते मागे घ्यावे. हे आदोलन संपूर्णपणे चुकीच्या सल्ल्यानुसार आणि विशिष्ट राजकीय घटकाच्या गैरनेतृत्वाखाली काही शेतकरी चालवीत आहेत, हे त्या शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे !'

नासिक आणि धुळे, अहमदनगर वगैरे जिल्ह्यात सुरू झालेल्या शेतकरी आदोलनाचा आतापर्यंत आढावा घेता केंद्रीय कृषिमंत्र्याचे विधानच 'राजकीय' असल्याचे सहज लक्षात येते.

नासिक जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. बळीराम हिरे आणि नासिक जिल्हा इदिरा कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. हरिभाऊ तिसगे याना काढून टाकण्यात यावे, अशी मागणी १९ नोव्हेंबर रोजी बहुसख्य कार्यकर्त्यांनी केली. जिल्ह्यामध्ये आंदोलनाचा डोब उसळला असताना एकाही आदोलनग्रस्त भागाला पालकमंत्रिमहोदयानी भेट दिली नाही ह्याबद्दल नापसंती व्यक्त करण्यात आली

ह्या दिवशी अर्स कॉंग्रेसतर्फे स्थापण्यात आलेल्या कृतीसमितीने 'आदेश आदेश आदेश' ह्या जाहिरातीमध्ये सूचना दिल्याप्रमाणे नासिक शहरात मूकमोर्चा आयोजित केला होता. ह्या मोर्चासाठी तीन–चारशे शेतकरी जमविण्यात आले होते. जाहीरात देणारे आणि शेतकऱ्याना मोर्चासाठी आवाहन देणारे नेते श्री. सूर्यभान गडाख, श्री. बाबुलाल आहेरे, श्री. मालोजी मोगल, जनता (जे पी)चे श्री. हरीभाऊ महाले, मार्क्सवादी श्री. गावीत व शेकापक्षाचे श्री. विठ्ठलराव हंडे ह्याचा मात्र मोर्चात सहभाग नव्हता. ही सर्वच नेतेमंडळी कुठं तरी अदृश्य झाली होती.

पुण्यातील एका वर्तमानपत्राने 'आमच्या खास प्रतिनिधीकडून' असा हवाला देऊन मथळा छापला, 'ऊस व कादा उत्पादकाचे आदोलन बारगळले !'

१९ नोव्हेंबरचा कृतिसमितीचा मूकमोर्चा बारगळला, ही गोष्ट खरी होती; पण शेतकरी संघटनेच्या आदोलनाचा जोर वाढत होता, ही सत्य परिस्थिती होती. त्या दिवशी फक्त कळवण–सटाणा परिसरातूनच एक हजाराच्यावर सत्याग्रहीना अटक करण्यात आली होती आणि आता स्त्रिया मोठ्या प्रमाणात आदोलनात सहभागी होऊ लागल्या होत्या. एक स्त्री–आदोलक माझ्या बायकोशी बोलताना म्हणाली–

'इथून पुढं आम्ही बाया मोर्चे काढणार ! फक्त उसाच्या आणि कांद्याच्या भावासाठी नव्हे तर आता शरद जोशींची सुटका झालीच पाहिजे, अशी आमची महत्त्वाची मागणी आहे आमची माणसं सरकारनं अगोदरच अटक करून नेलीत– आम्ही पण आता जेलमध्ये जाणार ! गावातल्या सगळ्या बाया घराला कुलपं लावून जेलमध्ये जायला तयार आहेत. इथं घरी बसून तरी काय करायचं ? शेतमालाला भाव मिळालाच पाहिजे ' शरद जोशींची सुटका झालीच पाहिजे !!'

मुंबई–पुण्याच्या वर्तमानपत्रानी काहीही म्हटलं तरी हे आंदोलन महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातून पसरणार अशी सुस्पष्ट चिन्हं दिसू लागली होती विदर्भातील आठ जिल्ह्यात ' चक्का जाम ' आंदोलन सुरू होणार, अशी घोषणा १९ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. विदर्भानं जाहीर केलेल्या आंदोलनाला सर्वच राजकीय पक्षानी ताबडतोब पाठिंबा जाहीर केला, ही गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे. नासिक आंदोलनाच्या सुरुवातीला राजकीय पक्ष गाफील होते– सहभागी व्हायला ' लेट ' झाल्यामुळे ' आंदोलनाची गाडी चुकली '– ती चूक विदर्भाच्या बाबतीत होऊ नये आणि आंदोलनात ' आम्हीदेखील सुरुवातीपासून होतो ' असे म्हणता यावं, याची दक्षता राजकारण्यानी यावेळी घेतली होती.

विधानपरिषदेतील विरोधीपक्षनेते श्री. ग. प्र. प्रधान यांनी ' शेतकरी आंदोलनाला सर्व विरोधी पक्षांचा पाठिंबा असल्याचे ' एका पत्रकार परिषदेत तातडीने जाहीर केले.

नासिक जिल्ह्यातील कळवणच्या परिसरात फिरत असताना मी अनेक कार्यकर्त्यांच्या, सत्याग्रहींच्या मुलाखती घेत होतो. एका मध्यम वयाच्या शेतकऱ्याला मी विचारलं– ' शरद जोशींना अटक होऊन त्यानी उपोषण सुरू करून चार दिवस झाले. ह्या चार दिवसात आणि अठरा नोव्हेंबरला कृतीसमितीची ' आदेश आदेश आदेश ' ही जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून शेतकऱ्याच्या मनात गैरसमज पसरले आहेत का ? कृतीसमितीचा मूकमोर्चा तर बारगळला– त्यामुळे पुण्या–मुंबईची वर्तमानपत्रे म्हणू लागलीत की– शेतकरी ' संघटनेत फूट पडली आहे, आंदोलनाला नेतृत्व नाही– ह्या सगळ्यांबद्दल तुमचं मत काय ?' आंदोलक शेतकरी म्हणाला–

' कृतीसमितीच्या ह्या जाहिरातीमुळं शेतकऱ्याच्यात फारसा गोंधळ झाला, असं मला वाटत नाही. वर्तमानपत्रवाल्याच्या मनात झाला असेल तर आम्हाला माहीत नाही. ' फूट पडली ' वगैरे काय पायजे ते वर्तमानपत्रवाले छापतील; पण आंदोलनावर त्याचा फारसा परिणाम होणार नाही. शरद जोशींचा आदेश मिळाला तर हा लढा आणखीन तीव्र होईल–

' आता काही पुढारीमंडळीनी उद्या म्हणजे २१ तारखेला नाशकात एक मीटिंग ठरवली आहे मी मीटिंगला जाणार ' पण तिथं जर ह्या पुढाऱ्यांच्यातच आपसात गोंधळ दिसला तर मग मात्र आम्ही तालुका पातळीवर निर्णय घेऊन ' रस्ता रोको ' सुरू करणार ! माणसं अटक करून घेणार !'

दुसरा एक शेतकरी सत्याग्रही सांगू लागला ' आता तुमच्या मुंबई–पुण्याच्या पेपरमध्ये जे छापून येतं त्याचा ह्या लढ्यावर फारसा परिणाम होत नाही ही वस्तुस्थिती आहे. तुम्हा शहरच्या मंडळींवर होत असेल– आमच्यावर नाही ! लोकांचा उत्साह जबरदस्त आहे. पूर्वीपेक्षा अधिक संख्येनं लोक लढ्यात उतरणार. सध्या जिल्हा पातळीवर राजकारणी मंडळीमध्ये कुरबुर सुरू आहे तिचा काय निकाल लागतो हे उद्याच्या मीटिंगमध्ये सहभागी होऊन आम्ही पहाणार आहोत. उद्याच्या सभेत डावे–उजवे– असं कॉंग्रेसचे असे सर्वजण येतील अशी अपेक्षा आहे काय होतं बघायचं !'

ह्या शेतकरी सत्याग्रहीना मी प्रश्न केला– ' शरद जोशींनी जेलमध्ये उपोषण सुरू करण्यापूर्वी जो आदेश दिला त्या कार्यक्रमानुसार लोकप्रतिनिधींचे राजीनामे आणि त्यानी ते स्वखुषीनं न दिल्यास घेराओ, अशी सूचना दिली होती. कृतीसमितीनं जाहीर केलेला नासिक शहरातील मूकमोर्चा किंवा साखळी–उपोषण हे शरद जोशींच्या आदेशातील कार्यक्रम नव्हते. राजीनामा मागण्याच्या कार्यक्रमाविषयी तुमचं मत काय ?' एक अनुभवी कार्यकर्ता म्हणाला–

' राजीनाम्याचा कार्यक्रम अमलात आणलाच पाहिजे असं लोकमत आहे. ह्या कार्यक्रमाबद्दल कुणाचच दुमत नाही लोकांचा असंतोष तीव्र आहे. लोकप्रतिनिधींना शोधून काढून– कारण बहुतेक सगळे कुठं तरी गायब झालेत, लपून बसलेत– त्याना घेराओ घालण्याच्या कार्यक्रमात वेळ फुकट घालवण्यापेक्षा चालू असलेल्याच आंदोलनाची तीव्रता कायम ठेवण्यासाठी, मोठ्या प्रमाणात सत्याग्रहाच्या शांततापूर्ण मार्गानं कायदेभंग करून, रस्ता अडविणे– तहसील कचेरीवर मोर्चा आणि अटक ह्याबद्दल लोकांच्यात जोरदार तयारी आहे. लोक फार मोठ्या संख्येनं ह्या कार्यक्रमात भाग घेऊ इच्छितात !

' त्याचबरोबर लोकमताचा अंदाज घेऊन हे लोकप्रतिनिधी स्वयंस्फूर्तीनं राजीनामे देतात का हे पहावं, असंदेखील काही कार्यकर्त्यांचं मत आहे. राजीनाम्याचा हा कार्यक्रम सध्या तरी फक्त नासिक जिल्ह्यापुरताच मर्यादित आहे पुढं-मागं जर शेतकरी संघटनेनं राज्यव्यापी आदेश दिला– शेतकरी संघटना तितकी वाढल्यानंतर– तर लोकप्रतिनिधींना घेराओ ह्या कार्यक्रमाला सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळेल ह्यात शंका नाही !'

ह्या अनुभवी कार्यकर्त्याला मी विचारलं, ' शरद जोशी सोळा नोव्हेंबरला तुरुंगात गेले. सतरा तारखेला काही मंडळींनी निफाड कारखान्यावर सभा घेऊन ' आदेश आदेश आदेश ' ह्या जाहिरातीचा मसुदा तयार केला. ज्या मंडळींची नावं ह्या फसव्या जाहिरातीखाली छापली आहेत, त्यानी शरद जोशी तुरुंगात जाताच आंदोलनाचं नेतेपण स्वत:कडे घेण्याचा प्रयत्न केला असं मला वाटतं ! तुमचं मत काय ?'

कार्यकर्ता म्हणाला, ' वस्तुस्थिती संपूर्णपणे तुम्ही म्हणता तशी मानायला मी तयार नाही. असं कॉंग्रेसच्या मंडळींनी स्वतंत्र समांतर शेतकरी संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न सुरू केलाय हे मान्य;

## इथून पुढं आम्ही बायाही मोर्चे काढणार....

परंतु बाकी पक्षाच्या नेत्याना निश्चितपणे जाणीव आहे की आपण, आता जर वेगळी संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न केला तर तो यशस्वी ठरणार नाही त्याचबरोबर ह्या चळवळीपासून दूर रहायला मात्र आता कुणीही तयार नाही, ही गोष्टदेखील शभर टक्के खरी आहे स्वतंत्र शेतकरी मघटना तर चालणारच नाही, लोक मान्य करणार नाहीत म्हणूनच काही तरी कृतीशील कार्यक्रम हाती घेऊन आदोलनात सामील व्हावं, अशी सर्व पक्षाच्या नेत्यांची इच्छा आहे. ' आपण आदोलनात नाही ' असं लोकाना जाणवू नये ह्यासाठी त्याची सारी धडपड चालू आहे.

'वास्तविक जाहीरात देणाऱ्या नेत्यानी मूकमोर्चात अग्रभागी असायला हवं होतं; पण ती मडळी आलीच नाहीत. स्वत ची कातडी बचावून दुसऱ्याच्या जीवावर राजकारण खेळण्याचा त्यांचा उद्देश असेल तर तो सफल होणार नाही. लोक आता फार जागृत आणि जागरूक झाले आहेत. एक गोष्ट नक्की, कृतीसमिती वगैरे स्थापन करून सर्व विरोधी पक्ष जरी जिल्हा पातळीवर एकत्र आले तरी त्यांना समातर शेतकरी संघटना यशस्वीपणे उभी करणं केवळ अशक्य आहे शरद जोशीची शेतकरी सघटना मोडून दुसरी राजकीय शेतकरी संघटना उभी करणं आता शक्य नाहो. इतर जिल्ह्यामधूनदेखील हळूहळू असाच अनुभव येईल.'

मी म्हटलं– 'तुम्ही म्हणता ते एक वेळ खरंही असेल; पण पुण्या-मुबईची वर्तमानपत्रे तर आदोलन संपूर्णपणे बारगळलं असाच प्रचार करीत आहेत !'

कार्यकर्ता म्हणाला– 'ते असा प्रचार करणारच. त्याचे दडलेले उद्देश वेगळेच आहेत– हितसंबंध अडकलेले आहेत. पुण्या-मुंबईची ही वर्तमानपत्रं काही आमच प्रतिनिधित्व करीत नाहीत– 'इंडिया'-वाल्यांचं प्रतिनिधित्व करतात ! आमचं तर साफ मत आहे, मराठीतून 'टाइम्स' काढणाऱ्यांनी एक वेळ टॉलस्टॉय वाचला असेल, पण त्यांना भारतीय शेतकरी समजला नाही हे निश्चित ! ही सगळी वर्तमानपत्रं मराठीतून छापली जात असली तरी ती 'इडिया'ची आहेत असं आम्ही मानतो. अहो, ह्या वर्तमानपत्रातील जाहिराती बघा ! आम्ही त्या वस्तू वापरतो का ? आम्हाला त्या जाहिरातीचा काही तरी उपयोग आहे का ? ह्या वर्तमानपत्रवाल्यानी काय वाटेल ते अग्रलेख लिहावेत, आमच्यावर त्याचा काडीइतकासुद्धा परिणाम होत नाही. शहरातील लोकावर होत असेल तर सध्या तरी आम्ही त्याची पर्वा करत नाही. काही दिवसानी तुम्हीच बघाल, शहरातील वाचकच ह्या वर्तमानपत्राना जाब विचारू लागतील ! आम्ही ग्रामीण भागातील शेतकरी ह्या बडया वर्तमानपत्रातील अग्रलेखांवरून आमची दिशा ठरवत नाही !

'साधी गोष्ट अशी आहे– इतकी वर्षं आम्हाला दिशाच नव्हती ! ह्या वर्तमानपत्राची गोष्ट तर सोडाच, ज्याना आम्हीच निवडून देत होतो त्या पुढाऱ्यानीदेखील आम्हाला कधी योग्य मार्गदर्शन केल नव्हतं. ह्या कुणालाच ग्रामीण शेतकऱ्याचं खरं दुखणं काय, ह्याचीच कल्पना नव्हती. मग हे मार्गदर्शन कसलं बोडक्याचं करणार ? आता आमचं 'टारगेट' एकच– शेतमालाला भाव– हे आता आम्हाला एकदा समजल्यावर अमका पक्ष सहभागी झाला काय अन् सहभागी नाही झाला काय– आदोलनाच्या दृष्टीनं काहीच फरक पडत नाही. शेतमालाच्या भावाच्या प्रश्नावर सगळे शेतकरी संघटित होणार आणि शरद जोशीच्यामागे उभे रहाणार ! आज तालुका पातळीवर अमुक एक कार्यकर्ता शरद जोशीचा प्रवक्ता असं देखील ठरलेलं नाही. पुढंमागं जरूर पडल्यास त्याना अशा प्रवक्त्याची नेमणूक करावी लागेल; पण आज त्याची गरज नाही.

'१९ नोव्हेंबरच्या मूकमोर्चाच उदाहरण घ्या. १८ तारखेला इंदिरा कॉंग्रेसची काही माणसं आमच्याकडे आली आणि म्हणाली, सर्व मतभेद दूर झाले आहेत, सर्व पक्षानी एकत्र येऊन मूकमोर्चा काढायचं ठरवलं आहे, तुम्ही सत्याग्रही पाठवा ! आम्ही त्याच्या म्हणण्यावर फारसा विश्वास ठेवला नाही. फक्त वीस-पंचवीस लोक पाठविले आणि प्रत्यक्ष मोर्चाचं स्वरूप पाहिल्यावर ह्या मंडळीचं सगळं राजकारणंच उघडं पडलं. अटक करून घ्यायला अर्स कॉंग्रेसची नेतेमंडळी मोर्च्यात नव्हती ! सागण्याचा उद्देश थोडक्यात असा की, राजकीय मंडळीनी शेतकरी संघटनेत फूट पाडण्याचा जरी प्रयत्न केला तरी त्याला यश येणार नाही. समजा, थोडं-फार यश सुरुवातीला मिळालं तरी ते अल्पकाळ टिकणारं असेल आणि स्वार्थी पुढाऱ्यांना अखेरीस पश्चात्तापदग्धच व्हावं लागेल !'

मी विचारलं, 'समजा, हे पुढारी असल्या प्रयत्नानंतर पश्चात्ताप पावून परतले आणि म्हणाले, 'पुन्हा असं करणार नाही, आम्हाला शेतकरी सघटेत समावून घ्या– तर ह्या मंडळीना तुम्ही स्वीकारणार का ?'

'का नाही स्वीकारणार ? जरूर स्वीकारू !' कार्यकर्ता आत्मविश्वासानं सागू लागला– 'ह्या मंडळीना बाजूला ठेवून आदोलन चालवावं अशी कल्पना मुळातच नव्हती. भविष्यातही असायचं काही कारण नाही. आता मालोजी किंवा सूर्यभान या पुढाऱ्याना लोकात वावरण सध्या कठीण दिसतंय, पण त्यानी जर लोकांचा विश्वास संपादन करून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तर पुन्हा लोकात वावरणं शक्य आहे डॉ. गायकवाड हे इंदिरा कॉंग्रेसचे आमदार आहेत; पण ते आमच्या परिसरात यावयास सध्या तयार नाहीत. ह्या सर्वांना वाटतं, आपण आलो आणि घेराओ पडला तर ! ह्या मंडळीना आमचं एवढंच सागणं आहे की, मोकळ्या मनानं जे आंदोलनात सहभागी होण्यासाठी येतील, मग ते कुठल्याही पक्षाचे असोत– आम्ही त्याच सन्मानान स्वागत करू. स्वत. शरद जोशीनी ही भूमिका सुरुवातीपासून स्पष्ट केली आहे.'

मी प्रश्न केला–'श्री. जॉर्ज फर्नांडिसनी जे पत्र शरद जोशीना लिहिलं आणि त्याच्या हजारो छापील प्रती वाटल्या त्याबद्दल तुमचं काय म्हणणं ?'

कार्यकर्ता नापसतीनं मान हालवत म्हणाला, 'आम्हाला कुणालाच ते अजिबात पटलं नाही. जॉर्ज फर्नांडिसला नासिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांमधे काडीचीही किंमत नाही ! जॉर्जनी नासिकमधे मोर्चा काढला–किती जणांना अटक झाली ?–फक्त हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच लोकाना ना ? त्या उलट कृती समितीनं मूकमोर्चा काढला.–कुणाच्या आदेशान का असेना–तेव्हा तीनशे चौदा लोकाना अटक झाली, हा फरक तुम्ही ध्यानात घेणार की नाही ? जॉर्ज हा शेतकऱ्यांचा नेता असं शेतकरी मानीत नाहीत.–तुमचे वर्तमानपत्रवाले कितीही मोठ्या टाइपात त्याच्या नावाचा फ्रंट पेजवर

मथळा टाकीत ! आमच्यासारखे कार्यकर्ते काय म्हणतात, जॉर्ज हा चळवळीतला मनुष्य आहे अनुभवी आहे–झाला तर आंदोलनाला त्याचा उपयोग होईल ! पण जॉर्जचा उद्देश भलताच निघाला ही दुर्दैवाची गोष्ट! जॉर्जसारखी माणसं केवळ लपंडाव खेळायला आलीत हे आमच्या ध्यानात आलं आणि मग अशा लोकांना शरद जोशींनी आंदोलनापासून दूर ठेवलं तर त्या वावगं काहीच नाही. उलट ते अतिशय योग्य आहे असंच म्हणावं लागेल !'

मी शेवटचा प्रश्न विचारला–'शरद जोशींच्या विचाराबद्दल नेतृत्वाबद्दल ..' मला पुढं बोलू न देताच कार्यकर्ता काहीसा उसळून म्हणाला–

'कसलाही प्रश्न नाही. विचारांबद्दल–नेतृत्वाबद्दल कसलाच प्रश्न पडलेला नाही. तुम्हाला पडला असेल तर आम्हाला त्याची पर्वा नाही ! मतामताचा हा गलबला नासिक शहरात जो दिसतो किंवा पुण्या–मुंबईच्या वर्तमानपत्रातून जो गोंधळ दिसतो त्याचा प्रत्यक्ष आंदोलनाशी काही संबंध नाही. ग्रामीण भागातील शेतकऱ्याला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. ही असली जॉर्जसायबाची पत्रकं किंवा फसव्या जाहिराती ह्याचा परिणाम म्हणून लोक उलट जास्तच भडकून उठतात. ह्या उपऱ्या नेत्यांना आंदोलनात सहभागी व्हायचं असेल तर असला क्षुद्र स्वार्थीपणा त्यांनी सोडावा असं लोकांच म्हणणं आहे.'

¤

शरद जोशींच्या विचारांबरोबरच नासिक आंदोलनाचं वारं हळूहळू इतरत्र पसरत होतं–काही ठिकाणी तर त्याला झंझावाताचं स्वरूप आलं होतं. कापसाला सातशे रुपये भाव मिळाला पाहिजे, या मागणीसाठी वीस नोव्हेंबरला विदर्भात 'चक्का जाम' आंदोलन छेडण्यात आलं विदर्भातील आठ जिल्ह्यातील पंधरा हजार शेतकरी आंदोलकांना अटक करण्यात आली यवतमाळच्या परिसरात शेतकऱ्यांना पांगविण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला तेव्हा एक आंदोलक जखमी झाला. इतर पाच ठिकाणी पोलिसांनी अश्रुधुराचा वापर करून लाठीहल्ला केला

त्याच सुमारास गुजराथ प्रांतामध्ये मेहसाणा येथे शेतकरी आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन आंदोलक ठार झाले.

इंदिरा कॉंग्रेसचे खासदार प्रा. रामकृष्ण मोरे यांनी वीस नोव्हेंबर रोजी पुणे येथे पत्रकाराशी बोलताना स्पष्ट केले–'गय करणार नाही वगैरे भाषा मुख्यमंत्र्यांना सोडून द्यावी लागेल आणि शेतकरी नेत्यांशी चर्चा करावी लागेल !' शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करताना श्री. मोरे म्हणाले–'हे आंदोलन राजकीय नव्हते; पण श्री. फर्नांडिस आणि श्री. शरद पवार त्यात स्वार्थासाठी उतरल्यामुळं आंदोलनाला राजकीय स्वरूप आलं' श्री. मोरेंच्या ह्या स्पष्टोक्तीनंतर पुण्यातील एका पेपरनं 'हुरळून जाऊ नका !' असा गूढ अग्रलेख लिहिला.

२१ नोव्हेंबर रोजी सहा विरोधी पक्षाच्या डाव्या आणि लोकशाही आघाडीने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याची मोहीम हाती घेण्याची घोषणा केली त्यासाठी एक डिसेंबर रोजी राज्यव्यापी 'रस्ता रोको' आंदोलन आणि सात डिसेंबरपासून नासिक जिल्ह्यातील मालेगाव ते नागपूर 'लॉंग मार्च' किंवा शेतकरी-शेतमजुरांची दिंडी असा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्याचबरोबर २५ डिसेंबरपासून एक सप्ताह पाळण्याचेही आघाडीने जाहीर केले. 'या सप्ताहात शेतकरी आणि शेतमजुरांच्या परिषदा, मेळावे, मिरवणुका वगैरे आयोजित करून केंद्र व राज्य सरकारचे त्यांच्या मागण्याकडे लक्ष वेधण्यात येईल,' असे श्री. शरद पवार यांनी सांगितले

श्री जॉर्ज नासिकरोड मध्यवर्ती कारागृहात अडकलेले. तुरुंगामध्ये हजारो शेतकरी आंदोलक. तेव्हा त्यांची एक सभा घेण्याची जॉर्ज ह्यांनी इच्छा प्रदर्शित केली होती असे कळले. सभा झाली नाही हे देखील कळले. तेव्हा श्री. जॉर्ज ह्यांनी अंतुलेंचा निषेध वगैरे करणारे पत्रक काढण्याचा निर्णय घेतला असेही कळले !

नासिक जिल्हा सहकारी बँकेच्या सभागृहात श्री. हरिभाऊ महाले यांचे अध्यक्षतेखाली एक सभा घेण्यात आली. सभेला श्रीमती सरोजिनी महिषी, श्री. सूर्यभान गडाख, श्री. मालोजी मोगल, श्री हडे, श्री. मालुसरे, श्री माधवराव गायकवाड वगैरे मंडळी हजर होती असे समजले सभेमध्ये निश्चित कुठल्या विषयावर चर्चा झाली हे मात्र कळू शकले नाही; पण शरद जोशींना आंदोलन चालवता येत नाही–आता आपणच काही तरी केलं पाहिजे–नाही तर आपल्या गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांचं नुकसान होणार ! असा एकंदर सूर असावा हा अंदाज.

२२ नोव्हेंबर १९८०–शरद जोशींच्या उपोषणाचा सातवा दिवस. प्रकृती खालावलेली. वजन चार किलोनी घटले. नाडीचे ठोके ६४. औषधोपचार करून घेण्यास स्पष्ट नकार. मरणोत्तर नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त.

शेतकरी आंदोलनाची व्याप्ती वाढणार ह्याचा अंदाज येऊन मुख्यमंत्री श्री. अंतुले ह्यांनी केंद्रीय कृषीमंत्र्याबरोबर फोनवरून संपर्क साधल्याची बातमी मुंबईहून प्रसिद्ध.

त्याचबरोबर खेरवाडी येथे दहा नोव्हेंबर रोजी आंदोलनात जखमी झाल्यानंतर हॉस्पिटलमध्ये पैगंबरवासी झालेल्या शौकतअली ह्या पोलिसाच्या मृत्यूसंबंधात शरद जोशी यांचेविरुद्ध इंडियन पिनल कोड ३०२ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला जाणार असल्याची बातमी प्रसिद्ध.

'शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर रोजी शाळा-कॉलेजातील व कृषीविद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शिक्षण सत्रावर बहिष्कार टाकून हरताळ पाळावा' असे शरद जोशींचे सरकारी इस्पितळातून आवाहन.

पुणे जिल्ह्यातील वडगाव–धायरी येथे दोन हजार शेतकऱ्यांचे निदर्शन. मेजर ठोसर यांची भुसा भरलेली प्रतिमा तिरडीवर ठेवून, तिची प्रेतयात्रा काढून, प्रतिमेला जोड्यांचा हार घालून जाहीर दहन. मेजर ठोसर यांनी एका लेखाद्वारे उसाच्या किंमतीबाबत केलेल्या

**'गय करणार नाही' वगैरे भाषा मुख्यमंत्र्यांना सोडून द्यावी लागेल.**

निवेदनाविरुद्ध शेतकऱ्यानी व्यक्त केलेली उत्स्फूर्त प्रतिक्रिया.

'महाराष्ट्रात शरद जोशी याच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेले आदोलन राजकीय नसून खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचे आदोलन आहे'– श्री. वसंतदादा पाटील यानी दिल्ली येथे एका वृत्तपत्रास मुलाखत देताना व्यक्त केलेले मत. त्याचप्रमाणे 'शरद जोशी हे खरे शेतकरी असून कामगाराप्रमाणे शेतकऱ्यातही नव्या अर्थाने जागृती आणण्याचे कार्य ते करीत आहेत,' अशी श्री वसंतदादा पाटील याची स्पष्टोक्ती.

महाराष्ट्राचे मजूर आणि सहकारमंत्री श्री. तिडके तातडीने दिल्लीला रवाना. केन्द्रीय कृषीमंत्री राव बिरेंद्रसिंग ह्यांचे बरोबर श्री. तिडके याची अडीच तास चर्चा. वाहतूक व तोडणीखर्च ध्यानात घेऊन उसाची हमी किंमत ठरवावी अशी श्री. तिडकेंची विनती. त्याचप्रमाणे साखरेच्या टक्केवारीनुसार महाराष्ट्र राज्याचे तीन विभाग पाडावेत अशी श्री. तिडके याची सूचना. महाराष्ट्र को ऑप-रेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनला कांद्याच्या निर्यातीचा परवाना देण्यात यावा अशी केंद्राकडे मागणी.

शेतकरी आदोलनाचे वारे राजधानीत वाहू लागले आणि श्रीवर्धन-मध्ये धुमधडाक्यात मतदान पार पडले.

तेवीस नोव्हेंबर १९८०. 'मुसुबी रस' फेम अग्रलेख लिहिणाऱ्या संपादकांनी त्यांच्या वार्ताहराकडून आलेली बातमी 'शरद जोशीना ग्लुकोजचे इंजेक्शन' असा मथळा देऊन फ्रंटपेजवर छापली. ह्याचा वार्ताहर म्हणत होता–'शरद जोशी यांना आज (२३ नोव्हेंबर) ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटच्या आदेशानुसार ग्लुकोजचे इंजेक्शन देण्यात आले. मॅजिस्ट्रेटचा हुकूम असल्यामुळे त्यांना ते घ्यावे लागले असे कळते!'– इतक्या गुप्त बातम्या ह्या वार्ताहरांना कशा काय समजतात ह्याबद्दल माझ्या मनात कूट प्रश्न.

चोवीस नोव्हेंबर १९८०. उपोषणामुळे प्रकृती चिंताजनक झाली असतानादेखील शरद जोशी यांनी अन्न व औषध घेण्यास नकार दिला होता. त्याना सक्तीने आहार देण्यात यावा असा न्यायालयाने आदेश दिल्याने 'सक्तीने आहार दिला गेल्यास उपोषणाला मुळीच अर्थ रहात नाही', अशी प्रामाणिक प्रतिक्रिया व्यक्त करून, एक वयोवृद्ध शेतकरी श्री मुरलीधर ढिकले यांचे हस्ते मुसुबीचा रस घेऊन शरद जोशींनी उपोषण समाप्त केले. त्यांच्या न्यायालयीन कोठडीची मुदत २८ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली.

सोमवार दिनाक चोवीस रोजी नासिक शहरातील बहुसंख्य शाळा आणि विद्यालये शरद जोशींच्या आवाहनाला पाठिंबा व्यक्त करण्या-साठी विद्यार्थ्यांनी हरताळ पाळून बंद ठेवली. नासिक जेल तुडुंब भरल्यामुळे शेतकरी आंदोलकाना ठाणे, पुणे, औरंगाबाद इथे हल-विण्यास सुरुवात झाली.

दिनाक चोवीस रोजी ती. जॉर्ज फर्नांडिस यांना देखील कोर्टात आणण्यात आले आणि सोडून देण्यात आले. नासिकहून जॉर्ज कुठे गेले ते लगेच कळू शकले नाही

पंचवीस नोव्हेंबर रोजी श्री. शरद जोशी आणि माधवराव खंडे-राव मोरे याना ठाणे येथील कारागृहात हलविण्यात आले श्री. माधव-राव बोरस्ते आणि प्रल्हाद पाटील कराड यांची रवानगी येरवड्याला करण्यात आली.

सव्वीस नोव्हेंबर रोजी श्रीवर्धनमधून भरघोस मतांनी निवडून आलेल्या मुख्यमंत्री अंतुलेंनी कुलाबा जिल्ह्याचे 'रायगड' असे नामांतर करण्याचा आदेश देऊन भवानी तलवार आणण्यासाठी लंडनचे बोईंग पकडले.

अठ्ठावीस नोव्हेंबर शुक्रवार १९८०. शरद जोशी आणि शेतकरी संघटनेच्या इतर नेत्यांची सुटका. नासिक जिल्ह्यातील शेतकऱ्याचे आंदोलन १४ डिसेंबरपर्यंत स्थगित करण्यात आल्याची शरद जोशींची घोषणा.

तीस नोव्हेंबर १९८० रविवार. वेळ सकाळी सातची. माझा फोन खणखणत होता. मी रीसिव्हर उचलला.

'शरद जोशी बोलतोय–' कानावर ओळखीचा आवाज पडला.

'बोला–' मी आनंदानं म्हणालो. [क्रमशः]

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

पुस्तके

# माणसंच :

## पण एस. टी. च्या विश्वातली

काही काही क्षेत्रं वरून दिसायला फार रुक्ष वाटतात. त्यांच्या व्यवहारात कसला म्हणून ओलावा आढळत नाही. तिथल्या चेहऱ्यांपासून फाइलीपर्यंत सगळं कसं कोरडं दिसतं. अर्थात् हे वरवरचं वाटणं असतं.कारण शेवटी, तिथंही काम करणारी माणसंच असतात आणि त्यामुळं राग–लोभ– काम–प्रेम आदी भाव-भावनांच्या असंख्य छटा तिथंही असणं अपरिहार्य असतं. कार्याच्या क्षेत्राची पार्श्वभूमी घेऊन हा आविष्कार घडत असतो, एवढंच मात्र व्यावसायिक रुक्षतेचा पडदा त्यावर असतो. तो दूर सारला की त्यामागच्या या 'जिवंत' विश्वाचं दर्शन घडतं. वसंत नरहर फेणे यांनी आपल्या नित्य परिचयाच्या, पण अंतरंग फारसं माहीत नसलेल्या एस. टी. च्या अनोख्या विश्वाचं असं दर्शन 'सेंट्रल बसस्टेशन' या कादंबरीतून घडवलं आहे.

नासिकचं सेंट्रल बसस्टेशन हे मध्यवर्ती स्थळ घेऊन श्री. फेणे यांनी हे चित्रण केलं आहे. या स्टेशनवर एका दिवसात घडणारी एक कहाणी अत्यंत वेगानं त्यांनी सांगितली आहे. या एका दिवसातल्या असंख्य छोट्या–मोठ्या प्रसंगांतून मानवी जीवनातले अनेक पैलू त्यांनी प्रभावीपणे चितारले आहेत.

'एनेस्के फोर्टीफोर' ही बस सिन्नरहून सुटली; पण बराच वेळ होऊन गेला तरी नासिकला पोहोचली नाही, इथून घटना सुरू होतात आणि मग, एस. टी. तली रिझर्वेशनची मंडळी आपापल्या जागा पकडत जातात तशी एकेक पात्रं पुढं यायला लागतात. घटनांचा पट विणत जातात. 'एनेस्के फोर्टीफोर'चा तरुण ड्रायव्हर हार्टफेलनं मृत्यू पावलेला असतो त्याच्या घरच्यांना कळवण्याचं अवघड काम केलं जातं. मग प्रेत आणून उत्तरीय तपासणी करून नातेवाइकांच्या ताब्यात दिलं जातं आणि पुन्हा दुसऱ्या कंडक्टर–ड्रायव्हरला घेऊन 'एनेस्के फोर्टीफोर' प्रवासाला निघते, अशी ही कथा. दोन बायका ठेवणारा जतकर, सहसा सभ्य शब्दात न बोलणारा तिळवे, साहेबाची मर्जी राखण्याचा प्रयत्न करताना त्यानं आपल्या पत्नीशी सूत जमवल्याच्या धक्क्यानं वेडसर झालेला बाबू, 'आय् ॲम. पी. आर. नाबर, बी. ए., एल्एल्. बी.' असं फोनवरही बोलणारा, जाधवच्या प्रेतावर आपल्यातर्फे हार घातला जातोय, हे सर्वांना कळावं, अशी इच्छा बाळगणारा डिव्हिजनल कंट्रोलर नाबर, प्रेत आणायला जाण्यासाठी का असेना, पण आपल्या नवऱ्याला त्यायला गाडी येणार, याचा अभिमान बाळगणारी कावळीणबाई, अपघाताचा मोका साधून आपल्या पोराला एस. टी. त चिकटवू पाहणारा जाधव ड्रायव्हरचा काका अशी अनेक नमुनेदार माणसं त्यात आहेत. एस. टी. स्टँडवरची गर्दी आहे, कोलाहल आहे. पावसाळा, चिखल, गाड्या वेळेवर न सुटणं, त्यातून भांडणं आणि वैताग हे नेहमीचे प्रकार ओघानंच आले आहेत.

फेणे यांची शैली बोचरी आहे. ते स्वतः भाष्य करीत नाहीत; पण प्रसंग असा चितारतात की क्षणभर हसू येतायेता कुठे तरी कळ जाणवावी, अस्वस्थ व्हायला व्हावं. अत्यंत मोजक्या शब्दात ते हा परिणाम साधून जातात. नोकरशाही कारभारापासून मरणातूनही स्वार्थ साधण्याच्या प्रयत्नापर्यंत अनेक प्रकारावरचं बोचरं भाष्य न लिहिता परिणामातून त्यांनी साधलं आहे. 'एस. टी.चे पैसे वाचविण्यासाठी ऑर्डिनरी कॉल करायचा. त्याऐवजी अर्जंट कॉल का केला', यावरच (मूळ विषय सोडून) बराच वेळ फोनवर चर्चा करणारे डी. सी, प्रेत आणायला गाडी द्यायला लागणाऱ्या तांत्रिक बाबींच्या पूर्ततेसाठी झटणारे अधिकारी, एखादा कर्मचारी मेला तर त्याच्या प्रेतावर हार घालण्यासाठी रक्कम मंजूर करता येते की नाही, याचा विचार करणारे आणि खुषमस्करे असे अनेक नमुने सांगता येतील. अनेक आढळणाऱ्या उच्च पदस्थांच्या अमानुष पण अपरिहार्य प्रवृत्तीचं दर्शन घडविणारा एक प्रसंग त्याच्या या बोचऱ्या प्रत्ययकारी चित्रणाची कल्पना द्यायला पुरेसा आहे

जेवता जेवता डी. सी. डीसीणीला म्हणाला,

'म्हणजे?' डीसीण उद्गारली आणि डाव्या हाती भाजीचं पातेलं नि उजव्या हातात पळी धरून गोठल्यागत उभी राहिली.

'एक ड्रायव्हरच मेला; पण ट्रॅजिकली! भाजी वाढ–'

डीसीण भानावर आली. तिनं नवऱ्याच्या ताटात भाजी वाढली.

'भाजी चांगली झालीय; पण काही म्हण तू, या दिवसात आपल्या कोकणात जे भेंडे मिळतात, त्यांची चव या देशावरच्या भेंड्यांना नाही!'

'ट्रॅजिक म्हणजे काय झालं?'

'तो गाडी चालवता चालवता मेला!' आणि चपातीचा तुकडा तोंडात.

.........

'कदाचित मोठा ॲक्सिडेंटसुद्धा झाला असता. बरं, हेमंतचा मास्तर काय म्हणतो?' डीसी.

'बराय म्हणतो प्रोग्रेस!' डीसीण–

.........

'त्या ड्रायव्हरला घरी नेलं का?' (डीसीण)

'अं? तो मेलेला होय? सगळं काही सांगून आलोय!'

डीसीण गप्प राहिली.

'त्याच्या घरी इन्फॉर्म केलं किंवा माहीत नाही. जेवून उठल्यावर त्या तिळव्याला फोन करतो. तू आठवण कर. थोऽऽडा भात!'

डीसीण मनःपूर्वक वाढू लागली नि डी. सी. मनःपूर्वक जेवू लागला.

जाधव मरण पावल्यावरचा त्याच्या घरचा आक्रोश सरळ, साध्या पद्धतीनं त्यांनी हृदयाला भिडवला आहे, तर प्रेत बाहेर काढताना भावनाशून्य होऊन आवेशानं झटण्याच्या प्रसंगातून त्यांनी क्षणिक का असेना; पण भीषण भावनाशून्यता विदारकपणे दाखवली आहे.

अशा अनेक प्रसंगांच्या भावछटांच्या गुंफणीतून हे 'सेंट्रलबस स्टेशन' उभं राहिलं आहे. (एक-दोन ठिकाणी रचनेचा गोंधळ आहे. बाकीचा भाग साध्या भूतकाळात आहे आणि मधेच एखादा प्रसंग चालू वर्तमानकाळात आहे) एका वेगळ्या क्षेत्राची पार्श्वभूमी त्याला लाभला आहे; पण अखेर तिथ

वावणारीही माणसंच आहेत म्हणूनच ती एस. टी.त असू शकतात, तशीच अन्य कुठेही असू शकतात. म्हणूनच एस. टी. या व्याव-सायिक क्षेत्रावरची कादंबरी' असं तिचं वर्गीकरण करायचं कारण नाही.

माणसाचं माणूसपण हरवल्याची सूक्ष्म पण स्पष्ट जाणीव 'सेंट्रल बसस्टेशन 'मध्ये साकारली आहे. 'एका वेगळ्या पार्श्वभूमी-वरची अस्वस्थ करणारी ' अशी ही स्वागतार्ह कादंबरी आहे.

—विजय कुवळेकर

सेन्ट्रल बस स्टेशन
ले. वसंत नरहर फेणे
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
पृ. १५६, किंमत : १६ रु.

---

फिनिक्स निवड

# Inside RAW

By Ashok Raina
The Story of
India's Secret Service.–Rs. 35/–

---

या पुस्तकामागे ' रॉ 'च्या ट्रेनिंग स्कूलचा फोटो आहे. अगदी एखाद्या ज्युनिअर (आता सीनिअर) एक्झिक्युटिव्हचा टुमदार बंगला असावा तसा. नावही त्याचे तसेच. 'वसंतविहार.' बाहेर एकच लॅम्बी उभी असलेले हे चित्र बघूनच CIA च्या लेग्ली हेडक्वार्टर्सची आठवण आली व 'रॉ 'चा हा कसला पोरखेळ असा विचार आम्हाला चाटून गेला. CIA ने म्हणे आतापर्यंत तीन लाख लोक मारले. त्यातील बहुसंख्य 'थर्ड वर्ल्ड 'मधील आहेत. त्यांच्या देशातील थोडेच मारले. त्यामानाने ' रॉ 'ने तीस किंवा तीनशे मारले असतील. Good Show. Keep it up, RAW!

राष्ट्रीय स्तरावर तशा आपल्याकडे चार मुख्य हेरसंघटना आहेत– १. तीन डिफेन्स सर्व्हिसेस, २. इंटेलिजन्स ब्युरो (IB) ३. RAW ४. JIC (Joint Intelligence Committee.)या चारही संघटनांनी बरेचसे प्रमाद केलेले आहेत इराणमध्ये वरीच उलथापालथ झाली तेव्हा ' रॉ 'ने बख्तियार सरकारची दखल (recognition) घाई-घाईत घेतली. त्या वेळेला ' रॉ 'ने तेथील क्रांतिकारी संघटनेचा परिपक्व विचार केला नाही.

अफगाणिस्तानातही तेच झाले. दाऊद सरकार उडवले गेले व नंतर तराकी व अमीनना पदच्युत केले गेले. या गोष्टीची ' रॉ 'ला शेवटपर्यंत कल्पनाच नव्हती !

या भारतीय संघटनेविषयी आतापर्यंत फारच कमी माहिती उपलब्ध होती. या पुस्तकाने ती पोकळी फारशी भरून निघत नाही थोड्याच वर्षांपूर्वी ' रॉ 'विषयी बोलणे निघाले असता, ' रॉ ' हा शब्दच काही लोकांना माहिती नव्हता असे आढळून आले.

स्वातंत्र्यानंतर भारतावर चार वेळा मोठे हल्ले चढवले गेले. या वेळेला सुद्धा ' रॉ 'ची कामगिरी फारशी उल्लेखनीय नव्हती. १९६२ च्या शोचनीय परिस्थितीला भारतीय हेरगिरी संघटनाच जबाबदार होती. अर्थात त्या वेळेला RAW नव्हती. असेल तिची बहीण IB किंवा JIC. १९७१ मध्ये जेव्हा पाकिस्तानने अचानकपणे हवाईहल्ला चढ-वला व पुढे १९७५ मध्ये शेख मुजीबुर रहमानचा खून झाला त्या वेळेला सुद्धा RAW झोपलीच होती. अगदी शेजारच्या 'नात्यागोत्यातल्या ' देशाबद्दल ही अवस्था तर लांबच्या देशाबद्दल बोलायलाच नको !

परंतु RAW सारख्या संघटना ऑक्टो-पसच्या टेंटेकल्ससारख्या पसरत जातात. अमेरिकेत तर दस्तुरखुद्द प्रेसिडेन्ट या टेंटेकल्समध्ये अडकले आहेत.

आणीबाणी आणण्यात ज्या संस्थेचा फार मोठा भाग होता अशी जनता पक्षाच्या नेत्यांची ठाम समजूत होती त्यात ' रॉ 'चा पुढाकार होता. रॉमुळे संसदेतही अनेकदा वादळं निर्माण झाली आहेत.

अमेरिकेतील सी. आय्. ए, रशियातील के. जी. बी., इराणची S A V A K व K O M I E T H या प्रसिद्ध आणि त्या मानाने कमी प्रसिद्ध अशा इतर गुप्तहेर संघटनांशी साम्य असलेली भारतातील ही हेरसंस्था या विषयावरील पहिलेवहिले पुस्तक.

कोणत्याही राजसत्तेचं अधिष्ठान दड-शक्ती हेच असतं. ते काही प्रमाणात अपरि-हार्यही आहे. राजसत्ता टिकवण्यासाठी आणि ती बळकट करण्यासाठी राज्यकर्त्यांना अंत-र्गत आणि बाहेरीलही घडामोडीची इत्थंभूत माहिती असणं हे आवश्यक असतं आणि पर्यायानंच अशी माहिती मिळवणारी यंत्र-णाही प्रत्येक राष्ट्रात असतेच, असावी लागते. अगदी वेदकाळापासून मनू आणि विशेषत: कौटिल्य यानी या हेरगिरीच्या शास्त्राची आवश्यकता जाणली होती.

अशा संस्थेबद्दल काहीही लिहिण्यातली प्रमुख अडचण म्हणजे विश्वासार्ह माहितीचा अभाव. ही अडचण जमेला धरूनही पाश्चात्य राष्ट्रातील अशा प्रकारच्या हेर-संघटनाविषयी किती तरी मनोरंजक आणि माहितीपूर्ण पुस्तके उपलब्ध आहेत; परंतु विषयाचा वेगळेपणा सोडला तर या पुस्तकात वाच-कांच्या अपेक्षा फारशा पुऱ्या होत नाहीत असंच म्हणावं लागेल.

रॉ (R A W) हा शब्द Research and Analysis Wing यातील प्रथमाक्षरे एकत्र करून झाला आहे. हे खाते संपूर्णपणे पंतप्रधानांच्या अखत्यारीतलं असून त्याचे कामाच्या सोयीसाठी अनेक विभाग–उप-विभाग पाडलेले आहेत. ब्रिटिशांच्या अम-दानीतही अशा तऱ्हेची गुप्त माहिती एकत्रित केली जात होती आणि सत्तांतराच्या वेळी नवीन राज्यकर्त्यांच्या हातात कमीत कमी माहिती मिळावी या दृष्टीने महत्त्वाची माहिती असलेली कित्येक कागदपत्रे नष्टही करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर सुरुवातीची कित्येक वर्षे अशी हेरयंत्रणा फारशी पद्धत-शीर स्वरूपात अस्तित्वात नव्हती. शेवटी १९६८ मध्ये श्रीमती इंदिरा गांधीच्या कारकीर्दीत ' रॉ ' या संस्थेचा जन्म झाला. या पुस्तकातल्या माहितीप्रमाणे The Research and Analysis Wing हे नाव त्या वेळचे कॅबिनेट सेक्रेटरी श्री. डी. एस्. जोशी यानी या संस्थेसाठी जी निरनिराळ्या नावाची यादी तयार केली त्यापैकी एक आहे. त्याचप्रमाणे ' रॉ 'चं आज जे स्वरूप आहे ते बरंचसं राजेश्वरनाथ काओ आणि शंकरन् नायर याच्या प्रयत्नाचं दृश्य स्वरूप आहे असं दिसतं. या पुस्तकात हेर कसे निव-डले जातात, त्याना शिक्षण कसं दिलं जातं इत्यादीची जी माहिती आहे ती सर्वसाधारण स्वरूपाची आहे. किंबहुना या विषयावरची इंग्रजी पुस्तके ज्यानी वाचली आहेत आणि पाश्चात्य–विशेषत: अमेरिकन आणि रशियन हेरयंत्रणाच्या कार्यपद्धतीची ज्याना वाचून का

होईना थोडी फार कल्पना आहे त्यांना तर या माहितीमध्ये काहीच विशेष वाटणार नाही.

'जनता' राजवटीत या संस्थेबाबत राज्य-कर्त्यांनी सूडाचं धोरण स्वीकारलं, या स्वरू-पाचं एक प्रकरण या पुस्तकात आहे. या संस्थेच्या कित्येक योजना केवळ पूर्वग्रहदूषित भूमिकेतून रद्द केल्या गेल्या असा उल्लेख या प्रकरणात आहे. पंतप्रधान मोरारजी देसाई आणि के. शंकरन् नायर याच्यातला एक संवादही या प्रकरणात उद्धृत केलेला आहे. 'रॉ' ही आणीबाणीच्या प्रकरणात संपूर्णपणे निर्दोष होती किंवा तिचा वापर केला गेला नाही असे लेखकानेही स्पष्टपणे कुठे म्हटलेलं नाही. त्यामुळे 'जनता' नेत्यांचा या संस्थेवर राग असणं हे शक्य आहे; परंतु ती चीड राष्ट्रहिताच्या दृष्टीने आवश्यक त्या गोष्टीही संस्थेने करू नयेत असे ठरवण्यापर्यंत गेली काय, हे सांगता येणे कठीण आहे

'युद्धस्य वार्ता रम्या' या उक्तीप्रमाणे अशा तऱ्हेच्या संस्थाबद्दल वाचणं–बोलणं हे नेहमीच रोचक आणि रोमांचक असतं. प्रश्न अशी यंत्रणा असावी की नसावी हा नसतो. या यंत्रणेमुळं मिळालेली माहिती ही एखाद्या प्रभावी शस्त्रासारखी असते राज-कारणात नैतिकतेला किंवा रूढ नीतिकल्पनाना फारसं स्थान नसतं हे खरं असलं तरीही काही विवेक बाळगावाच लागतो. ज्याच्या हातात सत्ता असते त्यांना आपली सत्ता येन-केनप्रकारेण टिकवायची असेल तर आणि स्वार्थासाठीही अशा यंत्रणाचा उपयोग करून घेणं फार सोपं असतं. या क्षेत्रातही आता पूर्वीच्या कल्पना झपाट्यानं नष्ट होऊन तांत्रिक ज्ञानाचा अमर्याद उपयोग केला जात आहे इलेक्ट्रॉनिक्स, व जुन्या हेरगिरीच्या कल्पना आणि पद्धतीच आता बदलल्या आहेत. हे शस्त्र आता अत्यंत प्रभावी, तितकंच अधिक संहारकही झालं आहे. ज्या राष्ट्रातील राज्य-कर्त्यांना हे शस्त्र योग्य रीतीने वापरण्याचा विवेक असेल त्या राष्ट्रातील जनतेला काळ-जीचं कारण नाही मुख्य प्रश्न राज्यकर्त्यांच्या मनोवृत्तीचा आहे. एका वेगळ्या विषयावर पुस्तक लिहिल्याबद्दल मात्र लेखक अभिनंद-नास पात्र आहे.

आता 'रॉ' बारा वर्षांची झाली आता तरी तिने वयात यायला पाहिजे. C. I. A किंवा K. G. B. सारख्या डर्टी ट्रिक्स करण्या-साठी आणखीन जोमाने तिने पुढे सरसावले पाहिजे. मगच RAW ही RIPE होईल!

—अॅड. बी. आर. रानडे
—जे. एन्. पोंडा

---

## भा. ज. प. अधिवेशन : पृष्ठ ५ वरून

वाजपेयी व्यासपीठावर आल्यानंतर मात्र या पसरत चाललेल्या विस्कळित महिला अधिवेशनाला थोडासा आकार आला. धर्म आणि संस्कृतीच्या नावावर जुनाटपणा, अंधश्रद्धा याचे पुनरुज्जीवन भा. ज. प खपवून घेणार नाही असा निर्वाळा त्यानी दिल्यानंतर माझ्या जिवात जीव आला.

### पुढे काय ?

अटलजी पुन्हा पुन्हा सांगत होते की, व्यक्तिपूजेला भा ज. प. मध्ये मुळीसुद्धा स्थान नाही. असं असूनही जेठमलानी, सिकदर बख्त यानी अटलजींवर भरपूर स्तुतिसुमने उधळली होती, त्याचा उदोउदो केला होता. एवढंच नव्हे तर 'पंतप्रधानकी अगली बारी, अटल बिहारी, अटल बिहारी' अशा घोषणा सतत दिल्या जात होत्या. कदाचित व्यक्तिपूजा ही आपल्या रक्तातच भिनली आहे. त्याचं मूळ कदाचित आपल्या मूर्तिपूजेतच असेल समोर कुठल्या तरी देवाची मूर्ती असल्याशिवाय भारतीय माणूस जसा विश्वाचा विचारच करू शकत नाही त्याप्रमाणे समोर कोणी तरी एक जबरदस्त नेता असल्या-शिवाय सर्वसामान्य भारतीय माणसाला राजकारणही समजत नाही. म्हणूनच मग इंदिरा गांधीना तोडीस तोड अशी अटल बिहारीची प्रतिमा तयार करणं हे ओघानं आलंच. कदाचित ही गोष्ट आहे त्या परिस्थितीत आवश्यकही असेल; पण मग इंदिराजींना हटवण्याचे, तेवढंच ध्येय समोर ठेवून वाजपेयींची प्रतिमा तयार करण्यामध्येच भा. ज. प चे कार्यक्षेत्र गुंतून पडणार आहे का ? की इतरही काही ठोस कार्यक्रम हा पक्ष समाजाला देणार आहे ? युद्ध चालू असतं तेव्हा सैन्याला शिस्तीत ठेवणं, ताब्यात ठेवून कामं करवून घेणं सोपं असत. शांततेच्या काळातच या रिकाम्या सैन्याला सतत कशात तरी गुतवून ठेवून सैन्याची शिस्त शाबूत ठेवणं, सैन्याकडून काही विधायक काम करवून घेणं हे अत्यंत जिकिरीचं काम असतं. ते काम सेनापती किती कौशल्यानं करवून घेतो यावरच त्या सेनापतीचा मोठेपणा अव-लंबून असतो.

या अधिवेशनाला ही जी एवढी प्रचंड गर्दी जमली होती, त्यामध्ये स्त्रिया बहुसंख्येनं उपस्थित होत्या. तरुणाची फार मोठी संख्या होती. आदिवासीचे प्रतिनिधित्व करायला चोपडयाहून उत्साही कार्यकर्ते पांडुरंग पाटील आले होते. शेतकऱ्याचे प्रतिनिधी होते, मुस्लीमांचे होते, हरिजनाचे होते. समाजातल्या सर्व पातळ्यावरचे, विविध थरां-तले, सर्व वयोगटाचे स्त्री-पुरुष मोठ्या अपेक्षा बाळगून आलेले होते समतानगरच्या कार्यक्षम कारभाराने भारावून ते आपल्या ठिकाणी परत जातील ते नव्या आशा-आकांक्षा उराशी बाळगूनच ! आज त्याच्यापुढे किती तऱ्हेच्या, नित्य नवीन समस्या आहेत प्रत्येक घटकाचे प्रश्न वेगवेगळे आहेत त्याना सर्वांना समाधानकारक उत्तरे देण्यात भा. ज. प यशस्वी ठरेल का ? त्यांना कोणती नवी दिशा, नवी कार्यक्षेत्रे भा. ज प. उपलब्ध करून देणार आहे ? स्वातंत्र्य मिळाल्या-नंतर, कणखर लोकसभेची बाधणी करणे, बळकट राजकीय पक्षाची निकोप वाढ करणे, लोकशिक्षणाच्या वादातीत संस्था उभ्या करणे ही भारतीय लोकशाहीला पडलेली आव्हाने भा. ज प स्वीकारणार आहे का ? ही आव्हाने भा ज. प. किती सहजपणे स्वीकारू शकतो यावरच त्याचे यशापयश अवलंबून राहील. □

# चित्रपट

निखिल गजेंद्रगडकर

# शान

## प्रचंड बोगसपणा आणि प्रेक्षकांची फसवणूक

अनेक 'हिट' चित्रपट सादर करणाऱ्या सिप्पींनी सुमारे साडेपाच वर्षांपूर्वी 'पहिला हिंदी वेस्टर्न (!)' 'शोले' आणला आणि तो 'फ्लॉप' म्हणता म्हणता भारतीय चित्रसृष्टीत एक नवा इतिहास निर्माण करून गेला. तेच निर्माते जी. पी. सिप्पी, तोच तरुण उमदा दिग्दर्शक रमेश सिप्पी यांनी आता आणला आहे 'शान.' पण हाय ! या चित्रपटात काहीच 'शान'दार नाहीये. खूप अपेक्षा बाळगून (आणि वाढीव पैसे खर्चून) आपण या चित्रपटाला जातो.... आणि पदरी येते ती फक्त निराशा. आपला अगदी 'पचका' च होतो हो !

गेली पाचएक वर्षे निर्मिति-अवस्थेत असलेल्या या चित्राच्या प्रत्येक गोष्टीची प्रचंड जाहिरातबाजी अत्यंत कल्पकतेने केली गेली. अभिनेत्यांच्या निवडीसंबंधीच्या वावड्या, विविध मासिकांतून येणारे या चित्राच्या शूटिंगचे वृत्त, प्रचंड भव्य व अत्यंत महागड्या सेटवर पत्रकारपरिषदा, चित्रसृष्टीतले आघाडीचे अनेक कलावंत एकत्र इत्यादी अनेक गोष्टी प्रसिद्धीसाठी वापरल्या.

गेल्या काही महिन्यांत तर या सर्व गोष्टींनी कळस केला. 'क्रांती' व शान' कोणता सिनेमा अगोदर येणार, कुठला चालेल ? याविषयक मजकुरांनी सिनेनियतकालिकांची पाने ओसंडून वाहत होती, रेडिओवर अमीन सयानीचा जादुई आवाज उत्सुकता वाढवत होता, त्याच्या गाण्यांच्या 'अल्ट्रा स्टीरिओ' ध्वनिमुद्रिका खपत होत्या...आणि असा हा गाजत असलेला 'शान' अखेर एकदाचा आला, लोक प्रचंड उत्सुकतेने बघायला गेले आणि शिव्या देत बाहेर पडले !

होय, जो प्रेक्षक 'शान' बघून बाहेर पडतो तो शिव्याच देतो. कारण प्रत्येकापुढे एकच प्रश्न उभा असतो, तो म्हणजे सहा कोटी रुपये एवढी प्रचंड रक्कम खर्च करून असे काय मोठे विशेष यात दाखवले आहे ? (आणि दुसरा प्रश्न हे सगळे आम्हाला दाखवण्याची काही गरज होती का ?)

हे खरेच आहे. कथा सलीम जावेद यांची आहे एवढेच सांगणे पुरे. अगणित इंग्रजी चित्रांमधल्या गोष्टी त्यांनी इथे 'संग्रहित' केल्या आहेत. (तसे ते कधी करत नाहीत म्हणा !) एवढेच नव्हे, तर 'शोले'चा सुद्धा अनेक ठिकाणी प्रभाव जाणवतो. त्यामुळे हा एक चार तासांचा 'सुरेख' पीळ ठरतो.

'शान'मधील व्यक्तिरेखाही 'शोले'च्या मानाने अगदीच ढिसूळ आहेत. मात्र त्यांची पडद्यावरची 'एन्ट्री' ही जरा बऱ्यापैकी ठेवलेली आहे.

सुरुवातीलाच कर्तव्यदक्ष पोलिसअधिकारी शिवकुमारचे (सुनील दत्त) 'दर्शन' घडते. (एका खुन्याला पकडण्याचा हा सीन संताप येईल इतका पिळला आहे) त्याच्यानंतर आपल्यासमोर येते त्याची पत्नी (राखी) आणि त्यांचे एकमेव अपत्य गुड्डी. शिवकुमार आपल्या बायकोला मुंबईला बदली झाल्याचे सांगतो आणि इथे उल्लेख येतो त्याच्या दोन भावांचा–जे उनाड आहेत वगैरे–आणि पडद्यावर अमिताभ व शशी कपूर ही जोडगोळी अवतीर्ण होते. लोकांना गंडवून पैसे मिळवण्याची त्यांची कंटाळवाणी गंमत बघून झाल्यानंतर एका अत्यंत सुरेख उपाहारगृहात (छेः ! हॉटेल किंवा 'रेस्तराँ' हाच शब्द वापरायला हवा होता) 'इंपोर्टेड' गाडीतून उतरलेली एक असहाय (अर्थातच रूपसुंदर सुद्धा) तरुणी एका सेठजीची गयावया करत असताना दिसते. (बिंदिया गोस्वामी व खूप वर्षांनंतर जॉनी वॉकर) तावडतोब तिच्या मदतीस धावतात विजय व रवी. त्या सेठजीला रोख तीस हजार रुपये देऊन त्या तरुणीला कर्जमुक्त करतात आणि त्याच्या बदल्यात तिची सुंदर गाडी घेतात; पण ती गाडी चोरलेली निघते आणि चोरीच्या आरोपाखाली हे दोघे तुरुंगात जातात. तेथे या दोघा चोरांची माहिती कशी मिळवायची याची चर्चा करत असताना उल्लेख येतो अब्दुलचा आणि गाणे गात पांगळा अब्दुल (मझहर खान हा नवा चेहरा) आपल्यासमोर येतो. पुढे विजय, रवी, रेणू (बिंदिया) व तिचा अंकल (ऊर्फ सेठजी जॉनी वॉकर) हे एकत्र येऊन एका महाराणीचा हार पळवायचे ठरवतात. त्या हॉटेलमध्ये गाणारी देखणी 'चोरनी' (परवीन बाबी) सुनीता त्यांच्या अगोदर आपले कौशल्य दाखवते आणि आता हे पाच जण झक्क फसवाफसवीचा धंदा सुरू करतात.

मुंबईत आलेला शिवकुमारच आपल्या 'गुणी' भावंडांना पकडतो. त्याच सुमारास

या शिवकुमारवर गोळ्या झाडणारा राकेश (शत्रुघ्न सिन्हा) आपल्याला (थोडाच वेळ) बुचकळ्यात पाडतो. शिवकुमारची अती बहादुरी आणि कर्तव्यप्रेम त्याला 'शाकाल' (कुलभूषण खरबंदा) या 'काळ्या साम्राज्याच्या बादशहा'कडे नेते आणि सर्व प्रमुख पात्राची प्रेक्षकाना ओळख होते. (हुश, हे सगळं सागताना दमायला होतं.)

आणि ही सर्व पात्रे एकंदर चोवीस रिळे एकमेकाना खेळवतात आणि प्रेक्षकाच्याही सहनशीलतेशी जीवघेणा खेळ खेळतात.

संपूर्ण पटकथा ही 'प्रेक्षक बिनडोक आहे' ही एकच समजूत उराशी बाळगून घेतलेली आहे (आणि एवढे पैसे खर्चून हा सिनेमा आवर्जून बघणारे आपण बिनडोक आहोतच, नाही कसे?) गोळा केलेली सर्व टॉप कलावंतांना नीट 'फूटेज' देण्याचा केविलवाणा प्रयत्न पटकथेत केलेला दिसतो आणि त्या नादात व्यक्तिरेखाही ढिसूळ बनल्या, त्यात नवल ते काय?

कर्तव्यदक्ष पोलिसअधिकारी आणि त्यांची तेवढीच करारी पत्नी या व्यक्तिरेखा जुन्या तर आहेतच पण 'शान'मध्ये त्या कुठे भिडतही नाहीत; परवीन बाबी व बिंदिया गोस्वामी याच्या भूमिकांमध्ये अक्षरशः काहीही विशेष नवीन नाही. मल्टी स्टार्सच्या जमान्यात हिरोला सपोर्ट देणे हे नायिकांचे काम त्या चोखपणे बजावतात. अमिताभ व व शशीकपूर ही दुक्कल 'शोले' मधल्या अमिताभ, धर्मेंद्र याच्या 'क्रमश भूमिका' पुढे चालवीत असल्यासारखे वाटते. फरक एवढाच की, 'शोले'त अमिताभची भूमिका जरा गंभीर प्रकृतीची होती, तर इथे दोघेही 'लाइटमूड'मध्ये आहेत. सर्कसमध्ये नेमबाजीचे प्रयोग करणारा, सुनील दत्तवर गोळ्या झाडणारा आणि आपल्या बायकोला 'शाकाल'ने मारल्यामुळे सूडाने पेटलेला राकेशही कुठे फारशी पकड घेत नाही; पण ही भूमिका शत्रुघ्न सिन्हाने आक्रस्ताळेपणा न करता, गडगडाटी 'डायलॉग' न बोलता केल्यामुळे जरा बरे वाटते. सगळ्या मुंबईची वित्तंबातमी असलेल्या पागळ्या अब्दुलच्या भूमिकेत मात्र मझहरखान हा नवा नट छाप मारून जातो.

'शान'च्या प्रत्येक जाहिरातीत मग ती रेडिओवरची असो किंवा अगदी रस्त्यावरील मोठ्या बोर्डमवरची कुलभूषण खरबंदाला खूपच महत्त्व दिले गेले होते. त्याचा 'गमत-गोटा' केलेला चेहरा सर्वत्र झळकत होता लाख रुपयाच्या त्याच्या त्या अफलातून कपड्याचीही चर्चा होत होती आणि सर्वत्र एकच उत्सुकता होती. कुलभूषण खरबंदाचा अमजदखान होईल का? पण एका रात्रीत 'स्टार' बनवणारा तो 'शोले'त दिसलेला 'परीसस्पर्श' शानमध्ये हरवलेला दिसला.

*सर्व प्रकरचा काळा बाजार आणि चोरटा* व्यापार हे या 'शाकाल'चे कार्यक्षेत्र. हा धंदा तर अनेक जण करतात; पण म्हणून ते काय असे बादशाही (नाटकीही) कपडे घालून सारखे आपले मेलोड्रामापद्धतीने क्रूर बोलणे आणि विकट हास्य थोडेच करतात?

या शाकालचा खास अड्डा हा दूरवर समुद्रात एका उंच डोंगरावर वसलेला असतो; पण हा प्रचंड आणि इलेक्ट्रॉनिक करामतीने परिपूर्ण असा हा अड्डा आपल्या मनात प्रश्नचिन्ह उभे करतो. कारण शाकालची ही व्यक्तिरेखा आणि आजूबाजूचे वातावरण पूर्णपणे इंग्रजी चित्रपटावरून विशेषत जेम्स बाँडच्या चित्रपटावरून उचलेले आहे. जेम्स बाँडच्या अनेक शत्रूचे असेच प्रचंड अड्डे समुद्रात पाण्याखाली कडेकपारीत असतात. इलेक्ट्रॉनिक करामती व विविध प्रकारची विध्वंसक हत्यारे याची तर त्याच्याकडे रेलचेल असते; पण ती सर्व मंडळी जगावर सत्ता गाजवायच्या महत्त्वाकांक्षेने पछाडलेली असतात. *त्यामुळे, त्यांची* गुंडाची संघटना, हत्यारे, इतर करामती समर्थनीय असतात; पण इथे शाकाल हा काळ्या बाजारवाल्याचा राजा, 'आपण बरे, आपले गुड बरे आणि आपला काळा धंदा बरा,' 'कुणाच्या अध्यात ना मध्यात' अशा मनोवृत्तीचा जरी हा शाकाल साधाभोळा दाखवला असता तरी चालले असते. मगरीच्या तोंडी शत्रूला टाकणारा हा क्रूरकर्मा शाकाल *अगदी* परका आणि उपरा वाटतो आणि म्हणूनच तो 'गब्बरसिंग' सारखी प्रसिद्धी मिळवू शकणार नाही.

तेव्हा आता असा प्रश्न उभा राहतो की, इतक्या भुक्कड गोष्टी एकत्र असलेल्या या चित्रपटात चांगले काही तरी आहे काय? तर त्याचे उत्तर म्हणून अमिताभने दिलेले दोनतीन सुरेख प्रसंग, गाणी व पार्श्वसंगीत आणि केवळ सुंदर असे छायाचित्रण याचा उल्लेख करावा लागेल. भव्य नेपथ्य ही पण एक जमेची बाजू.

'शोले' चाच संगीतकार राहुलदेव बर्मन इथे 'शान' दार संगीत घेऊन आला आहे. मला स्वतःला 'प्यार करने वाले...' हे आशा भोसले यांच्या स्वरातील व 'यम्मा-यम्मा...' हे आर. डी व रफी यांच्या आवाजातील, अशी दोन गाणी जास्त आवडली. पैकी 'यम्मा यम्मा' या गाण्याचे व 'शोले'-तल्या 'मेहबूबा मेहबूबा' या गाण्यांशी अनेक बाबतीत साम्य आहे. (तसे पाहिल्यास


मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... —प्रा. वा. ल. कुलकर्णी

(प्रास्ताविकातून)

**सांगत्ये ऐका**

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.

तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

'शान 'मधील राखीची मध्यंतरानंतरची विधवेची भूमिका 'शोले 'च्या जया भादुरीची आठवण करून देते. 'शोले 'त ठाकूर थोटा होता तर इथे अब्दुल पांगळा आहे, 'शोले 'तील गब्बरसिंगचे एक-दोन प्रसंग व संवाद इथे 'शाकाल 'च्या वाट्याला आलेत, असा 'शोले ' सर्वत्र मधून मधून डोकावतो,) पार्श्वसंगीतही सुरेख आहे. तसेच 'शोले '-मध्ये गब्बरसिंग या व्यक्तिरेखेसाठी एक विशिष्ट संगीत वापरले होते त्याच धर्तीवर 'शाकाल 'साठीही एक 'संगीत तुकडा ' पार्श्वभूमीवर तरंगत राहतो.

'शान 'चे छायाचित्रकार सुरुवातीला द्वारका दिवेचा हेच होते; पण त्याच्या आकस्मिक निधनानंतर उरलेले सर्व छायाचित्रण त्याचे सहाय्यक एस. एम. अन्वर यानी पूर्ण केले आणि याही कलाकाराला आपण दाद दिलीच पाहिजे असे अप्रतिम छायाचित्रण या चित्रपटात बघायला मिळते. आपण भारतीय चित्रपटात तांत्रिकतेत कुठेही कमी नाही, (हॉलिवुडच्या तुलनेत) हे या चित्रपटाने दाखवले आहे. सहा कोटी रुपये खर्चून निर्माण केलेला हा भव्य चित्रपट कमी पडतो तो फक्त पडद्यामागील 'डोक्या ' मध्ये. दिग्दर्शकाच्या बुद्धिमत्तेविषयी आणि त्याच्या क्षमतेविषयी हा चित्रपट रास्त शंका उभी करतो. चित्रपटाच्या अगोदरच्या श्रेयनामावलीसाठी तरुणी वापरायच्या हे सर्वसामान्यपणे प्रत्येक 'जेम्स बाँड ' चित्रामध्ये असतेच. तसाच प्रकार 'शान 'मध्ये दाखवण्याच्या अट्टाहासापायी दिग्दर्शक श्री. रमेश सिप्पी यांनी आपल्या कल्पनादारिद्र्याचे प्रदर्शन घडवले आहे.

'शान 'च्या बाबतीत न उलगडलेले एक कोडे म्हणजे जेथे जेथे 'शान' प्रदर्शित झाला आहे त्या प्रत्येक थिएटरचे तिकिटदर दणकून वाढले, असे का ? 'शान 'मध्ये असे वैशिष्ट्यपूर्ण काय आहे की त्याच्यासाठी प्रेक्षकांनी अधिक पैसे मोजावेत ?

आणि एवढे पैसे खर्चून प्रेक्षकाच्या वाट्याला येते काय ?...तर फसवणुकीचे दु:ख ! 'शान ' दार दु:ख म्हणू हवे तर ! □

## कम्युनिझम व स्वातंत्र्य :: पृष्ठ २ वरून

असेल तर त्याची दखल घ्यावयास हवी. 'रशियन ट्रेडयुनियन चळवळीच्या इतिहासातील सर्वांत महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे ही चळवळ कम्युनिस्ट पक्षानंतर, कम्युनिस्ट-पक्षाभोवती आणि कम्युनिस्ट पक्षाशी मैत्रीतून वाढत गेली आहे' असे स्टालिननी म्हटले आहे. स्टालिननी सांगितलेले तिचे वैशिष्टय हे तिचे सामर्थ्य नसून दुबळेपणा आहे. रशियात स्वतंत्र ट्रेडयुनियन चळवळीचा पुरस्कार मेन्शेव्हिक नेता मारटॉव्हने केला होता. ट्रेडयुनियन चळवळ कम्युनिस्ट पक्षापासून व सरकारपासूनही स्वतंत्र असावी. कामगारवर्गाच्या हितसबधाचे रक्षक या नात्यानं कामगार सघटनानी नेहमी सरकारला पाठिंबा न देता आपले कृतिस्वातंत्र्य अबाधित ठेवले पाहिजे असे त्याचे मत होते. रशियात कम्युनिस्ट क्रांतीच्या सुरुवातीपासूनच हा प्रश्न महत्त्वाचा झालेला होता. बोल्शेव्हिकांचे मारटॉव्हला उत्तर असे होते की, सोव्हिएटस ही कामगार व शेतकऱ्याची खरी प्रातिनिधिक असल्याने कामगारसघटनांनी सोव्हिएटस्कडून आदेश घ्यावेत. ऑल रशियन सेंट्रल कौन्सिल ऑफ ट्रेड युनियन्सने या मताला जोरदार विरोध केला होता. आमच्या शाखा सोव्हिएटस्च्या नियंत्रणाखाली नाहीत, तेव्हा आपली रोजगारस्थिती सुधारण्यासाठी कामगारानी चालविलेल्या लढयात त्यानी हस्तक्षेप करू नये याकडे कौन्सिलने लक्ष वेधले होते; पण पुढे त्यांचा विरोध टिकला नाही व कामगारसंघटना कम्युनिस्ट पक्षाच्या व सरकारच्या नियंत्रणाखाली गेल्या. सामाजिक विम्यासारख्या कामगार कल्याण योजनाची व्यवस्था कामगार-संघटनाकडे असते. त्या हे उपयुक्त कार्य करतात; पण त्याना स्वायत्त संस्थांचा दर्जा नाही. प्रशासनाचा एक भाग म्हणूनच हे काम केले जाते. रशियातील ट्रेडयुनियन्सची दहावी कॉंग्रेस १९४९ साली झाली. त्यात ट्रेडयुनियन्सनी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालीच काम केले पाहिजे आणि कामगार-वर्गाला लेनिन स्टालिनच्या पक्षामागे उभे केले पाहिजे या भूमिकेवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

रशियात व पूर्व युरोपातील इतर देशात स्वतंत्र कामगारसंघटना स्थापण्याचे प्रयत्न दडपून टाकण्यात आले. असे प्रयत्न करणाराना अटक करण्यात आली किंवा हद्दपार करण्यात आले. अशा संघटना स्थापण्यास परवानगी दिली तर कामगार आपले लढे त्यांच्या नेतृत्वाखालीच लढवितील आणि त्यांची वाढ झाल्यास नव्या सत्ताधारी वर्गाची सत्ता कमी होईल म्हणून या मागणीस विरोध करण्यात आला; पण आता पोलंड-मधील कामगाराच्या विजयानंतर ही मागणी पूर्व युरोपात व रशियातही जोर धरण्याचा संभव आहे.

हंगेरी व चेकोस्लाव्हियाप्रमाणे पोलंडमध्ये रशियाने लष्करी हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही, त्याचे दूरगामी परिणाम होतील याची रशियन नेत्यानाही जाणीव झाली आहे. पोलंडच्या कामगाराची मागणी त्यानी मान्य केली; पण त्याचबरोबर कम्युनिस्ट पद्धतीला आमचा विरोध नाही आणि तिचे अस्तित्व धोक्यात येईल असे आम्ही काही करणार नाही असे आश्वासन कम्युनिस्ट नेत्याना कामगारनेत्याकडून हवे आहे. रशियाने लष्करी हस्तक्षेप केला तर आपण जे हक्क मिळविले तेही गमावून बसू हे दिसत असल्याने पोलंडचे कामगारनेते ही मागणी मान्य करण्यास तयार असल्याचे दिसते. पोलंडच्या नेत्यानी माहिती स्वातंत्र्याची केलेली मागणीही महत्त्वाची आहे. संपवाल्याबद्दल खोटा प्रचार रेडिओ व टी. व्ही. वर केला जातो, त्यामुळे सरकारी वृत्तपत्रे, रेडिओ, टी. व्ही. याच्यावरचा आमचा विश्वासच उडाला आहे. लोकाना खरी माहिती देण्यात आली पाहिजे अशी या नेत्यांची मागणी आहे. त्याच्या चळवळीचा हा पुढचा टप्पा आहे. कम्युनिस्ट राष्ट्रांनी लोकशाहीच्या दिशेने प्रगती करायला हवी हे नव्या परिस्थितीचे त्याना आव्हान आहे. □